# लुकतृत सुवार्ता

1 1 ज्या गोष्टी आपल्यामध्ये घडत राहिल्या आहेत, त्या सर्व गोष्टींविषयी
दुसऱ्या लोकांनी लिहून काढिलेले आहे. 2 परमेश्वराने ज्याप्रकारे आपल्या
प्रतिज्ञा पूर्ण केल्या ते सर्वकाही त्याचे शिष्य आणि प्रत्यक्ष डोळयांनी पाहणाऱ्या
लोकांच्या वृत्तांतासारखे होते. आणि दुसऱ्या लोकांनी लिहून काढण्याच्या
कामी त्याचा उपयोग केला आहे. 3 हे थियफीला, मी सर्व गोष्टींचा बारीक
शोध अत्यंत सावधगिरीने केला आहे आणि म्हणून ते सर्व लिहिण्याचा
विचार केला आहे; 4 याकरिता की ज्या वचनांचे शिक्षण तुला दिले गेले आहे
त्याविषयीची निश्चिती तुला व्हावी आणि ते सर्वकाही पूर्णप्रकारे सत्य आहे,
हे तुला कळावे. 5 यहूदीयाचा राजा, हेरोदाच्या शासनकाळात 'अबीयाच्या
गटात' एक याजक होता, त्याचे नांव जखऱ्या असे होते. जखऱ्याची पत्नी
अलीशिबा ही अहरोनाच्या कुळांतील होती. 6 ते पति-पत्नी परमेश्वराच्या
दृष्टीने नीतिमान असून सर्व आज्ञा व विधिंचे पालन सावधगिरीने करणारे व
सात्विक होते. 7 अलीशिबा वांझ होती, त्यामुळे त्यांना मुलें नव्हती आणि
आता तर ते म्हातारेही झाले होते. 8 मग असे झाले की एकदा त्याच्या
गटाच्या क्रमानुसार, परमेश्वरापुढे याजकाचे काम करण्याची पाळी त्याची
होती. 9 म्हणूनच याजकांच्या प्रथेनुसार पवित्रस्थानात धूप जाळण्याचे कार्य
त्याच्याकडे आले म्हणून तो परमेश्वराच्या सेवेचे कार्य करीत होता; 10 धूप
जाळण्याच्या समयी, लोकांचा एक मोठा समुदाय बाहेर उभा राहून प्रार्थना
करीत होता. 11 त्याच समयी, धूपवेदीच्या उजवीकडे त्याने एक परमेश्वरदूत
उभा राहिलेला पाहिला. 12 त्याला पाहताच जखऱ्या घाबरला आणि भीतिने
भरून गेला. 13 परंतु त्या परमेश्वरदूताने त्याला म्हटले, "हे जखऱ्या, भिऊ
नको, कारण तुझी याचना व विनंती ऐकली गेली आहे आणि पाहा तुझी पत्नी
अलीशिबापासून तुला एक मुलगा होईल; त्याचे नांव तू योहान असे ठेव.
14 त्याच्या जन्मामुळे तुला फार आनंद होईल आणि दुसरे लोकही हर्षित
होतील. 15 परमेश्वराच्या दृष्टीने योहान महान होईल. द्राक्षारस व मद्य तो

कधीच पिणार नाही, आपल्या आईच्या गर्भापासूनच तो पवित्र आत्म्याने भरपूर
(परिपूर्ण) असेल. 16 तो पुष्कळ इस्त्राएली लोकांचे मन त्यांच्या परमेश्वराकडे
वळवील. 17 तो एलीयाच्या आत्म्याने व सामर्थ्याने (बळाने) वाढत जाईल,
म्हणजे असे होईल की, पुष्कळ बापांची अंतःकरणे आपल्या संतानांकडे आणि
आज्ञा मोडणाऱ्या लोकांचे हर्दयें ईश्वरी ज्ञानांकडे वळविली जातील; परिणामी
लोक आपल्या प्रभकरिता तयार होतील आणि एक सिद्ध प्रजा तयार होईल."
18 यांवर जखऱ्या परमेश्वरदूताला म्हणाला, "कशावरून मी ते समजावे? कारण
मी आणि माझी पत्नी तर म्हातारे झालो आहोत?" 19 परमेश्वरदूत त्याला
म्हणाला, "मी गब्रीएल आहे आणि सर्वशक्तीमान परमेश्वराच्या उपस्थितीत मी
उभा राहतो; तुला ही सुवार्ता देण्यासाठी मला पाठविले गेले आहे, 20 पाहा, हे
सर्वकाही घडेल त्या दिवसापर्यंत तू बोलू शकणार नाहीस (मुका होशील). असे
यासाठी होईल की ज्या गोष्टी, जी वचनें योग्य समयी पूर्ण होतील त्याविषयी तू
संशय केला आणि विश्वास ठेविला नाही. 21 जखऱ्या बाहेर येण्याची प्रतिक्षा
करणारे लोक आश्चर्यांत पडले की त्याला पवित्रस्थानात इतका उशीर का होतो
आहे. 22 जेव्हा तो बाहेर आला तेव्हा मुका झाल्यामुळे तो बोलू शकला नाही.
तेव्हा त्यांनी ओळखले की प्रार्थना भवनांत त्याला अवश्य एखादे दर्शन झाले
असावे. तो मुका झाला होता म्हणून आपल्या हातांनी खुणा व संकेत करीत
होता. 23 पवित्रस्थानांतील त्याच्या सेवेचा समय संपल्यानंतर तो आपल्या घरी
परत गेला. 24 काही समयानंतर त्याची पत्नी अलीशिबा गर्भवती झाली आणि
पाच महिने तिने ही गोष्ट गुप्त राखून ठेवली. 25 ती म्हणाली, "लोक माझा
अनादर करितात म्हणून तो दूर करण्याकरिताच प्रभूने माझ्याशी असे केले
आहे." 26 अलीशिबा गर्भवती होऊन सहा महिने झाले होते, तेव्हा गालीलाचे
एक गाव नासरेथात गब्रीएल परमेश्वरदूत 27 मरीया नांवाच्या एका कुमारीकडे
पाठविला गेला; या मरीयेची मागणी दावीदाच्या वंशातील योसेफ नांवाच्या
पुरूषाशी झालेली होती. 28 परमेश्वरदूताने येऊन मरीयेला म्हटले, "उल्हास
व आनंद कर, प्रभु तुझ्याबरोबर आहे आणि त्याची विशाल कृपा तुझ्यावर
झाली आहे." 29 परमेश्वरदूताचे हे बोलणे ऐकून मरीया गोंधळली, ती पेचांत
पडली आणि तिला आश्चर्य वाटले की हे कोणत्या प्रकारचे अभिवादन आहे.
30 परमेश्वरदूत तिला म्हणाला, "हे मरीये, तू भिऊ नको, कारण परमेश्वराची

मोठी कृपा तुझ्यावर झाली आहे. [31] पाहा, तू गर्भवती होशील आणि तुला
एक पुत्र होईल, ज्याचे नांव तू येशू असे ठेवावेस. [32] तो महान होईल आणि
त्याला सर्वसामर्थी परमेश्वराचा पुत्र म्हणतील. प्रभु परमेश्वर, त्या पुत्राचे पूर्वज
दावीद याच्या सिंहासनावर त्याला विराजमान करेल. [33] तो याकोबाच्या
घराण्यावर सदैव शासन करेल; आणि त्याच्या राज्याचा अंत कधीही होणार
नाही, ते कायम टिकेल." [34] यावर मरीया परमेश्वरदूताला म्हणाली, "माझा
संबंध कोणत्याच पुरूषाशी नाही, नव्हे तो पुरूषच मला माहित नाही मग हे
कसे होऊ शकते?" [35] परमेश्वरदूताने तिला उत्तर देऊन म्हटले, "पवित्र आत्मा
तुझ्यावर येईल आणि महाप्रतापी परमेश्वराचे सामर्थ्य तुझ्यावर छाया करील;
म्हणून जो पवित्रजण जन्म घेईल, तो परमेश्वराचा पुत्र म्हटला जाईल. [36] आणि
पाहा, अलीशिबा, जी तुझी नातलग आहे, ती देखील आपल्या म्हातारपणी
गर्भवती झाली आहे. ती वांझ होती खरी, पण तरीही तिला हा सहावा महिना
आहे. [37] परमेश्वराच्या मुखातून निघणारे वचन प्रभावहीन नसतेच; ते प्रभावी
ठरून पूर्ण होतेच. [38] मरीया म्हणाली, "पाहा, मी प्रभु-परमेश्वराची दासी आहे,
म्हणून जे आपण सांगत आहात, त्याचप्रमाणे होवो." तेव्हा परमेश्वरदूत तेथून
निघून गेला. [39,40] मरीया उठली आणि डोंगरी प्रदेशातील यहूदीयाच्या एका
गावात घाईघाईने जखऱ्याच्या घरी गेली, तिने अलीशिबाची भेट घेतली आणि
तिचे अभिवादन केले. [41] मरीयेचे अभिवादन ऐकताच अलीशिबाच्या गर्भातील
बाळाने उडी मारली आणि अलीशिबा पवित्र आत्म्याने भरून गेली. [42] उंच
आवाजात ती मोठयाने बोलू लागली, "सर्व स्त्रियांत तू स्तुति योग्य आहेस आणि
तुझ्या गर्भात जो आहे, तोही धन्य होय! [43] मला ही सुसंधि कशी दिली गेली की
माझ्या प्रभूच्या आईने, मला भेटावयास यावे? [44] ज्या क्षणी तू माझे अभिवादन
केलेस, त्याच क्षणी बाळाने आनंदी होऊन गर्भात उडी मारली. [45] किती सुखी
व धन्य आहे ती, जिने प्रभूची प्रतिज्ञा पूर्ण होण्याचा विश्वास बाळगला!"
[46] मरीया म्हणाली, "माझा प्राण प्रभूची प्रशंसा करितो आहे [47] आणि माझा
आत्मा माझ्या तारणाऱ्या परमेश्वरामुळे उल्हासित होत आहे; [48] कारण
आपल्या दासीच्या दीन अवस्थेवर त्याने दया प्रगट केली आहे, आतापासून
सर्व युगांचे (प्रत्येक पिढीचे) लोक मला आशीर्वादीत म्हणतील, [49] कारण त्या
सर्वशक्तीमानाने माझ्यासाठी महान कृत्यें केली आहेत आणि त्याचे नांव पवित्र

आहे. 50 प्रत्येक पिढीतील, जे कोणी त्याचे भय बाळगतात, त्याचा ते सन्मान
करितात. 51 त्याने आपल्या बाहुची ताकद प्रगट केली आहे. जे लोक आपल्या
अंतःकरणात गर्व करितात, प्रभूने त्यांची दाणादाण करून त्यांना विखरून
टाकिले आहे. 52 बलवानांना त्याने सिंहासनावरून ओढून पाडून टाकिले आहे;
आणि नम्र लोकांना सन्माननीय पद दिले आहे, त्यांना उंच केले आहे. 53 त्याने
उत्तम पदार्थांनी भुकेल्यांना संतुष्ट केले आहे आणि श्रीमंतांना रिकाम्या हस्ते
पाठवून दिले आहे. 54 त्याने आपल्या कृपेस्तव इस्त्राएलाचे साहाय्य केले आहे
कारण त्यानी आमच्या पूर्वजांशी अर्थात अब्राहाम आणि त्याच्या संतानांशी
प्रतिज्ञा केली होती (करार केला होता) की तो सर्वकाळ त्यांच्याप्रति कृपाळू
राहील." 55 त्यानी आपला सेवक इस्त्राएल याला सांभाळून घेतले आहे. 56 तेथे,
तीन महिने राहिल्यानंतर, मरीया आपल्या घरी परत गेली. 57 जेव्हा समय पूर्ण
झाला तेव्हा अलीशिबाला एक मुलगा झाला. 58 प्रभूची मोठी कृपा तिच्यावर
झाली आहे हे ऐकून तिच्या शेजाऱ्यांनी व नातेवाईकांनी तिच्याबरोबर आनंद
साजरा केला. 59 आठव्या दिवशी, बाळाची सुंता करण्याच्या समयी, लोकांनी
त्याला, त्याचा बाप जखऱ्या याचेच नांव देण्याविषयी विचार केला. 60 पण
त्याच्या आईने त्यांना मना केले आणि म्हटले की त्याचे नांव 'योहान' ठेविले
जावे. 61 परंतु तेथे जमा झालेले लोक तिला म्हणाले, "तुझ्या नातेवाईकांत या
नांवाचा तर कोणी नाही!" 62 तेव्हा त्यानी इशारा करून जखऱ्याला विचारले
की ह्यावर त्याचा काय विचार आहे? 63 त्याने लिहिण्याची पाटी मागवली
आणि त्याच्यावर असे लिहिले की, त्याचे नांव योहान आहे; हे पाहून सगळे
आश्चर्याने भरून गेले. 64 त्याचवेळी जखऱ्याचे तोंड आणि जीभ लगेच मोकळी
झाली, तो बोलू लागला आणि परमेश्वराचे आभार मानू लागला. 65 यामुळे
आजूबाजूच्या सर्व राहणाऱ्यांना भय वाटले, या गोष्टीची चर्चा यहूदीयाच्या
संबंध डोंगरी प्रदेशांत होऊ लागली. 66 ऐकणारे, विचार करू लागले की "हा
बाळक मोठा झाल्यावर काय होणार?" कारण परमेश्वर त्याच्याबरोबर होते.
67 आणि त्याचा बाप जखऱ्या पवित्र आत्म्याने ओतप्रोत झाला, तो पवित्र
आत्म्याच्या प्रेरणेने अशाप्रकारे बोलू लागला, 68 "इस्त्राएलाच्या परमेश्वराची
स्तुति असो कारण त्यानी आपल्या लोकांवर दृष्टि लावली आहे आणि त्यांची
सुटका करून त्यांना मुक्त केले आहे, 69 दावीदाच्या वंशात आपल्याकरिता त्याने

सामर्थी उद्धारकर्ता दिला आहे, 70 (जसे त्याने आपल्या समर्पित संदेष्टयांद्वारे,
जे सर्व युगाच्या प्रारंभापासून होत आले आहेत, म्हटले होते), 71 अर्थात त्याने
आम्हांला आमच्या शत्रूंपासून व आपल्याशी वैरभाव ठेवणाऱ्या सर्व लोकांच्या
हातून सोडवून घेतले आहे; 72 अशासाठी की आपल्या वाडवडिलांवर त्याने दया
करावी आणि आपला अटळ करार (प्रतिज्ञा) स्मरण करावा, 73 आणि ती प्रतिज्ञा
जी प्रभु परमेश्वराने आपला पिता अब्राहाम याच्याशी केली होती, 74 म्हणजे
ही की आम्ही आपल्या शत्रूंच्या हातून सुटल्यावर 75 त्याच्यासमोर शुद्धतेने व
नीतीनें, निर्भयपणे जीवनभर त्याची सेवा करीत करावी; आणि त्याचा हा
करार पूर्ण व्हावा म्हणून तोअसे करेल. 76 हे बाळका, तू सर्वशक्तीमान, जगाचे
स्वामी अर्थात परमप्रधानाचा संदेष्टा म्हटला जाशील, कारण प्रभु येशूंच्या
सेवेची तयारी सिद्ध करण्याच्या हेतूने तू त्यांच्या आधी लोकांना शिक्षण देशील;
यासाठी की त्यांच्या लोकांना पापांच्या क्षमेपासून मिळणाऱ्या उद्धाराविषयी
ज्ञान व्हावे (कळावे). 78 हे सर्वकाही तुझे परमेश्वर बाप याच्याकडून (तर्फे)
येणाऱ्या परमकृपेने साध्य होईल, 79 याकरिता की, जे लोक मृत्यूच्या छायेत
आणि अंधारात बसले आहेत, त्यांना प्रकाश मिळू शकावा आणि मिळावा अर्थात
शांतीच्या मार्गात चालण्याचे मार्गदर्शन देखील प्राप्त व्हावे. 80 मग योहान
इस्त्राएली लोकांना शिकवण्याच्या दिवसांपर्यंत शरीर आणि आत्म्यात भक्कम
बळवंत असा होत गेला; इस्त्राएलासमोर प्रगट होईपर्यंत तो जंगलातच राहिला.

2
1 कैसर औगुस्त याच्या शासनकाळांतील त्या दिवसांत, त्याने अशी
आज्ञा केली की रोमन साम्राज्यांतील सर्व नागरिकांची जणगणना केली
जावी. 2 ही पहिली जनगणना त्यासमयी झाली जेव्हा क्विरीनिय हा सूरियाचा
राज्यपाल होता. 3 म्हणून आपआपल्या गावी सर्व लोक आपली नांवे दाखल
करण्याच्या हेतूने गेले. 4 म्हणून दावीदाच्या वंशाचा योसेफ गालीलाच्या
नासरेथ गावाहून यहूदीयातील बेथलेहेम गावी रवाना झाला. 5 यासाठी की
ज्या मरीयेशी त्याची मागणी झाली होती, जी गर्भवती होती, तिचे नांव लिहून
दयावे. 6 मग ते तेथे राहात असतांना असे झाले की मरीयेचे दिवस पूर्ण झाले.
7 आणि तिने आपल्या प्रथमपुत्राला जन्म दिल्यानंतर त्याला कापडांत गुडांळून
गव्हाणींत ठेवले कारण धर्मशाळेंत लोकांच्या गर्दीला पूर आलेला होता, त्यामुळे

त्यांना जागा मिळाली नव्हती. 8 त्याच प्रदेशांतील काही मेंढपाळ रात्रीच्या
समयी मैदानात आपल्या मेंढरांच्या कळपांचे राखण करीत होते. 9 अचानक
एक परमेश्वरदूत त्यांच्यासमोर प्रगट झाला आणि एक दिव्य प्रकाश (मोठे तेज)
चमकला आणि ते खूप भयभीत झाले. 10 तेव्हा परमेश्वरदूत त्यांना म्हणाला,
"भिऊ नका, कारण माझ्याजवळ तुम्हां सर्वांना सांगण्याकरिता एक सुवार्ता
आहे. 11 कारण आज दावीदाच्या नगरात तुमच्यासाठी एक उद्धारकर्ता जन्मास
आला आहे आणि तोच 'ख्रिस्त प्रभु' आहे. 12 तुमच्यासाठीची एक खूण हीच आहे
की तुम्ही एक बाळ, कापडांत गुंडाळलेले आणि गव्हाणींत ठेवलेले पाहाल."
13 तेव्हा एकाएकी त्या परमेश्वरदूताजवळ परमेश्वरदूतांचा समुदाय परमेश्वर
याहवेची स्तुति करीत प्रगट झाला. 14 "परमेश्वरदूत म्हणाले की आकाशात
परमेश्वराला गौरव आणि पृथ्वीवर मनुष्यांत (बरोबर) शांति व मेळ होवो."
15 आणि असे झाले की जेव्हा परमेश्वरदूत परत आकाशाकडे गेले तेव्हा मेंढपाळ
आपसांत म्हणू लागले की, "चला, जे काही झाले व प्रभुजीने आम्हांला जे
कळविले आहे, ते पाहण्यासाठी आपण बेथलेहेमास जाऊ", 16 लगेच ते उठले
आणि घाईघाईने तेथे पोहंचल्यावर त्यानी बाळकाला गव्हाणींत आणि योसेफ
व मरीया यांना त्याच्याजवळ पाहिले. 17 हे पाहून त्यानी (मेंढपाळांनी)
बाळकाविषयी त्यांना जे काही कळविण्यात आले होते ते त्यांना सांगितले.
18 मेंढपाळांच्या गोष्टी ऐकून ते सर्व जण स्तंभित झाले. 19 पण मरीया या
सर्व गोष्टी, आपल्या अंतःकरणात राखून त्यांवर विचार करीत राहीली.
20 मेंढपाळांनी पाहिले की जे काही त्यांना कळविले गेले होते, ते सर्वकाही
तसेच आहे, तेव्हा ते पाहून त्यानी प्रभु परमेश्वराचे गौरव केले आणि आपल्या
मार्गी परत गेले. 21 आठ दिवस पूर्ण झाल्यावर सुंतेचा संस्कार करतेवेळी त्या
बाळकाचे नांव येशू ठेवले गेले, तेच नांव जे मरीयेच्या गर्भात येण्यापूर्वीच
परमेश्वरदूताने ठेविले होते. 22 यहूदी प्रथेनुसार, जेव्हा त्याचे शुद्धीकरणाचे
दिवस पूर्ण झाले, तेव्हा प्रभूला समर्पित करण्यासाठी म्हणून, ते त्या बाळकाला
यरूशलेमेस घेऊन आले. 23 यहूदी धर्मांत लिहिले आहे की, "प्रत्येक प्रथम
जन्मलेला मुलगा परमेश्वराकरिता पवित्र म्हणून वेगळा केला जाईल." 24 आणि
हे देखील की एक जोडा होल्यांचा किंवा यज्ञाकरिता कबूतरांची दोन पिलें
दिली जावीत. 25 यरूशलेमेत शिमोन नांवाचा एक प्रामाणिक मनुष्य होता,

तो इस्त्राएलाच्या शांतीची प्रतिक्षा करीत होता आणि त्याच्याठायी/(वर)
पवित्र आत्मा होता. 26 पवित्र आत्म्याने त्यावर ही गोष्ट प्रगट केली होती की
जोपर्यंत तो उद्धारकर्त्याचे दर्शन करणार (पाहणार) नाही तोपर्यंत त्याला मरण
येणार नाही. 27 पवित्र आत्म्याच्या प्रेरणेने तो मंदिरात (प्रार्थना भवनात)
आला आणि जेव्हा आई-वडील आपली धार्मिक जबाबदारी पूर्ण करण्याकरिता
बाळक येशूला मंदिरात घेऊन आले, 28 तेव्हा त्याने बाळक येशूला आपल्या
हातांत घेतले आणि परमेश्वराचा धन्यवाद करीत असे म्हटले : 29 "हे प्रभु,
माझे स्वामी, आतां आपण आपल्या म्हटलेल्या वचनानुसार, 'मला अर्थात
आपल्या सेवकाला' या पृथ्वीवरून शांतीने निरोप देत आहात, 30 कारण मी
माझ्या डोळयांनी हे प्रभू, तुझे तारण (तारणारा) पाहिले आहे, 31 ते बाळक
आपण सर्व देशांतील लोकांसाठी दिलेले आहे, 32 ते बाळक, जगातील सर्व
राष्ट्रांना परमेश्वराचे ज्ञान देण्याकरिता प्रकाश आणि आपली प्रजा 'इस्त्राएल'
हिच्याकरिता महिमा असे आहे." 33 जे काही त्या बाळकाविषयी सांगितले
गेले होते त्या सर्व गोष्टींविषयी बाळकाचे आई-वडील आश्चर्य करीत होते.
34 यानंतर शिमोनाने त्यांना आशीर्वादीय वचन म्हटल्यानंतर बाळकाची आई
मरीया हिला असे म्हटले, "पाहा, इस्त्राएलांत पुष्कळ लोक या बाळकाचा
स्वीकार (ग्रहण) करणार नाहीत आणि यामुळे त्यांचेच नुकसान होईल परंतु
दुसऱ्या लोकांसाठी हे बाळक मोठया आनंदाचे कारण ठरेल. 35 अनेकांच्या
अंतःकरणात दडलेल्या गोष्टी (विचार) उघडकीस येतील आणि एक तरवार
तुझा स्वतःचाही प्राण (जीव) भेदून टाकील." 36 आशेराच्या वंशातील, फनूएल
नांवाच्या पुरूषाची एक मुलगी होती, ती म्हातारी असून संदेष्ट्री होती व तिचे
नांव हन्ना असे होते. तिच्या लग्नाच्या सात वर्षानंतरच तिच्या पतिचा देहांत
झाला होता आणि तेव्हापासूनच ती विधवा होती. 37 ती चौऱ्याऐंशी वर्षांची
झाली होती; उपास व प्रार्थना आणि भजन- किर्तन करून ती तेथेच मंदिरात
(प्रार्थना भवनात) दिवसरात्र सेवाकार्य करीत होती. 38 ज्यावेळी शिमोन,
मरीया व योसेफाशी बोलत होता त्यावेळीच ती तेथे आली आणि परमेश्वराची
स्तुति करून तिने परमेश्वराचे आभार मानिले. जो प्रत्येक जण येणाऱ्या राजाची
आणि यरूशलेमेच्या मुक्तीची प्रतिक्षा करीत होता, त्या सर्वांना तिने येशूंविषयी
सांगावयास सुरवात केली. 39 यहूदी नियमानुसार सर्वकाही पूर्ण झाल्यानंतर

मरीया व योसेफ गालीलांतील नासरेथास, आपल्या घरी परत गेले. 40 तेथेच
बाळक येशू स्वास्थ आणि वयांत वाढत जाऊन बलवान झाले; इतकेच केवळ
नव्हे तर त्यांच्या वयाच्या तुलनेत त्यांच्याठायी कितीतरी भक्कम ज्ञान (बुद्धि)
होते; याखेरीज परमेश्वराची विशेष कृपा त्यांच्यावर होती. 41 येशूंचे आईवडील
प्रत्येक वर्षी वल्हांडणाच्या सणानिमित्त यरूशलेमेस जात असत. 42 येशू बारा
वर्षाचे असतांना, प्रथेनुसार ते सणाकरिता यरूशलेमेस गेलेले होते. 43 तेथे
सण संपल्यानंतर, जेव्हा ते परत येत होते तेव्हा येशू तेथेच राहिले होते (आले
नव्हते) पण योसेफ व मरीयेला याविषयी कळले नव्हते. 44 त्यांनी विचार
केला की लोकांच्या समुदायांत, इतर लोकांच्या बरोबर तो असेल म्हणून एक
दिवसांची वाट चालून/यात्रा करून ते बरेच लांब निघून गेले. तेव्हा आईवडील
येशूंना नातेवाईक आणि ओळखीच्या लोकांतच शोधू लागले, 45 तेथे ते त्यांना
सापडले नाही म्हणून ते त्यांना शोधत शोधत यरूशलेमेस पोहंचले. 46 तीन
दिवसानंतर त्यानी येशूंना प्रार्थना भवनात शिक्षकांबरोबर (गुरू) बसून त्यांना
प्रश्न-उत्तरें देतांना पाहिले; 47 येशूंचे बोलणे ऐकणारे लोक त्यांच्या ज्ञानपूर्ण
गोष्टी ऐकून आणि त्यांना प्रश्न विचारण्याची जी कला अवगत होती, तसेच
त्यांची समर्पक उत्तरें ऐकून आश्चर्यचकित झाले. 48 येशूंना तेथे पाहून आईवडील
थक्क झाले व त्याची आई मरीया त्याला म्हणाली, "बाळ तू आमच्याशी असे कां
वागलास? तुझे वडील आणि मी तुला शोधून शोधून हैराण झालोत. 49 येशूने
उत्तर दिले, "माझ्यामुळे आपण कष्टी झालांत, व्याकूळ झालात ही काय गोष्ट
आहे? हे कसे काय? तुम्हांला ठाऊक नाही काय की मला माझ्या पित्याचे
कार्य निरंतर करीत राहावयाचे आहे? (पित्याच्या भवनात माझी उपस्थिती
अपेक्षित आहे);" 50 पण येशूंचे हे बोलणे त्यांना समजले नाही. 51 त्यानंतर
तेत्यांच्याबरोबर नासरेथास आले आणि तेथे त्यांच्या आधीनतेत पूर्णतः राहिले,
परंतु मरीयेने या सर्व गोष्टी आपल्या अंतःकरणात ठेविल्या. 52 आणि ज्ञान
(बुद्धि) वय, शरीर, आंगकाठी तसेच परमेश्वराच्या आणि माणसांच्या प्रेमकृपेंत
येशूंची वृद्धि होत गेली (उन्नति/वाढ).

3
1 तिबिर्य कैसर (रोमी राजा) याच्या शासनकाळाच्या पंधराव्या वर्षी
पंतय पिलात यहूदीयाचा राज्यपाल होता आणि चौथ्या भागाचा राजा,

हेरोद हा गालीलाचा आणि त्याचा भाऊ फिलिप्प इतुरीया आणि त्राखोनीतीचा
राजा आणि लुसनिय अबिलेनेचा राजा (शासनकर्ता) होता. [2] त्यावेळी प्रमुख
याजक म्हणून हन्ना आणि कयफा जबाबदारी पार पाडित होते; तेव्हा जंगलात
जखऱ्याचा मुलगा योहान याला प्रभूचा संदेश (वचन) मिळाला. [3] आणि
तो यार्देनेजवळ आसपासच्या प्रदेशांत पश्चात्तापाची, बाप्तिस्म्याची आणि
पापांच्या क्षमेची सुवार्ता गाजवूं लागला. [4] जसे यशया संदेष्टयाच्या पुस्तकांत
लिहिले आहे, "जंगलात घोषणा करणाऱ्याची वाणी अशी आहे की, "प्रभूचे
मार्ग तयार करा, ते सरळ करा. [5] प्रत्येक खोरे भरून टाकिले जाईल, प्रत्येक
डोंगर आणि टेकडी खाली आणली जाईल. वाकडया वाटा सरळ केल्या जातील.
खडकाळ रस्ते सपाट बनविले जातील. [6] सर्व लोक परमेश्वर बापाची मुक्ति
पाहू शकतील." [7] मग माणसांचा जो समुदाय योहानाकडे बाप्तिस्मा घ्यावयास
आला, त्याला योहान म्हणाला, "सापांच्या पिलांनो, भविष्यकाळी येणाऱ्या
परमेश्वरीय दंडापासून दूर पळून जाण्यासाठी, तुम्हांला सावध करणारा कोण
आहे? मग परिवर्तनाचे प्रमाण दया आणि स्वतःशी आपल्या मनांत असे बोलू
नका की "अब्राहाम आमचा पिता आहे;" कारण अशी गोष्ट म्हणणे बेकार आहे.
परमेश्वर या दगडांना अब्राहामाच्या संतानांत बदलू (परिवर्तन करू) शकतो;
दगडांपासून मुलांची निर्मिती करणे परमेश्वराला शक्य आहे. [9] झाडांच्या
मुळांशी पूर्वीपासूनच कुऱ्हाड ठेवलेली आहे. प्रत्येक असे झाड ज्यात उत्तम
फळ येत नाही, कापून अग्नीत फेकून टाकिले जाते. [10] मग लोकांच्या गर्दीने
प्रश्न केला, "तर मग आम्ही काय करावयास हवे?" [11] योहानाने उत्तर दिले,
"जर तुमच्याजवळ दोन कुर्ते/शर्ट आहेत, तर त्यांपैकी एक ज्याच्याजवळ नाही
त्या गरीबाला दया, जर तुमच्याजवळ भोजन आहे तर, मिळून खा." [12] मग
कर जमा करणारेही बाप्तिस्मा घेण्यासाठी त्याच्याकडे आले आणि विचारू
लागले, "गुरूजी, आम्ही काय करावयास हवे?" त्याने उत्तर दिले, "प्रामाणिक
असा आणि जितकी रकम, रोमी सरकारने नेमून दिलेली आहे, त्यांहून अधिक
घेऊ नका." [14] काही शिपाई त्याला विचारू लागले, "आम्ही काय करावयास
हवे?" तो त्यांना म्हणाला, "जबरदस्ती करून कोणाकडूनही पैसा काढून घेऊ
नका (लुबाडू नका), किंवा कोणावरही खोटा आरोप न लावता फक्त आपल्या
मजूरीतच तृप्त व प्रसन्न रहा." [15] प्रत्येक जण ख्रिस्तांच्या लवकर येण्याची वाट

आतुरतेने पाहात होता, म्हणूनच त्यांना जाणून घ्यायचे होते की हा योहानच
तर ख्रिस्त नसेल ना? 16 त्यांच्या प्रश्नांच्या उत्तरादाखल योहान सांगायचा, "मी
पाण्यात तुमचा बाप्तिस्मा करितो, पण एक असा आहे जो माझ्याहून अधिक
सामर्थी आहे, इतका अधिक की मी त्यांच्या जोडयांचे बंद देखील उघडण्याच्या
पात्रतेचा नाही. ते तुमचा बाप्तिस्मा पवित्र आत्मा आणि अग्नीनें करतील.
17 आपल्या सूपाच्या साहाय्याने ते गहू आणि भूस (कोंडा) वेगळा करण्याकरिता
तयार आहेत. त्यानंतर ते दाणे स्वच्छ करतील आणि धान्य कोठारांत ठेवतील,
पण भूस मात्र कधी न विझणाऱ्या अग्नींत टाकितील." 18 सुवार्ता गाजवितांना
योहानाने अशा कितीतरी सावधगिरीच्या व बोधप्रद गोष्टी लोकांना
सांगितल्या. 19 परंतु आपला भाऊ फिलीप्प याची पत्नी हेरोदियास, आपली
बायको केल्यामुळे आणि दुसऱ्या इतर दुष्कर्मांबाबत, योहान हेरोदावर प्रचंड
संतापला होता, त्याने त्याला धमकावून त्यांवर दोषारोपण केले होते. 20 सर्वांत
जास्त वाईट गोष्ट हेरोदाने ही केली की त्याने योहानाला तुरूगांत टाकले.
21 ज्यावेळी लोक तेथे येऊन बाप्तिस्मा घेत होते त्यावेळी येशूंनीही बाप्तिस्मा
घेतला. जेव्हा येशू प्रार्थना करीत होते, तेव्हा आकाश उघडले. 22 आणि एका
फाख्त्याच्या रूपांत पवित्र आत्मा त्यांच्यावर उतरला (स्थिर झाला) आणि
आकाशातून अशी घोषणा झाली की, "तू माझा परमप्रिय, लाडका पुत्र आहेस,
मी तुझ्याविषयी प्रसन्न आहे." 23 येशूंनी तीस वर्षांचा असतांना आपल्या सेवेचा
प्रारंभ केला. येशूंना लोक योसेफाचा मुलगा समजत असत; आणि योसेफ
एलीचा, 24 आणि तो मत्ताथाचा, तो लेवीचा आणि तो मल्खीचा, तो यन्नयाचा
आणि तो योसेफाचा, 25 आणि तो मत्तिथ्या आणि तो आमोसाचा, तो नहूमाचा
आणि तो हेस्लीचा, तो नग्गयाचा, 26 आणि तो महथाचा, तो मत्तिथ्याचा
तो शिमयीचा, तो योसेखाचा, तो योदाचा, 27 आणि तो योहानानाचा, तो
रेशाचा, तो जरूब्बाबेलाचा आणि तो शल्तीएलाचा, तो नेरीचा, 28 आणि तो
मल्खीचा, तो अद्दीचा आणि तो कोसामाचा, तो एल्मदामाचा, तो एराचा,
29 आणि तो येशूचा, तो अलियेजराचा, आणि तो योरीमाचा, तो मत्ताथाचा, तो
लेवीचा, 30 तो शिमोनाचा, तो यहूदाचा आणि तो योसेफाचा, तो योनामाचा,
तो एल्याकीमाचा, 31 तो मलआचा आणि तो मिन्नाचा तो मत्ताथाचा आणि
तो नाथानाचा, तो दावीदाचा, 32 आणि तो इशायाचा, तो ओबेदाचा, तो

बवाजाचा, तो सल्मोनाचा आणि तो नहशोनाचा, [33] तो अम्मीनादाबाचा, तो
आरनीचा, तो अर्णयाचा आणि तो हेस्त्रोनाचा, तो पेरेसाचा, तो यहूदाचा,
[34] आणि तो याकोबाचा, तो इसहाकाचा, तो अब्राहामाचा, तो तेरहाचा, तो
नाहोराचा, [35] आणि तो सरूगाचा, तो रऊचा, तो पेलेगाचा, तो एबराचा, तो
शेलहाचा, [36] आणि तो केनानाचा, तो अर्पक्षदाचा, तो शेमाचा, तो नोहाचा,
तो लामेखाचा, [37] आणि तो मथूशलहाचा, तो हनोखाचा, तो यारेदाचा,
तो महललेलाचा, तो केनानाचा, [38] आणि तो अनोशाचा, तो शेथाचा, तो
आदामाचा आणि तो परमेश्वराचा पुत्र.

4 [1] पवित्र आत्म्याने भरलेले येशू यार्देनापासून परत आले आणि मग पवित्र
आत्मा त्यांना जंगलांत घेऊन गेला. [2] तेथे सैतानाने चाळीस दिवसांपर्यंत
त्यांच्यासमोर नाना तऱ्हेंची प्रलोभनें मांडली आणि त्यांना पारखले. त्यांनी त्या
दिवसांत काहीही खाल्ले नाही. त्यानंतर मात्र त्यांना भूक लागली. [3] आणि
सैतान त्यांना म्हणाला, "जर तू परमेश्वर बापाचा पुत्र आहेस, तर या दगडांना
आज्ञा कर की त्यानी भाकरी होऊन जावे." [4] येशू उत्तर देऊन म्हणाले, "असे
लिहिले आहे की, मनुष्य केवळ भोजन केल्याने नव्हे तर परमेश्वराच्या प्रत्येक
शब्दामुळे जिवंत राहील." [5] तेव्हा येशूंना एका उंच डोंगरावर घेऊन जाऊन
सैतानाने त्यांना जगातील सर्व राज्यें एकाच क्षणात दाखविली. [6] सैतान त्यांना
म्हणाला, "यांचा अधिकार आणि यांचा महिमा मला दिली गेली आहे, आणि ती
मी माझ्या मनास येईल त्याला देण्याचा अधिकारही बाळगतो. हे सर्व काही मी
तुला देऊ शकतो. [7] म्हणून जर तू मला दंडवत घालून नमन केले तर, सर्वकाही
तुझेच होईल." [8] तेव्हा येशू त्याला म्हणाले, "अरे सैताना, येथून नीघ कारण
असे लिहिले आहे की तू केवळ ,आणि केवळ आपल्या प्रभु परमेश्वराला दंडवत
घालून, नमन कर आणि फक्त त्याचीच सेवाही कर." [9] यानंतर सैतान येशूंना
मंदिराच्या (प्रार्थना भवनाच्या) शिरोभागी अर्थात सर्वात उंच स्थानी उभे करून
म्हणाला, "जर तू परमेश्वराचा पुत्र आहेस तर येथून उडी टाक, स्वतःला खाली
फेकून दे, कारण परमेश्वराच्या वचनांत असे लिहिले आहे की, [10] तो(परमेश्वर)
परमेश्वरदूतांना तुझे रक्षण करण्याविषयी आज्ञा देईल की त्यानी तुला सांभाळून
घ्यावे. [11] परमेश्वरदूत तुला हातांवर झेलून घेतील म्हणजे तुझे पाय दगडांनी

ठेचाळणार नाही (इजा होणार नाही)." 12 येशूंनी त्याला उत्तर दिले, "असे
लिहिले आहे की तू आपल्या प्रभु परमेश्वराची परीक्षा पाहू नको, त्याची
पारख करू नको." 13 सर्व परीक्षा (प्रलोभनें) संपविल्यानंतर सैतान काही
समयाकरिता येशूंना सोडून गेला. 14 येशू पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने परिपूर्ण
असे गालीलात परत आले आणि आजूबाजूच्या प्रदेशांत त्यांची प्रसिद्धी पसरली
(ते प्रसिद्ध झाले). 15 त्यांच्या आराधनालयांत (सभास्थानें) येशू शिकवीत
राहिले आणि सर्वजण त्यांना मान देऊ लागले. 16 नासरेथ, जेथे येशू लहानाचे
मोठे झाले, जेथे त्याचे पालन पोषण झाले तेथेच आपल्या रिवाजांप्रमाणे
शब्बाथ दिवशी आराधनालयात जाऊन ते वाचण्यासाठी उभे झाले. 17 त्यांच्या
हातांत यशया संदेष्टयाचे पुस्तक दिले गेले, पुस्तक उघडताच त्यांची दृष्टि
जेथे गेली तेथे लिहिले होते की, 18 "प्रभु परमेश्वराचा आत्मा माझ्यावर आहे
कारण त्याने लीनांस सुवार्ता सांगण्याकरिता माझा अभिषेक केला आहे,
ज्यांची अंतःकरणें ठेचली जात आहेत त्यांना बरे करावे म्हणून त्याने मला
पाठविले आहे. 19 आणि यासाठी सुद्धा की जखडून-धरून नेलेल्या लोकांना
मुक्ति, अंधळयांना दृष्टीप्रकाश आणि कठोर व अन्याय्य पद्धतीने दडपलेल्यांना
सोडवून मुक्त करावे आणि परमेश्वराच्या प्रसाद-वर्षाची घोषणा गाजवावी.
20 येशूंनी पुस्तक बंद केले आणि ते सेवकास परत दिले आणि खाली बसले.
आराधनालयात बसलेले सर्व लोक त्यांच्याकडे पाहातच राहिले. 21 येशू असेही
म्हणाले की, जे काही त्या लोकांनी त्या दिवशी (शास्त्रलेख वाचलेला तोच
दिवस) ऐकले, त्याच वेळी (ऐकत असतांना), ते सर्वकाही (तो शास्त्रलेख) पूर्ण
झाले आहे. 22 सर्व लोकांनी येशूंविषयी साक्ष दिली, त्यांची वाहवा केली आणि
त्यांच्या तोंडून ज्ञानवचनें निघत होती ती ऐकून आश्चर्याने भरून गेले आणि
म्हणू लागले, "हा योसेफाचाच पुत्र नाही काय?" 23 तेव्हा येशू त्यांना म्हणाले,
"तुम्ही खात्रीने अशी म्हण मला लागू करू पाहाल की, अरे वैदया, आधी तू
स्वतःलाच बरें कर! कफर्णहूमात घडलेल्या गोष्टींविषयी आम्ही ऐकले; आता
आपल्या वत्तनातहि (गावी) तसेच कर!" 24 येशू त्यांना म्हणाले, "मी तुम्हांला
खात्रीने सांगतो की कोणताही संदेष्टा आपल्या स्वदेशी मान मिळवीत नाही;
अर्थात त्याला मान्यता प्राप्त होत नाही. 25 मी तुम्हांला सत्याविषयीची जाणीव
करून देतांना सांगतो की, एलीयाच्या काळी साडेतीन वर्षे पाऊस पडलेला

नव्हता आणि त्यासमयी तेथे भयंकर दुष्काळ पडला होता, [26] त्या दिवसांत
पुष्कळ विधवा होत्या. त्यांपैकी केवळ सीदोनातील सारफथ गावातील एका
विधवेकडे एलीयास पाठविले गेले; [27] अलीशा संदेष्टा यात (जिवंत) असतांना,
इस्त्राएलांत बरेच कुष्ठरोगी/कोढी होते, तरीही सूरियाचा नामान सोडून आणखी
कोणीही शुद्ध झाला नाही." [28] हे ऐकताच आराधनालयांतील सर्व लोक येशूंवर
संतापले. [29] ते उठले आणि ज्या डोंगरावर ते गांव वसलेले होते, तेथवर त्यांना
हाकून नेले, तेथूनच कडयावरून येशूंना लोटून देण्याची त्यांची इच्छा होती
(त्यांना हवे होते). [30] पण येशू तेथून निसटले. [31] आणि मग येशू कफर्णहूम
नांवाच्या गावी पोंहचले, जेथे प्रत्येक शब्बाथ दिवशी ते लोकांना शिकवीत
राहीले. [32] येशूंचे शिक्षण ऐकून तेथील लोकही आश्चर्याने थक्क झाले; कारण येशू
मोठया अधिकारवाणीने त्यांना शिकवीत होते. [33] ज्यावेळी ते आराधनालयात
होते, अशुद्ध आत्म्याने भरलेला एक व्यक्ती जोराने किंचाळून म्हणाला, "अरे
नासरेथाच्या येशू! आम्हांला कां त्रस्त करीत आहेस, तू आमच्यामध्ये पडू नकोस!
तू आमचा नाश करावयास येथे आला आहेस काय? मला ठाऊक आहे की तू
कोण आहेस! परमेश्वराकडून पाठविला गेलेला पवित्र पुरूष आहेस!" [35] येशूंनी
त्याला मध्येच थांबविले आणि त्या अशुद्ध आत्म्याला धमकावून म्हटले, "गप्प
हो! ह्या माणसातून नीघ" काहीही उपद्रव/हानि न करिता, अशुद्ध आत्मा त्या
माणसाला जमिनीवर खाली आपटून त्यातून निघाला आणि लोकसमुदाय हे सर्व
पाहातच राहिला. [36] विस्मयाने भरलेले ते सर्व लोक एकमेकांना म्हणू लागले
की, "काय ही वाणी? या माणसाच्या शब्दांत किती अधिकार आणि सामर्थ्य
भरलेले आहे? येथवर की दुष्टात्मा त्याच्या आज्ञेचे पालन करितात आणि त्याचा
आदेश ऐकताच निघून जातात!" [37] चाऱ्हीं बाजूंच्या प्रदेशांत येशूंविषयीची ही
खबरबात पसरली आणि त्यांची ख्याति झाली. [38] आराधनालयातून बाहेर
निघून येशू शिमोनाच्या घरी गेले, शिमोनाची सासू तापाने फणफणत आणि
विव्हळत होती. त्यानी येशूंना विनंती केली की तिला बरें करावे. [39] तिच्या
खाटेजवळ उभे राहून येशूंनी तिच्या तापाला दटावून तिच्यातून निघून
जाण्याची आज्ञा केली. तिचा ताप निघून ती लगेच उठली आणि त्यांची सेवा
करण्यात रमून गेली. [40] त्या दिवशी सूर्यास्तासमयी लोक आपल्या आजारी,
अस्वस्थ नातलगांना आणि मित्रांना येशूंजवळ आणू लागले. एकानंतर एक असे,

त्या सर्वांवर येशूंनी आपला हात ठेवून त्यांना बरें केले - स्वस्थ केले. 41 काही
लोक दुष्टात्म्याने ग्रासलेले होते, येशूंची धमकी ऐकून, "आपण परमेश्वराचे पुत्र
(परमेश्वर) आहात, असे ओरडत दुष्टात्मा पुष्कळ माणसांतून निघाले; येशूंनी
त्यांना धमकी देऊन गप्प राहावयास सांगितले. 42 दुसऱ्या दिवशी भल्या
पहाटे, येशू जंगलाकडे रवाना झाले. लोक समुदाय त्यांना शोधित शोधित
थेट त्यांच्यापर्यंत पोंहचला आणि त्यांना आवर्जून अशी विनवणी करू लागला
की त्यानी त्यांच्याजवळच, त्यांच्यातच राहावे आणि तेथून जाऊ नये. 43 पण
येशू त्यांना म्हणाले, "हे आवश्यक व गरजेचे आहे की मी दुसऱ्या स्थानीही
जावे आणि परमेश्वर राज्याची सुवार्ता गाजवावी." 44 येशूंनी यहूदीयाच्या
आराधनालयांत शिकविण्याचे कार्य चालूच ठेविले.

# 5

1 मग गनेसरेत (गालीलाच्या) सरोवराच्या किनाऱ्याशी उभे राहून येशू
त्यांना परमेश्वराचे वचन शिकवीत होते, तेव्हा लोकांची गर्दी त्यांचे
परमेश्वरीय- वचन ऐकण्याकरिता एकमेकाला रेटित होती, 2 तेव्हा त्यानी
सरोवराच्या काठी लागलेल्या दोन बोटी पाहिल्या, परंतु त्यावरचे कोळी
बोटीतून/नावेतून खाली उतरून आपली जाळी धूत होते. 3 त्यांपैकी एक नाव
शिमोनाची होती, येशू त्यावर चढले आणि ती नाव जमिनीपासून थोडी दूर
लोटावी असे त्यानी त्याला सांगितले. त्याच नावेत बसून येशू लोकसमुहाला
शिकवू लागले. 4 शिकविणे संपल्यानंतर येशू शिमोनाला म्हणाले, "खोल
पाण्यात चल आणि मासे धरण्यासाठी तुम्ही आपली जाळी सोडा", 5 शिमोन
त्यांना म्हणाला, "हे स्वामी, संपूर्ण रात्र आम्ही मेहनत केली, पण आमच्या हाती
काहीही आलेले नाही; पण तरीही आपण म्हणत आहात म्हणून मी जाळी खाली
सोडतो." 6 येशूंच्या सांगण्यावरून तसेच केल्यानंतर त्यानी इतके मासे धरले
की त्यांची जाळी फाटूं लागली. 7 म्हणून दुसऱ्या नावेत बसलेल्या आपल्या
सोबत्यांना त्यानी तुझे साहाय्य करण्याकरिता विनंती केली. त्यांची नांव
माशांनी इतकी भरली होती की ते बुडूं लागणार होते. 8 हे सर्व पाहून शिमोन
पेत्र येशूंच्या पायाशी पडला आणि म्हणाला की, हे प्रभुजी, माझ्यापासून दूर जा
कारण मी फार वाईट मनुष्य आहे." 9 असे याकरिता झाले की तो व त्याच्या
साथीदारांनी विपुल प्रमाणात धरलेले मासे पाहिले आणि त्या सर्वांना मोठे

आश्चर्य झाले होते. 10 शिमोनाचे "सोबती-भागीदार असलेले/व्यापारी" याकोब
आणि योहानही जे जब्दीचे मुलगे होते, आश्चर्याने भरून गेले होते. 11 येशू
शिमोनाला म्हणाले, "शिमोना, भिऊ नको, कारण आता यापुढे, तू माणसांना
धरणारा होशील." म्हणून आपली नाव काठावर लावल्यानंतर त्यानी सर्व काही
सोडून दिले आणि येशूंचे अनुसरण केले व त्याचे अनुयायी/शिष्य झाले. 12 येशू
एका गावात असतांना, कोढाने भरलेला एक मनुष्य त्यांच्याकडे आला. येशूंना
पाहताच त्याने आपले डोके त्यांच्या पायाशी लावून त्यांना कळकळीची विनंती
केली, "प्रभुजी, जर आपली इच्छा असेल तर आपण मला शुद्ध करू शकता
कारण तसे करण्यास आपण समर्थ आहात." 13 येशूंनी आपला हात पुढे करून
त्याला स्पर्श करीत म्हटले, "तू शुद्ध/(बरे) व्हावेस हे मला हवे आहे, हीच माझी
इच्छा आहे." लगेच ताबडतोब त्याचे कोढ बरे झाले आणि तो त्यांपासून शुद्ध
झाला. 14 तेव्हा येशूंनी त्याला निक्षून अशी आज्ञा केली की त्याने त्यांविषयी
कोणालाही सांगू नये आणि जाऊन स्वतःस याजकाला दाखवावे; तसेच बरें
होण्याचे प्रमाण स्वरूप म्हणून त्याने मोशेने नेमिलेले शुद्धी करण्यासाठीचे
अर्पण सादर करावे. 15 पण नेमके असे झाले की त्यांच्याविषयीची खबरबात
जास्तच पसरली आणि लोकांची मोठी गर्दी (जमाव) त्यांचे परमेश्वरीय-वचन
ऐकण्यासाठी आणि रोगांपासून मुक्ति व स्वास्थ्य मिळविण्याच्या हेतूने
त्यांच्याकडे जमू लागली. 16 पण तरीही येशू संधी पाहून जंगलाकडे निघून जात
आणि तेथे परमेश्वराशी (प्रार्थना) सहभागिता करीत असत. 17 एके दिवशी
जेव्हा येशू शिकवीत होते, तेव्हा यहूदी धर्माचे काही अध्यापक आणि परूशी तेथे
बसलेले होते; ते सर्व गालीलांतून, यहूदीयातून आणि यरूशलेमेच्या गावांतून
तेथे आलेले होते. लोकांना स्वस्थ करण्याची क्षमता (सामर्थ्य) येशूंठायी होतीच.
18 तेव्हा काही लोक, एका खाटेवर, एका लकवाग्रस्त मनुष्याला घेऊन आले.
त्या लकवाग्रस्ताला येशूंसमोर ठेवण्याची त्यांची इच्छा होती. 19 पण लोकांच्या
प्रचंड दाटीमुळे, ते तसे करू शकले नाहीत, ते घरावर चढले त्यानी कौलारें
बाजूला सारली आणि तेथून बाजेसमवेत खाट खाली सोडली आणि थेट
येशूंसमोर त्या लकवाग्रस्ताला ठेवून दिले. 20 त्या लोकांचा (साथीदारांचा)
विश्वास पाहून येशू म्हणाले, "मुला, तुझे पाप क्षमा झालेले आहेत". 21 धार्मिक
कायदेतज्ञ आणि परूशी आपल्या मनांत विचार करू लागले की, "हा कोण आहे

जो परमेश्वर-निंदा करीत आहे, जो लोकांचे पाप क्षमा करू शकतो? केवळ
परमेश्वरच असे करू शकतो. ही तर उघडपणे केलेली परमेश्वरनिंदाच आहे."
22 त्यांचे विरोधी विचार ओळखून येशू त्यांना म्हणाले, "तुमच्या मनात असे
विचार का येत आहेत? 23 काय म्हणणे सोपे आहे, तुझ्या पापांची क्षमा झाली
आहे किंवा उठून चालू लाग? परंतु तुम्हां सर्वांना हे समजावे की मनुष्याच्या
पुत्राला अर्थात येशूला या पृथ्वीवर पाप क्षमा करण्याचा अधिकार आहे, (येशू
लकवाग्रस्ताला म्हणाले), मी तुला सांगतो आहे की लगेच ऊठ, उभा हो, आपली
बाज उचल आणि आपल्या घरी चालता हो." 25 तो त्यांच्यासमोरच उठला
आणि त्याने आपली बाज उचलली आणि परमेश्वराची स्तुति-महिमा करीत तो
आपल्या घरी निघून गेला. 26 तेव्हा सर्व लोक स्तंभित होऊन परमेश्वराची स्तुति
करू लागले, ते थक्क आणि भयभीत होऊन म्हणाले, "आज आम्ही असाधारण
आणि विचित्र घटना पाहिल्या आहेत." 27 यानंतर येशूंची भेट, कर-वसूलीच्या
नाक्यावर बसलेल्या लेवी नांवाच्या जकातदाराशी (कर-गोळा करणारा)
झाली; त्याला येशूंनी म्हटले, चल, माझे अनुसरण कर, माझ्या मागे हो.
28 त्यानेही तुझे सर्वस्व त्यागून दिले आणि तो त्यांचा अनुयायी झाला. 29 त्या
लेव्याने येशूंना आपल्या घरी मेजवानीकरिता बोलाविले. तेथे त्याचे सोबतीचे
कर वसूलणारे व इतर माननीय अतिथि देखील होते. 30 शास्त्री व परूशी
येशूंच्या शिष्यांविषयी त्यांच्या विरूद्ध कुरकुरत म्हणाले, "आपण, कर वसूली
करणाऱ्या आणि दुष्टाई करणाऱ्या लोकांबरोबर का भोजन करिता?" 31 उत्तर
देऊन येशू त्यांना म्हणाले, "आजाऱ्यांना डॉक्टर/वैदयाची गरज भासते, स्वस्थ
व निरोगी लोकांना नव्हे; 32 स्वतःला धार्मिक समजणाऱ्या लोकांना नव्हे,
तर ज्यांना आपल्या आध्यात्मिक गरीबीची जाणीव आहे; नीतिमानांना नव्हे
तर पश्चाताप करणाऱ्या पापी लोकांना निमंत्रण देण्याकरिता मी या पृथ्वीवर
आलो आहे." 33 ते लोक येशूंना म्हणाले, "योहानाचे व परूश्यांचे शिष्य बहुधा
उपास व प्रार्थना करीत असतात, परंतु तुझे शिष्य असे करीत नाहीत?" 34 येशू
त्यांना म्हणाले, "तुम्ही वऱ्हाडी (वराचे सोबती) लोकांना त्या समयी उपास
करावयास म्हणाल काय, ज्यावेळी वर त्यांच्याबरोबर उपस्थित आहे? 35 परंतु
असे दिवस येणार आहेत, ज्यांमध्ये वर त्यांच्यापासून वेगळां करून घेतला
जाईल, तेव्हा त्या दिवसांत ते उपास करतील." 36 येशूंनी त्यांना एक दाखला

सांगितला : "कोणताही मनुष्य एखादया जुन्या वस्त्राला नवीन वस्त्राचे ठिगळ
लावीत नाही, कारण तसे केल्यास नवीन वस्त्राच्या फाटण्याची शक्यता असते
शिवाय नव्याचा मेळ जुन्याशी होणे अशक्य होईल. 37 कोणीही ताजा (नवा)
द्राक्षारस जुन्या कातडी पिशवीत घालीत नाही; कारण जर त्याने असे केले तर
कातडी पिशव्या फाटतात आणि द्राक्षारस सुद्धा गळून संपेल; नव्हे व्यर्थ जाईल.
38 "ताजा द्राक्षारस नवीन कातडी पिशव्यांतच भरला जाणे गरजेचे आहे, ते
नवीन कातडी पिशव्यांतच भरावयास हवे; 39 जुना द्राक्षारस प्याल्यावर नव्या
द्राक्षारसाचा आनंद कोणालाच होत नाही, तो असेच म्हणतो की जुना द्राक्षारस
अधिक चवदार व मजेदार होता"

6 1 एका शब्बाथ दिवशी येशू ख्रिस्त धान्याच्या शेतांतून जात होते, त्यावेळी
त्याचे शिष्य गव्हाची कणसें मोडून ती हातांवर चोळून खाऊ लागले.
2 काही परूशी म्हणाले, "धार्मिकदृष्टया, शब्बाथ दिवशी जे करावयास मनाई
केली आहे, तेच तुम्ही का करिता?" 3 येशूंनी त्यांना उत्तर दिले, "तुम्ही वाचले
नाही काय की दावीदाने त्या समयी काय केले, जेव्हा त्याला व त्याच्या
मित्रांना प्रचंड भूक लागली होती? 4 जी भाकर केवळ याजकच खाऊ शकत
होते, प्रार्थना मंदिरात/भवन जाऊन त्याने व त्याच्या सोबत्यानी त्या कशा
खाल्ल्या?" 5 तेव्हा येशू म्हणाले, "मनुष्याचा पुत्र शब्बाथ दिवसाचाही प्रभु/
स्वामी आहे." 6 आणखी एका शब्बाथ दिवशी येशू आराधनालयांत शिकवीत
होते. तेथेच एक मनुष्य होता ज्याचा उजवा हात वाळलेला होता. 7 यहूदी
धर्माचे विद्वान आणि परूशी या संधिच्या शोधांत होते की येशू, शब्बाथ दिवशी
त्याला बरे करितात की नाही, हे पाहावे. 8 येशूंनी त्यांच्या मनांतील विचार
ओळखले होते, त्यांनी वाळलेल्या हाताच्या माणसाला म्हटले, "येथे ये आणि
सर्वांच्या मध्ये उभा हो", म्हणून तो तेथे उभा झाला. 9 तेव्हा येशूंनी आपल्या
विरोधकांना म्हटले, "तुम्ही माझ्या प्रश्नाचे उत्तर दया. शब्बाथ दिवशी चांगले
कार्य करणे योग्य आहे की वाईट आहे? हा जीवन देण्याचा दिवस आहे की
जीवन घेण्याचा?" 10 येशूंनी सर्वांकडे, चारीं बाजूंना पाहून म्हटले, "आपला
हात पुढे कर, त्याने ज्याक्षणी आपला हात येशूंकडे लांब केला त्याचक्षणी त्याचा
हात बरा झाला. 11 हे पाहून येशूंचे शत्रु भयंकर संतापले आणि आपसांत सल्ला

मसलत व चर्चा करू लागले की या येशूंचे आपण करावे तरी काय? [12] यानंतर
काही समयानंतर येशू परमेश्वराशी सहभागिता (प्रार्थना) करावयास डोंगरावर
गेले आणि त्याठिकाणी त्यानी रात्रभर परमेश्वराशी प्रार्थना केली. [13] सकाळ
झाल्यावर येशूंनी आपल्या सर्व शिष्यांना बोलाविले आणि प्रेषित म्हणून
पाठविले जाण्यासाठी, बारा शिष्यांना वेगळे केले. त्यांची नांवे येणेप्रमाणे
होती. [14] शिमोन ज्याला पेत्र म्हटले आणि पेत्राचा भाऊ अंद्रिया आणि याकोब
व योहान व फिलिप्प आणि बर्थलमय; [15] आणि मत्तय व थोमा आणि अल्फीचा
मुलगा याकोब आणि शिमोन जो गिलोत म्हटला जातो. [16] याकोबाचा
मुलगा यहूदा आणि यहूदा इस्कर्योत ज्याने पुढे विश्वासघात केला. [17] येशू
शिष्यांसमवेत डोंगरावरून खाली आले आणि एका सपाट जमिनीवर, येशूंचे
शिष्य, इतर विश्वासू आणि एक मोठा लोकसमुदाय तेथे जमला. उत्तरेकडे
सोर व सिदोनाच्या समुद्रकाठापासून आणि सर्व यहूदीया व यरूशलेमेतून
आलेले लोक तेथे होते. [18] ते येशूंचे उपदेश ऐकण्याकरिता आणि सर्व प्रकारच्या
रोगांपासून बरे होण्यासाठी तेथे जमले होते; येशूंनी तेथे अशुद्ध आत्में असलेल्या
पीडितांना बरें केले. [19] येशूंतून सामर्थ्य निघून लोकांना स्वस्थ व निरोगी करीत
होते त्यामुळे प्रत्येक जण त्यांना स्पर्श करण्यास धडपडत होता, चिकाटीने
प्रयत्न करीत होता, येशूंनी सर्वांना बरेंही केले. [20] मग येशू आपल्या शिष्यांकडे
वळून त्यांना म्हणाले, "तुम्ही लोक खरोखर धन्य व आशीर्वादीत असे आहात,
कारण तुमच्याकडे काहीही नसतांना देखील तुम्ही परमेश्वर राज्याचे भागीदार
आहात. [21] सुखी आणि धन्य आहात तुम्ही ज्यांमध्ये आताही भूक शिल्लक आहे
कारण तुम्हीच तृप्त केले जाल आणि जरी तुम्ही आता रडत आहात, पण पाहा
नंतर तुम्ही हसाल. [22] जेव्हा माझ्यामुळे लोक तुमचा तिरस्कार- द्वेष करतील,
बहिष्कार करतील, तुमचा अनादर व अपमान करतील आणि तुम्हांला वाईट
समजून टाकून देतील, तेव्हा तुम्ही खरोखरच आशीर्वादीत ठराल/आहात.
[23] त्या दिवशी तुम्ही आनंद व उल्हासाने उत्सव साजरा करा, कारण यानंतर
स्वर्गात तुम्हांला यासाठी चांगले बक्षीस मिळणार आहे आणि हो, या लोकांच्या
पूर्वजांनी जुन्या व प्राचीन संदेष्टयांशीही असाच व्यवहार केला होता. [24] परंतु
तुम्ही जे संपन्न- धनवान लोक आहात, तुमच्यासाठी भविष्यात दुःखच दुःख
आहे कारण आताच तुम्ही सुख भोगलेले आहे. [25] तुम्ही जे वर्तमानकाळी तृप्त

आहात त्या तुम्हांला भूकेची जाणीव प्रकर्षाने जाणवेल, नव्हे तुम्हांला भूक
लागणार. तुमच्यावर हाय, जे आता तुम्ही हसत आहात कारण तुम्ही रडाल
आणि विलाप कराल. 26 तुमच्यावर हाय, ज्यावेळी लोक तुम्हांला चांगले
म्हणतील; कारण त्याचे पूर्वज देखील लबाड संदेष्टयांची अशीच वाहवा करीत
असत. 27 परंतु तुम्ही सर्व लोक जे माझे ऐकत आहात, मी तुम्हांला सांगतो की
आपल्या शत्रूंवर प्रेम करा आणि जे तुमचा तिरस्कार करितात, घृणा करितात
त्यांच्याकरिता कल्याणाची व चांगली कार्ये करा. 28 जे लोक तुमचे वाईट
इच्छीतात, त्यांना आशीर्वाद देऊन त्यांच्याकरिता कल्याणाचे शब्द उच्चारा
आणि जे तुमच्याशी वाईट व्यवहार करितात (वागतात) त्यांच्यासाठी प्रार्थना
करा. 29 जो तुमच्या गालावर मारितो, त्याला दुसऱ्या गालावरही मारून घेऊ
दया. जो तुमचा अंगरखा/शर्ट बळजबरीने हिसकू इच्छीतो, त्याला तुमची बंडी/
बनियान हिसकण्यापासून वंचित करू नका (विरोध करू नका). 30 जे तुम्हांला
मागतात, त्यांना द्या आणि जो तुमचे काही हिसकून घेतो, त्याला ते परत मागू
नका. 31 ज्या प्रकारच्या वागणूकीची आशा तुम्ही दुसऱ्यांशी करिता, तशीच
वागणूक तुम्हीही दुसऱ्यांशी करा. 32 जर तुम्ही त्याच लोकांवर प्रेम केले, जे
तुमच्यावर प्रेम करितात, तर त्यात काय मोठी गोष्ट आहे? दुष्टाई करणारे
लोकही आपल्यावर प्रेम करणाऱ्यांशी असेच वागतात. 33 जर तुम्ही त्या लोकांचे
साहाय्य करिता जे तुमचे साहाय्य करितात, तर कोणते मोठे कार्य तुम्ही करीत
आहात? कारण दुष्ट लोकही असेच तर करितात ना? 34 जर तुम्ही एखादयाला
उधार दिल्यानंतर परत त्या धनाची अपेक्षा करीत असाल, तर त्यात मोठी गोष्ट
ती काय आहे? दुष्ट लोक देखील दुष्टांना याच कारणास्तव उसने देतात की त्यांना
तितकेच परतही मिळेले, किंबहूना परत मिळण्याच्या अपेक्षेनेच ते देतात.
35 परंतु तुम्ही तुमच्या शत्रूंवर प्रेम करा, त्यांचे कल्याण करा, त्यांना उसनें
दया; म्हणजे पाहा, तुमच्यासाठीचे प्रतिफळ मोठे असेल आणि इतकेच केवळ
नव्हे तर तुम्ही परमप्रधानाचे संतानही ठराल, कारण आपला महान परमेश्वर
आभार मानणारे व न मानणारे (वाईट) या दोघांवर कृपाळू असणारा परमेश्वर
आहे. 36 जसा तुमचा पिता दयावंत आहे, तसेच तुम्ही दयाळू व्हा. 37 कोणावर
दोष लावू नका, म्हणजे तुमच्यावर दोष लाविला जाणार नाही; कोणाला
दोषी ठरवू नका म्हणजे तुम्ही दोषी ठरविले जाणार नाही; क्षमा करा म्हणजे

तुम्हांलाही क्षमा केले जाईल. [38] तुम्ही दया म्हणजे तुम्हालां दिले जाईल; लोक
माप दाबून-दाबून आणि हालवून हालवून आणि माप भरभरून तुमच्या पदरांत
घालतील कारण ज्या मापाने तुम्ही मापता, त्याच मापाने तुमच्याकरिता
मापून दिले जाईल." [39] मग येशूंनी त्यांना एक दाखला सांगितला, "आंधळा,
आंधळयाला मार्ग दाखवू शकतो काय? दोघे खडड्यांत पडणार नाहीत काय?
[40] शिष्य आपल्या गुरूपेक्षा श्रेष्ठ होऊ शकत नाही परंतु जो कोणी सिद्ध होईल
तो आपल्या गुरूसारखा होईल. [41] तू आपल्या भावाच्या डोळयांतील कुसळ का
पाहतो आणि आपल्या डोळयांतील मुसळ तुला दिसत नाही का? [42] आणि
जर आपल्या डोळयांतीलच तुला दिसत नाही तर तू आपल्या भावांला कसे
काय म्हणू शकतोस, की भाऊ, थांब, मी तुझ्या डोळयांतील कुसळ काढून
देऊ काय? अरे ढोंगी माणसा, आधी आपल्या डोळयांतील मुसळ स्वच्छ कर
म्हणजे तेव्हा जे कुसळ तुझ्या भावाच्या डोळयांत आहे, ते नीट व स्पष्टपणे तू
काढू शकशील. [43] चांगले झाड कधी वाईट फळ देत नाही आणि वाईट झाड
कधीही चांगले फळ देत नाही. [44] प्रत्येक झाडाची पारख व ओळख त्याच्या
फळांवरून होत असते, कारण लोक कांटेरी झाडांवरून अंजीर काढीत नाहीत
आणि रूद्राक्षाच्या झाडांवरून द्राक्षें काढीत नाहीत. [45] सज्जन मनुष्य आपल्या
चांगल्या अंतःकरणाच्या उत्तम भांडारांतून चांगल्या गोष्टी काढतो आणि दुष्ट
मनुष्य आपल्या अंतःकरणाच्या वाइट खजिन्यांतून वाईट गोष्टी काढतो, कारण
अंतःकरणात जे काही भरलेले असते, तेच त्याच्या तोंडातून बाहेर येते. [46] जर
तुम्ही माझे म्हणणे मानित नाही तर का मला हे प्रभू, हे प्रभू म्हणता? [47] जो
कोणी माझ्याजवळ येतो आणि माझे वचन ऐकून तसेच करितो, मी तुम्हांला
सांगतो की तो कोणासारखा आहे. [48] तो त्या मनुष्यासारखा आहे ज्याने घर
बांधतांना जमीन खोल खणली आणि खडकावर घराचा पाया घातला आणि
जेव्हा पूर आला तेव्हा त्या घरांवर पावसाची मोठी धार वेगाने पाऊस ओतत
होती, तरीही ती घराला हालवू शकली नाही कारण ते पक्के बांधलेले होते.
[49] पण जो ऐकून त्याप्रमाणे करीत नाही, तो त्या माणसासारखा आहे, ज्याने
जमिनीवर पाया न घालताच घर बांधले. जेव्हा त्यावर पावसाची धार वेगाने
पडली तेव्हा ते लगेच कोसळले आणि त्याचा संपूर्ण नाश झाला."

7 1 लोकांना या सर्व गोष्टी सांगितल्यानंतर येशू कफर्णहूमास गेले.
2 त्याचसमयी एका मोठया रोमी अधिकाऱ्याचा एक दास आजारी
पडल्यामुळे मृत्यु येण्याच्या अवस्थेत होता. 3 येशूंविषयी ऐकल्यावर त्याने काही
यहूदी वडील मंडळीला त्यांच्याकडे बोलावयास पाठविले की येशूंनी येऊन
त्यांच्या दासाला बरें करावे. 4 वडील मंडळी येशूकडे आली आणि म्हणाली,
'रोमी अधिकारी अशाच योग्यतेचा आहे की आपण त्याच्याकरिता हे करावे;
5 कारण तो यहूदी लोकांवर प्रेम करितो, त्यानेच आमच्यासाठी आराधनालय
बांधले आहे." 6 तेव्हा येशू त्या लोकांबरोबर निघाले. जेव्हा येशू घरापासून फार
लांब नव्हते तेव्हाच रोमी अधिकाऱ्याने आपल्या काही मित्रांद्वारे असा निरोप
पाठविला की, येशूंनी घरी येण्याचे कष्ट घेऊ नये, कारण तो स्वतः इतक्या
योग्यतेचा नाही की येशूंनी त्याच्या घरी यावे. 7 तो म्हणाला, "याच कारणामुळे
आपल्याकडे येण्यास मी संकोच बाळगित होतो; पण आपण केवळ शब्द बोला
म्हणजे माझा दास बरा होईल." 8 कारण माझ्याजवळ देखील अधिकार व
ताबा आहे आणि सैनिक माझ्या आधीन आहेत. मी एकाला म्हणतो, 'जा'
तर तो जातो, दुसऱ्याला म्हणतो, 'ये' तर तो येतो, 'हे कर' तर तो करतो."
9 हे ऐकल्यावर येशूंना त्या व्यक्तिचे आश्चर्य वाटले आणि आपल्याबरोबर
चालणाऱ्या लोकांच्या गर्दीला संबोधून येशू म्हणाले, "हे अगदी खरे आहे की
इस्त्राएली लोकांतही मी असा विश्वास पाहिला नाही." 10 पाठविलेले लोक
जेव्हा घरी परतले, तेव्हा त्यानी दासाला अगदी स्वस्थ असे पाहिले, तो पूर्णपणे
बरा झालेला होता. 11 दुसऱ्या दिवशी लोकांची गर्दी, येशू ख्रिस्तांचे सर्व
शिष्य आणि येशू नाईन नांवाच्या गावी पोहचले. 12 गावाच्या फाटकाजवळ
पोचल्यावर एका तरूणाचे मृत शरीर (प्रेत) गावाबाहेर नेले जात होते. तो
आपल्या विधवा आईचा एकुलता एक मुलगा होता आणि त्या गावातला एक
मोठा समूह तिरडीच्या (आणि विधवेच्या) बरोबर होता. 13 त्या विधवेला
पाहून येशूंना तिची कीव आली, कळवळून ते तिला म्हणाले, "रडू नको."
14 जवळ जाऊन येशूंनी तिरडीला स्पर्श केला आणि त्याची तिरडी उचलणारे
ताबडतोब तेथेच थांबून गेले. येशू म्हणाले, "हे तरूण मुला, उठून बैस" 15 त्याच
क्षणी तो मृत तरूण उठून बसला आणि बोलू लागला. येशूंनी त्याला त्याच्या
आईच्या स्वाधीन केले. 16 प्रत्येकावर भयाची दाट छाया पसरली आणि सर्वजण

परमेश्वराची स्तुति-प्रशंसा करून म्हणू लागला की, "आमच्यामध्ये एक मोठा
संदेष्टा उदय पावला आहे आणि परमेश्वराने आमची भेट घेतली आहे." 17 संपूर्ण
यहूदीयांत आणि आसपासच्या सर्व क्षेत्रांत ही गोष्ट पसरली. 18 या गोष्टींची
सूचना योहानाच्या शिष्यांनी योहानाला दिली. 19 आपल्या शिष्यांतून दोन
शिष्यांना बोलावून योहानाने येशूंकडे हे विचारावयास पाठविले की, जे येणार
होते ते आपणच आहात की आम्ही दुसऱ्या कोणाची प्रतिक्षा करावी. 20 ते
दोघे येऊन येशूंना विचारू लागले, "योहान बाप्तिस्मा करणाऱ्याने आम्हांला
आपल्याजवळ असे विचारावयास पाठविले आहे की जे येणार होते, ते आपणच
आहात किंवा आम्ही दुसऱ्या कोणाची प्रतिक्षा करावी." 21 त्याचवेळी येशू
ख्रिास्तांनी अनेक लोकांना त्यांच्या आजारापासून, कष्ट व पिडेपासून,
दुष्टात्म्याच्या पीडेतून लोकांना मुक्त केले आणि आंधळयांना (डोळस)प्रकाश
दिला. 22 त्यांना उत्तर देत येशू म्हणाले, "जे काही तुम्ही पाहिले आहे, ऐकिले
आहे, ते सर्व जाऊन योहानाला सांगा की आंधळे पाहतात, पांगळे/लंगडे
चालतात आणि कोढी शुद्ध होतात, बहिरे ऐकतात, मृतक उठविले जातात
आणि गरजू व गरीबांना सुवार्ता सांगितली जाते. 23 आणि फायदयात तोच
आहे जो माझ्यामुळे कोणत्याही अडखळणात पडणार नाही." 24 जेव्हा ते
संदेशवाहक परत गेले, तेव्हा योहानाविषयी येशू, लोकांना म्हणूं लागले, "तुम्ही
लोक जंगलात काय पाहावयास गेला होतात? वाऱ्याने हालविलेला बोरू ?
25 पण तुम्ही काय पाहण्यास गेला होता? तलम वस्त्रें घातलेल्या व्यक्तिला?
पाहा, जे बहूमुल्य उंची वस्त्रें घालतात ते राजमहालांत राहतात. 26 पण मग
तुम्ही तेथे काय पाहण्यास गेला होता? एक संदेष्टा? होय, संदेष्टयांपेक्षा एका
श्रेष्ठ व्यक्तिला. 27 याच्याविषयीच लिहिले आहे की, "पाहा, मी तुझ्यापुढे
एक संदेश वाहक पाठवितो, जो तुझ्या येण्यापूर्वी तुझ्या येण्याची तयारी
करील, तुझ्या मार्गाची तयारी करील. 28 मी तुम्हांला सांगू इच्छीतो की
पाहा, स्त्रियांपासून जन्म घेणाऱ्या लोकांत, योहानाहून श्रेष्ठ/मोठा कोणी
नव्हता. परंतु तरी परमेश्वराच्या राज्यात जो सर्वात लहान समजला जातो तो
योहानापेक्षा श्रेष्ठ आहे. 29 जेव्हा सर्व लोकांनी या गोष्टी ऐकल्या तेव्हा कर-
वसुली करणाऱ्या लोकांनी मान्य करीत म्हटले की परमेश्वराचा मार्गच योग्य
आहे, कारण योहानाने त्यांचा बाप्तिस्मा केलेला होताच. 30 परंतु परूशी आणि

धर्मशास्त्र्यांनी परमेश्वराचा मार्ग फेटाळला कारण त्यांनी योहानाचा बाप्तिस्मा
घेतला नव्हता अर्थात त्यानी त्याला नकार दिला होता. 31 येशू म्हणाले, "मी
या पिढीच्या लोकांची तुलना कोणाशी करू? ते कशा प्रकारचे लोक आहेत ते
मी कसे सांगू? 32 ते त्या मुलांसारखे आहेत जे बाजारांत आपल्या मित्रांना
हाका मारून म्हणतात, आम्ही तुमच्यासाठी बासरी वाजविली, पण तुम्ही
नाच दाखविला नाही, मग आम्ही आक्रोश केला (मोठयाने रडलो) तरीही
तुम्ही रडला नाही!" 33 योहान बाप्तिस्मा करणारा भाकर खात नव्हता आणि
द्राक्षारसही पीत नव्हता, तरीही तुम्ही त्याला दुष्टात्माग्रस्त व्यक्ती म्हणत
होता. 34 दुसरीकडे, मनुष्याचा पुत्र भाकर खातो आणि द्राक्षारस पीतो आणि
तुमच्या दृष्टीत तो खादाड, दारू पिणारा, कर गोळा करणाऱ्यांचा आणि दुष्ट
लोकांचा मित्र आहे. 35 पण ज्ञान तेच लोक पारखू शकतात जे खरोखर स्वतः
ज्ञानी आहेत." 36 त्यांच्यापैकी एका परूश्याने येशूंना विनंती केली की त्यांनी
त्याच्याकडे भोजनाकरिता यावे; म्हणून येशू त्याच्या घरी गेले. 37 त्याच गावात
एक चरित्रहीन स्त्री राहात असे. येशू, परूश्याच्या घरी जेवावयास बसले आहेत
ही खबर ऐकल्यावर ती एक सुगंधी तेलाची अलाबास्त्र कुपी घेऊन आली.
38 ती येशूंच्याजवळ मागे उभी राहून रडून रडून आपल्या अश्रूंनी येशूंचे पाय
भिजवूं लागली आणि आपल्या डोक्याच्या केसांनी ते पुसू लागली. येशूंच्या
पायांचे तिने वारंवार मुके घेतले आणि त्यांवर सुगंधी तेल मळिले/ओतले.
39 त्या परूश्यांनी मनांत असा विचार केला की, "जर येशू संदेष्टा असते तर
त्यानी ओळखिले असते की त्यांना स्पर्श करणाऱ्या स्त्रीचे चरित्र वाईट आहे,
ती पापी आहे." 40 येशू त्याला म्हणाले, "शिमोना, मला तुला काही सांगायचे
आहे." शिमोन म्हणाला, "गुरूजी आपण बोलावे." 41 एका सावकाराचे दोन
कर्जदार होते; एकावर पांचशे चांदीची नाणी आणि दुसऱ्यावर पन्नास चांदीची
नाणी एवढे कर्ज होते. 42 जेव्हा कर्जाची रकम त्यांना परत चुकती करिता
आली नाही तेव्हा त्या सावकाराने त्या दोघांना त्यांतून सोडले (क्षमा केली);
आता मला हे सांग की त्या दोघांपैकी कोण त्याच्यावर विपुल प्रेम करील?"
43 शिमोन म्हणाला, "मला वाटते की ज्याचे अधिक कर्ज क्षमा केले गेले, तो
त्याच्यावर अधिक प्रेम करील." येशू म्हणाले, तू अगदी खरे बोललास" 44 त्या
स्त्रीकडे वळून येशू शिमोनाला म्हणाले, "तुम्ही या स्त्रीला पाहत आहेस ना? मी

तुमच्या घरी आलो आणि तुम्ही माझे पाय धुण्याकरिता पाणी दिले नाही. पण
हिने माझे पाय आपल्या अश्रूंनी धुतले आणि ते आपल्या केसांनी पुसले. 45 तुम्ही
माझा मुका घेतला नाही पण मी येथे आल्यापासून ती माझ्या पायांचे मुके घेत
आहे, 46 तुम्ही माझ्या डोक्यावर तेल ओतले नाही पण हिने माझ्या पायांवर
सुगंधी तेल ओतलेले आहे. 47 म्हणून मी म्हणतो की हिचे पुष्कळ पाप क्षमा केले
गेले आहेत, कारण हिने पुष्कळ प्रेम केले आहे. परंतु ज्याचे कमी क्षमा केले गेले
तो कमी प्रेम करतो." 48 येशू त्या स्त्रीला म्हणाले, "बाई, तुझे पाप/अपराध क्षमा
केले गेले आहेत." 49 येशूंबरोबर भोजनास बसणारे दुसरे लोक आपसांत म्हणू
लागले, "हा कोण आहे जो अपराधही क्षमा देऊ शकतो?" 50 येशू त्या स्त्रीला
म्हणाले, "तुझ्या विश्वासाने तुझा उद्धार करून तुला वाचविले आहे, आनंदाने
जा."

# 8

1 यानंतर लगेच येशू परमेश्वर राज्याची सुवार्ता गाजवित गावोंगावी फिरू
लागले आणि त्यांच्याबरोबर त्यांचे बारा प्रेषितही सुवार्तेचे कार्य करीत
राहिले. 2 तेथे त्यांच्याबरोबर काही स्त्रियाही होत्या ज्यांच्यात दुष्ट आत्मे होते
आणि ज्या त्यांपासून आणि इतर प्रकारच्या अशक्तपणापासून मुक्त केल्या गेल्या
होत्या : त्यांत, ज्या मग्दालीया मरीयेंतून सात दुष्टात्में निघाले होते, 3 आणि
हेरोदाचा भंडारी खुजा याची पत्नी योहान्ना आणि सुसान्ना व इतर अनेक स्त्रिया
या सर्व होत्या, त्या आपल्या संपत्तितून येशूंच्या सेवाकार्यात आपला सहयोग
देत असत. 4 जेव्हा चा बाजूच्या गांवातून आलेला एक मोठा लोकसमुदाय
येशूंकडे जमा झाला तेव्हा येशू त्यांना दाखला देऊन शिकवू लागले. 5 "एक
पेरणारा बी पेरावयास निघाला. जेव्हा तो पेरीत होता तेव्हा काही बी
रस्त्याच्या बाजूला/काठावर पडले आणि पायांखाली तुडविले गेले आणि
पक्ष्यांनी येऊन ते टिपून खाल्ले. 6 आणि काही बी खडकाळ जमिनीवर पडले
आणि जसे अंकूरित झाले तसेच ओलाव्याच्या अभावी ते वाळून गेले. 7 काही बी
काटेरी झुडपांत पडल्यामुळे त्यांची वाढ त्यांच्याबरोबर झाली आणि काटयांनी
त्यांची वाढ दाबून/खुंटवून टाकली. 8 आणि काही बी सुपीक जमिनींत पडले,
ते उगवून वाढले आणि शंभरटक्के फळवंत झाले." हे सर्व सांगून झाल्यानंतर
येशू मोठयाने म्हणाले, ज्याला ऐकण्यात रस आहे, ज्याची इच्छा आहे त्याने

आता ऐकावे." 9 येशूंच्या शिष्यांनी त्यांना विचारले, "या दाखल्याचा अर्थ काय
आहे गुरूजी?" 10 येशू त्यांना म्हणाले, "परमेश्वर राज्याची रहस्यें/गूढें समजून
घेण्याचे दान तुम्हांला दिलेले आहे, परंतु दुसऱ्या लोकांना मी दाखल्यांनी
शिकवितो की पाहून त्यांनी पाहू नये, ऐकून त्यांना समजू नये. 11 "दाखला
असा आहे : बी म्हणजे परमेश्वराचे शब्द/वचन". 12 वाटेच्या काठावर पडलेले
ते लोक आहेत, जे ऐकतात, तेव्हा सैतान येऊन त्यांच्या अंतःकरणांतून ते शब्द
काढून घेतो यासाठी की लोकांनी ऐकून उद्धार प्राप्त करू नये. 13 खडकाळीवरचे
लोक हे आहेत जे ऐकून आनंदाने शिकवण ग्रहण करितात, परंतु त्यांची मूळें
खोल नसल्यामुळे ते काही काळ विश्वास ठेवतात, पण परीक्षेच्या समयी मागे
हटतात, न टिकता गळून पडतात. 14 जे काटेरी झुडपांत आहेत ते हे आहेत, जे
वचनें ऐकल्यानंतर त्यांत वाढतात, परंतु संसाराच्या चिंता, या जीवनांतील
सुख-चैन आणि संपत्ति यांच्या मोहांत फसून जातात आणि त्यांची वाढ खुंटून ते
कुचकामी होतात. 15 परंतु सुपीक जमिनीवर पडणारे बी म्हणजे ते लोक, जे
संदेश ऐकून चांगल्या अंतःकरणात ते सांभाळून ठेवितात आणि धीर बाळगून
फळें उत्पन्न करितात. 16 दिवा लावून कोणी तो एखादया भांडयाखाली झाकून
किंवा खाटेखाली ठेवित नाही, पण तो दीवा दीपदानावर ठेवतो म्हणजे जे आत
येतात, त्यांना त्याचा उजेड दिसतो, प्रकाश मिळतो. 17 कारण असे काही गुप्त
नाही जे नेहमी गुप्त राहील, असे काही लपलेले नाही जे नेहमीकरिता लपून
राहील. 18 म्हणून याविषयी सजग आणि सावध असा की तुम्ही कसें ऐकता?
कारण ज्याच्याजवळ आहे त्याला दिले जाईल; आणि ज्याच्याजवळ नाही
त्याच्याजवळ त्याचे जे काही आहे ते सर्व घेतले जाईल." 19 तेव्हा येशूंची आई
आणि भाऊ त्यांना भेटावयास आले परंतु लोकांच्या दाटीमुळें त्यांना जवळ
येऊन भेटता आले नाही. 20 येशूंना कोणी सांगितले की, "आपली आई आणि
भाऊ बाहेर आपली वाट पाहात आहेत." 21 येशू उत्तर देऊन त्यांना म्हणाले,
"माझी आई आणि भाऊ ते सर्वजण आहेत जे माझे वचन/शब्द ऐकून त्याचे
तसेच पालन करितात जसे मी त्यांना सांगतो." 22 एके दिवशी असे झाले की
जेव्हा येशू आपल्या शिष्यांसह नावेत होते, तेव्हा येशू त्यांना म्हणाले, "चला,
आपण सरोवराच्या त्या पलीकडे जाऊ या". आणि त्यानी नाव त्या दिशेने
हाकारली. 23 जेव्हा ते जात होते तेव्हा येशूंचा डोळा लागला. सरोवरांत प्रचंड

तूफानी वादळ सुटले; त्यांच्या नावेत पाणी भरू लागले आणि ते सर्व मोठया
धोक्यात पडले. 24 येशूंजवळ येऊन त्यानी त्यांना जागे केले आणि म्हणाले,
"स्वामी, गुरूजी! आता तर आम्ही मरून जाऊ/बुडू". येशू जागे झाले आणि
त्यांनी वारा आणि उठणाऱ्या लाटांना धमकाविले; वारा आणि लाटांचा कल्होळ
लगेच क्षणांतच थांबला आणि सगळीकडे शांत झाले. 25 येशू शिष्यांना म्हणाले,
"कोठें आहे तुम्हां सर्वांचा विश्वास?" तेव्हा भयभीत व स्तंभित होऊन ते
एकमेकाला विचारू लागले, "हें आहेत तरी कशा प्रकारचे मनुष्य! हे आहेत तरी
कोण, कारण वारा आणि पाण्यास, जेव्हा ते आज्ञा देतात तेव्हा ते त्यांची आज्ञा
पाळून त्याचे ऐकतात." 26 सरोवराच्या पलीकडे असलेल्या गालील समोरच्या
गरसेकरांच्या प्रदेशाकडे नावेने ते पोचले. 27 जेव्हा येशू जमिनीवर उतरले
तेव्हा त्यांची भेट एका अशा मनुष्याशी झाली जो दुष्टात्म्यांनी ग्रस्त झालेला
होता. तो वस्त्र घालित नव्हता आणि घरी न राहतां कबरांत राहात होता.
28 त्याने येशूंना पाहिले आणि मोठयाने ओरडून त्यांच्या पायाशी पडला आणि
उंच आवाजात म्हणाला, "परमेश्वराचे पुत्र येशू, मी आपल्याला विनंती करितो
की मला पीडा देऊ नका." 29 कारण त्याच्याठायी असलेल्या दुष्टात्म्याला येशूंनी
हुकूम दिला आणि आज्ञा केली होती की त्याने, त्या मनुष्यातून निघून जावे;
कारण त्यानी त्याला अनेक वेळां घेरून झपाटले होते. त्याला जाड साखळयांनी
आणि बेडयांनी बांधून विशेष पहाऱ्यांत ठेविले जात असे. तो साखळया तोडून
टाकित असे आणि त्याच्यातील भूत त्याला जंगलाकडे घेऊन जात असत.
30 येशूंनी त्याला विचारिले, "तुझे नांव काय आहे?" तो म्हणाला, "सैन्य!
कारण त्याच्याठायी अनेक दुष्टात्में सामावलेले होते. 31 त्या दुष्टात्म्यांनी/भुतांनी
येशूंना अशी विनंती केली की, त्यांनी त्यांना अधोलोकात जाण्याची आज्ञा
देऊ नये. 32 त्याच ठिकाणी डोंगरावर डुकरांचा एक मोठा कळप चरत होता.
दुष्टात्म्यांनी येशूंना विनंती करीत म्हटले, "आम्हांला त्या डुकरांत जाऊ दया;
येशूंनी तसेच होऊ दिले. 33 तेव्हा ती भुतें त्या माणसातून निघून डुकरांठायी
शिरली(प्रवेश केला). तो संपूर्ण कळप धावत सुटला, डोंगराच्या कडयावरून
खाली सरोवरात पडला आणि बुडून मेला. 34 त्या कळपांची देखरेख करणारी
माणसें झालेले ते सर्व पाहून पळाली आणि गावात जाऊन त्यानी हे वर्तमान
सर्वांना सांगितले. 35 लोकांनी जेव्हा ऐकले तेव्हा ते पाहण्याकरिता आले आणि

येशूंच्या चरणांशी बसलेला तो दुष्टात्माग्रस्त वस्त्रें नेसून, व्यवस्थित मानसिक
अवस्थेंत पाहून ते सर्वचे सर्व भयभीत झाले. 36 जे लोक त्या भूतग्रस्ताला
ओळखित होते, त्यांनी गांवातील लोकांना वर्णन करून सांगितले की तो मनुष्य
कशा रीतीने बरा झाला. 37 मग गरसेकरांच्या आसपासच्या प्रदेशांतील सर्वच
लोक येशूंना तेथून निघून जाण्याची कळकळीने विनंती करू लागले कारण
ते अतिशयच घाबरलेल्या दशेत होते; म्हणून येशू नावेत बसून तेथून निघून
गेले. 38 तो भुतग्रस्त व्यक्ती, येशूंना अशी विनंती करू लागला की त्यांनी
त्याला आपल्याजवळ राहू दयावे. 39 पण येशूंनी त्याला असे म्हणून घरी परत
जावयास सांगितले की, "आपल्या घरी परत जाऊन, परमेश्वराने तुझ्यासाठी
कशी महान कार्ये केली हे सर्वांना सांग"; तो व्यक्ती गावभर फिरून या गोष्टीची
घोषणा करीत फिरला की येशूंनी त्याच्यासाठी किती मोठी कार्ये केली होती.
40 येशू परत आल्यावर लोकांनी मोठया आनंदाने त्यांचे स्वागत केले, कारण
ते सर्वजण येशूंची वाट पाहातच होते. 41 त्याच समयी, याईर नांवाचा एक
व्यक्ती तेथे आला. तो एका आराधनालयाचा प्रबंधक होता. येशूंच्या चरणी
पडून त्याने त्यांना प्रार्थना-विनंती केली की येशूंनी त्याच्या घरी यावे. 42 त्याला
बारा वर्षांची एकुलती एक मुलगी होती, ती मृत्यूच्या दशेत होती. येशू जेव्हा
याईराच्या घराकडे जाऊ लागले तेव्हा लोकांचा एक मोठा समुदाय त्यांच्यावर
जणू आदळू पाहात होता, प्रचंड गर्दी झाली होती. 43 तेव्हा एक स्त्री, जिने
बारा वर्षापासून तिला होणाऱ्या रक्तस्त्रावांपासून बरे होण्यासाठी आपला सर्व
पैसा डॉक्टर/वैदय यांच्यावर खर्च करून टाकिला होता, पण तरी बरी झाली
नव्हती, 44 तेथे येशूंच्या मागून आली आणि तिने गुप्तपणें येशूंच्या वस्त्राचे एक
टोक शिवून, ज्या क्षणी स्पर्श केला त्याच क्षणी तिचा रक्तस्त्राव थांबला. 45 येशू
म्हणाले, "मला कोणी स्पर्श केला?" सर्वजण नाही म्हणू लागले तेव्हा पेत्र आणि
त्याचे सोबती येशूंना म्हणाले, "स्वामी, गुरूजी, लोक गर्दी करून आपल्याला
दाटीवाटीमुळे चेंगरून टाकित आहेत आणि आपण विचारता की, कोणी मला
स्पर्श केला?" 46 येशूंनी उत्तर दिले, "कोणीतरी मला स्पर्श केलेलाच आहे कारण
माझ्यांतून सामर्थ्य निघाल्याचा अनुभव मला झालेला आहे." 47 जेव्हा त्या
स्त्रीने पाहिले की आता मी लपू शकत नाही, तेव्हा ती घाबरत-घाबरत आली
आणि येशूंच्या चरणाशी पडून तिने सांगितले की, येशूंना तिने का स्पर्श केला

होता आणि मग ती कशाप्रकारे अगदी बरी झाली होती. 48 येशू तिला म्हणाले,
"मुली-बेटी, तुझ्याठायी जो विश्वास होता, त्याच विश्वासाने तुला बरें केले
आहे, आता आनंदाने जा." 49 याच दरम्यान, आराधनालयाच्या प्रबंधकाच्या
घरून कोणीतरी आले आणि त्याने ही खबर दिली की त्याची आजारी मुलगी
मेली आहे आणि आता येशूंना त्रास (कष्ट) देण्याची गरज नाही. 50 येशूंनी ते
ऐकले आणि उत्तर दिले, "भिऊ नका, केवळ विश्वास बाळगा, भरंवसा ठेवा
आणि मुलगी जिवंत/बरी होईल". 51 प्रबंधकाच्या घरी येऊन येशूंनी पेत्र,
योहान, याकोब आणि मुलीचे आईवडील यांनाच आपल्याबरोबर आत येऊ
दिले. 52 इकडे बाहेर लोक तिच्यासाठी रडत आणि विलाप करीत होते परंतु
येशू म्हणाले, "रडू नका, ती मेली नाही, झोपेंत आहे." 53 येशूंचे बोलणे ऐकून
लोक हसू लागले, कारण ती मेली होती हे त्यानी पाहिले होते. 54 येशूंनी मुलीचे
हात धरून तिला म्हटले, "मुली, ऊठ!" 55 त्याचक्षणी तिचा आत्मा तिच्याठायी
परत आला, ती लागलेच उठून बसली. येशूंनी तिच्या आईवडीलांना आज्ञा
केली की, तिला खावयास काही दिले जावे. 56 मुलीचे आईवडील आश्चर्यचकित
झाले, विस्मयाने भरून गेले परंतु येशूंनी त्यांना निक्षून(बजावून) निर्देश केला
की घडलेली गोष्ट त्यांनी कोणालाही सांगता कामा नये.

9 1 तेव्हा येशूंनी बारा शिष्यांना बोलाविले आणि त्यांना सर्वप्रकारची
भूतें-प्रेतात्मा-दुष्टात्मा यांना काढण्याची ताकद-सामर्थ्य-योग्यता आणि
अधिकार दिला, 2 त्यानी त्यांना परमेश्वर राज्याची सुवार्ता गाजविण्याकरिता
आणि सर्व रोग बरें करून रोग्यांना मुक्त करण्याकरिता पाठविले. 3 येशू
त्यांना म्हणाले, "जातांना वाटेसाठी काहीही सोबत घेऊं नका; काठी, झोळी,
भाकरी, रूपये आणि अंगरखेही दोन दोन घेऊं नका. 4 आणि ज्या घरी तुम्ही
आधी पोचाल, त्याच घरी वास्तव्य करा आणि तेथूनच निरोप घ्या. 5 जो
कोणी तुमचे स्वागत करीत नाहीत, त्या गावातून निघतांना आपल्या पायांची
धूळ झाडून टाका म्हणजे त्यांच्याविरूद्ध साक्ष होईल." 6 म्हणून शिष्य तेथून
निघाले, गावोंगावी जाऊन आणि फिरून, प्रत्येक ठिकाणी लोकांना बरें
करीत राहिले. 7 देशाच्या चौथ्या भागाचा राजा हेरोद, हे सर्व ऐकून प्रचंड
घाबरला, कारण काही लोक असे म्हणत होते की योहान मेलेल्यांतून जिवंत

झाला आहे. 8 काही लोक म्हणत होते की हा तर एलीया आहे आणि इतर
म्हणत होते की प्राचीन-जुन्या संदेष्टयांपैकी कोणीतरी पुन्हा झाला (उठला)
आहे. 9 हेरोद म्हणाला, "योहानाचा शिरच्छेद मी स्वतः केला, त्याचे डोके
मी स्वतः उडविले होते, मग हा मनुष्य कोण आहे ज्याच्याविषयी मी ऐकतो
आहे?" हेरोद त्यांना भेटण्याची इच्छा धरीत होता. 10 प्रेषित परत आल्यावर
त्यानी सर्व गोष्टींविषयी सविस्तर सांगितले ज्या त्यांनी केल्या होत्या. तेव्हा
येशू त्यांना बेथसैदाच्या एकांत जागी घेऊनच गेले. 11 लोकांना कळले आणि ते
येशूंना भेटावयास आले आणि येशूंनी त्यांची भेट घेतली आणि त्यांना परमेश्वर
राज्याविषयी शिकविले आणि आजारी लोकांनाही बरें केले. 12 संध्याकाळ
होणार होती, दिवस उतरू लागला होता, तेव्हा बारा प्रेषित येशूंकडे येऊन
म्हणाले, "लोकांच्या गर्दीला निरोप दिला पाहिजे म्हणजे आजूबाजूच्या
प्रदेशांत (भागांत) जाऊन ते स्वतःसाठी राहण्याचा आणि भोजनाचा प्रबंध
करू शकतील कारण हे जंगलाचे क्षेत्र आहे." 13 परंतु येशू त्यांना म्हणाले,
"तुम्हीच त्यांना खावयास काही दया." आणि ते म्हणाले, "पांच भाकरी आणि
दोन मासे याव्यतिरीक्त आमच्याजवळ काहीही नाही." तेथे सुमारे पांच हजार
पुरूष होते. 14 येशू त्यांना म्हणाले, पन्नास पन्नास लोकांची रांग करून त्यांना
बसवा." 15 शिष्यांनी लोकांना तशाचप्रकारे बसविले. 16 तेव्हा येशूंनी भाकरी
व मासे हातांत घेतले, आकाशाकडे पाहून आभार मानिले आणि भाकरी मोडून
तुकडे-तुकडे करून आपल्या शिष्यांना देत गेले आणि लोकसमुदायाला ते वाढले
गेले. 17 सर्व लोकांनी भरपूर खाल्ल्यानंतर त्यानी उरलेल्या तुकडयांच्या बारा
टोपल्या उचलून घेतल्या. 18 जेव्हा येशू एकांतात प्रार्थना करीत होते आणि
शिष्य त्यांच्याबरोबर होते, तेव्हा येशूंनी त्यांना विचारले, "माझ्याविषयी
लोकांचा काय विचार आहे?" 19 ते म्हणाले, "आपण योहान बाप्तिस्मा करणारा
किंवा एलीया आहात असे काहीजण म्हणतात, पण दुसऱ्यांच्या मते, प्राचीन
समयाच्या संदेष्टयांपैकी कोणीएक पुन्हा उठला आहे." 20 येशूंनी त्यांना
विचारले, "परंतु तुम्ही मला काय म्हणता? पेत्राने उत्तर दिले, "परमेश्वराचा
ख्रिस्त." 21 तेव्हा येशूंनी त्यांना बजावून आज्ञा केली की, "ही गोष्ट कोणालाच
कळता कामा नये." 22 आणखी येशू त्यांना असेही म्हणाले, "हे आवश्यक आहे
की मी पुष्कळ दुःख भोगावे आणि प्राचीन/वडील मंडळी, मुख्य याजक आणि

शास्त्री यांच्याद्वारे तुच्छ लेखिले जावे आणि जिवें मारले जावे आणि तिसऱ्या
दिवशी जिवंत उठविले जावे." 23 तेव्हा येशू त्या सर्वांना म्हणाले, "जर कोणी
माझ्यामागे येण्याची इच्छा बाळगतो, त्याने आपल्या पद्धतीने वागणे सोडून
दयावे ('स्व' ला नाकारावे), प्रत्येक दिवशी आपला क्रूस उचलून आणि माझ्या
इच्छेप्रमाणे करावे. 24 कारण जो कोणी आपला जीव वाचविण्याचा प्रयत्न
करेल, तो त्याला गमावील, परंतु जो कोणी माझ्याकरिता जगेल, तो आपला
जीव वाचवील. 25 जर मनुष्य संपूर्ण जग मिळवून आपला आत्मा गमावतो
किंवा आपल्या आत्म्याचा नाश करून घेत असेल, तर त्याला काय फायदा
होईल? 26 जो कोणी माझी व माझ्या वचनांविषयी या जगात लाज बाळगतो,
मी देखील स्वत:च्या, आपल्या पित्याच्या आणि पवित्र परमेश्वरदूतांच्या
वैभवाने जेव्हा येईन, तेव्हा त्याची लाज बाळगेन. 27 मी तुम्हांला निश्चित आणि
सत्य सांगतो की जे येथे उभे आहेत, त्यांपैकी कितीतरी असे आहेत की तोपर्यंत
ते परमेश्वराचे राज्य पाहात नाही, जोपर्यंत ते मृत्यु चाखणारच नाहीत." 28 या
गोष्टी झाल्यानंतर, आठ दिवसानंतर येशू, पेत्र, योहान आणि याकोब यांना
आपल्याबरोबर घेऊन परमेश्वराशी सहभागिता (प्रार्थना) करण्यासाठी गेले.
29 जेव्हा येशू प्रार्थना करीत होते, तेव्हा त्यांचा चेहरा बदलला, मुखाचें रूप
बदलले, त्यांचे वस्त्र शुभ्र झाले आणि चमकू लागले. 30 एकाएकी, मोशे आणि
एलीया, त्यांच्याशी वार्तालाप करतांना दिसले. 31 ते लोक अलौकिक तेजाने
भरलेले होते आणि येशूंच्या मृत्यूविषयी अर्थात येशू जे निर्गमन यरूशलेमेत पूर्ण
करणार होते त्याविषयी संभाषण करीत होते. 32 पेत्र आणि त्याचे सोबती
झोपेच्या अवस्थेत होते आणि जेव्हा त्यांना चेतना आली तेव्हा त्यांनी येशूंचे
महिमामय रूपांतर आणि त्यांच्याबरोबर दोन पुरूष उभे असलेले पाहिले.
33 मोशे आणि एलीया गेल्यानंतर, पेत्र येशूंना म्हणाला, "स्वामी, आमच्यासाठी
येथेच असणे बरें आहे, म्हणून आम्ही तीन तंबू उभारू, एक आपल्यासाठीचा,
एक मोशेसाठीचा आणि एक एलीयासाठीचा; बेभान होऊन पेत्र काहीतरी
बोलला होता. 34 त्याचे हे बोलणे चालू असताच, एका मेघाने येऊन त्यांना
वेढिले व आच्छादिले आणि ते घाबरले. 35 त्या मेघांतून एक वाणी आली ती
अशी : "हा माझा प्रिय-लाडका पुत्र आहे, याचे ऐका." 36 वाणी झाल्यानंतर,
येशू एकटेच आढळले. शिष्य शांत उभे राहिले आणि नंतर त्यानी या सर्व

गोष्टी कोणाला सांगितल्या नाहीत. 37 दुसऱ्या दिवशी जेव्हा ते डोंगरावरून
खाली आले तेव्हा पुष्कळ लोक येशूंना भेटावयास आले. 38 अचानक त्या
लोकसमुदायातून एक मनुष्य मोठयाने ओरडला, "गुरूजी, पाहा, माझ्याजवळ
हा एकुलता एकच मुलगा आहे, 39 एक आत्मा त्याला पकडतो आणि तो
मोठयाने ओरडतो. तो आत्मा त्याला पिळतो, ठेंचतो आणि काही केल्या
सोडित नाही, 40 यास्तव, मी आपल्या शिष्यांना विनंती केली की त्यांनी तो
आत्मा काढून टाकावा, पण त्यांना त्यांत यश आले नाही." 41 येशू म्हणाले,
"अहो विश्वासहीन व हट्टी लोकहो, मी कोठवर तुमच्याबरोबर सहन करीत
राहणार? आपल्या मुलाला येथे घेऊन ये." 42 तो येत असतांनाच दुष्टात्मयाने
त्याला पिळून आपटले, परंतु येशूंनी दुष्टात्मयाने दटाविले-धमकाविले आणि
मुलगा बरा करून त्याच्या बापाच्या स्वाधीन केला. 43 परमेश्वराचे हे श्रेष्ठतम
सामर्थ्य व महान कृत्य पाहून सर्व लोक आश्चर्यचकित झाले; तेव्हा येशू आपल्या
शिष्यांना म्हणाले, 44 "या गोष्टींकडे लक्ष दया, कारण मी लोकांच्या हातीं धरून
दिला जाणार आहे." 45 पण शिष्य ही गोष्ट समजू शकले नाही आणि ही गोष्ट
त्यांच्यापासून गुप्त ठेवली होती जेणेकरून त्यांना कळू नये आणि ह्याविषयी,
येशूंना विचारण्यास त्यानी संकोच केला; कारण ते भीत होते. 46 त्यानंतर,
त्यांच्यामध्ये आपसांत अशी चर्चा होऊ लागली की आपल्यांत कोण मोठा
आहे? 47 येशूंनी त्यांच्या मनांतील गोष्टी ओळखल्या, मग एका बाळकाला
त्यानी आपल्याजवळ उभें केले, 48 आणि त्यांना म्हटले, "जो कोणी माझ्या
नांवाने या बाळकाचा स्वीकार करितो, तो माझा स्वीकार करितो,आणि जो
कोणी माझा स्वीकार करितो मला ज्याने पाठविले आहे त्याचा स्वीकार
करितो तो, कारण तुमच्यांत जो लहानांतून लहान आहे तोच मोठा आहे."
49 मग योहान म्हणाला, "हे स्वामी, आम्ही एका मनुष्याला भूत-प्रेत काढतांना
पाहिले होते, आम्ही त्याला मनाई केली की त्याने असे करू नये, कारण तो
आम्हां सर्वांबरोबर मिळून कार्य करीत नाहीये." 50 येशूंनी योहानाला म्हटले,
"त्याला मनाई करू नका, कारण जो तुमच्याविरूद्ध नाही, तो तुमच्या पक्षाचा/
बाजूचा आहे." 51 येशूंनी, आकाशात वर घेतले जाण्याच्या काही समयापूर्वी,
यरूशलेमेस जाण्याचा विचार केला. 52 त्यानी स्वतः तेथे जाण्यापूर्वी, काही
शिष्यांना पाठविले. शोमरोन्यांच्या गावी जाऊन त्यानी येशूंकरिता जागा

तयार करण्याची तयारी केली, 53 पण येशू यरूशलेमेस जाण्याच्या बेतात
होते म्हणून शोमरोनी लोकांनी येशूंना आपल्या गावात येण्याची परवानगी
दिली नाही अर्थात त्यानी येशूंना अस्वीकार केले. 54 हे पाहून येशूंचे शिष्य,
याकोब व योहान म्हणाले, हे प्रभुजी, जर आपण हुकूम केला तर आकाशातून
अग्नि पाडून त्यांना राख करून टाकावे काय? त्यांचा नाश करावा काय?"
55 पण येशू वळले आणि त्यांना रागावून म्हणाले, "तुम्हांला ठाऊक नाही की
तुम्ही कोणत्या प्रकारच्या आत्म्याचे आहात, कारण लोकांचा नाश करावयास
नाही परंतु त्यांना वाचविण्यासाठी आला आहे." 56 यानंतर ते दुसऱ्या गावी
निघून गेले. 57 ज्यावेळी ते मार्गाने चाललेले होते, कोणीतरी येशूंना म्हटले,
"जेथे जेथे आपण जाल, मी देखील आपल्याबरोबर येईन." 58 येशू त्याला
म्हणाले, "कोल्यांना बिळें आणि आकाशातील पक्ष्यांना घरटी असतात, पण
माझ्याकरिता डोके टेकावयाचीही जागा नाही." 59 येशू दुसऱ्याला म्हणाले,
"माझा शिष्य हो." तो म्हणाला, हे प्रभुजी, माझ्या बापाच्या मरणानंतर मी
आपला शिष्य होईन." 60 येशू त्याला म्हणाले, "मेलेल्यांना आपल्या मृतांची
चिंता/काळजी करू दे, तू जाऊन मुक्तीची सुवार्ता (परमेश्वर राज्याचा संदेश)
गाजीव." 61 एक दुसरा व्यक्ती म्हणाला, "हे प्रभुजी, मी आपला शिष्य होईन,
पण त्या आधी मी आपल्या नातलगांशी (घरची माणसे) भेटून येतो." 62 येशू
उत्तर देऊन म्हणाले, "जो कोणी आपला हात नांगरावर ठेवून मागे पाहतो, तो
परमेश्वराच्या राज्याच्या लायकीचा/पात्रतेचा नाही."

10 1 या गोष्टी झाल्यानंतर प्रभूंनी आणखी सत्तर लोकांना कार्य दिले;
ज्या ज्या नगरांत आणि ज्या ठिकाणी ते स्वतः जाणार होते, तेथे
आपल्या आधी त्यानी शिष्यांना दोन दोन करून पाठविले. 2 येशू त्यांना
म्हणाले, "पिकलेली शेतें/पीक विपुल आहे, परंतु काम करणाऱ्यांची कमी आहे,
ते थोडके आहेत म्हणून शेतांच्या/पिकांच्या स्वामींला विनंती करा की त्यानी
पिकांच्या कापणीसाठी मजूर पाठवावे. 3 जा, पहा, मी तुम्हांला लांडग्यांमध्ये
कोकरांसारखे पाठवीत आहे. 4 म्हणून पिशवी, झोळी, जोडे काहीएक घेऊन
जाऊ नका आणि रस्त्याने जातांना कोणाला सलाम करू नका. 5 कोणत्याही
घरात गेल्यावर, त्या घराच्या शांतिसाठी प्रार्थना करा. 6 जर तेथे कोणी

शांशीयोग्य असेल, तर तुमची शांति त्याच्यावर राहील, नसेल तर तुमची
शांति तुमच्याकडे परत येईल. 7 त्याच घरी वास्तव्य करा आणि जे काही ते
देतील, तेच खा आणि प्या, कारण मजूराला त्याची मजूरी मिळावयासच हवी.
घरें बदलून फिरू नका. 8 तुम्ही ज्या ठिकाणी/गावी जाल, जर तेथील लोक
तुमचे स्वागत करत असतील तर जे काही तुमच्यापुढे वाढले जाईल तेच खा.
9 तेथे आजारी लोकांना बरें करा आणि त्यांना सांगा की 'परमेश्वराचे राज्य
तुमच्याजवळ आले आहे.' 10 पण ज्या गावी तुम्ही जाल आणि तेथील लोक जर
तुमचा स्वीकार करीत नसतील तर, तेथील रस्त्यांवर जाऊन सांगा, 11 'तुमच्या
गावची धूळ जी आमच्या पायांना लागलेली आहे, आम्ही तुमच्यासमोर ती
झाडून टाकतो, तरीही हे ध्यानांत ठेवा, जाणून घ्या की परमेश्वराचे राज्य
तुमच्यासाठी जवळ आले आहे.' 12 मी तुम्हांला खरें सांगतो की त्या दिवशी त्या
गावांहून, सदोमाची दशा अधिक सहण्याजोगी असेल. 13 हे खोराजिना, तुझी
काय दुर्दशा होईल! बेथसैदा तुझी कशी दुर्दशा होणार! जे चमत्कार (सामर्थ्यांची
कार्यें) तुम्हांमध्ये केले गेले, जर ते सोर व सीदोनात घडले असते तर त्यानी
गोणपाट व राखेत बसून केव्हाच पश्चाताप करून अंतःकरण बदलले असते.
14 परंतु न्यायाच्या दिवशी तुमची दशा सोर व सीदोनाहून कठीण असेल कारण
सोर व सीदोन यांची अवस्था तुमच्यापेक्षा अधिक सहनयोग्य असेल. 15 हे
कफर्णहूमा! तू आकाशापर्यंत/स्वर्गापर्यंत उंच चढविला जाशील काय? तू तर
अधोलोकापर्यंत खाली केला जाशील. 16 जो तुमचे ऐकतो, तो माझे ऐकतो
आणि जो तुम्हांस झिडकारतो/फेटाळतो, , जो मला झिडकारतो, अर्थातच
तो, मला ज्याने पाठविले आहे त्यांनाहि फेटाळतो." 17 त्यानंतर ते सत्तर जण
आनंदाने परतले आणि म्हणू लागले की, "हे प्रभुजी, आपला नांवाने भूत-प्रेत
देखील आमचे गुलाम आहेत कारण ते आमच्या नियंत्रणात आहेत." 18 येशू
त्यांना म्हणाले, मी सैतानाला आकाशातून विजेप्रमाणे पडत असतांना पाहात
होतो. 19 पाहा, मी तुम्हांला साप आणि विंचू यांना पायदळी तुडविण्याचा
आणि शत्रूच्या सर्व सामर्थ्याला पूर्णपणे तोडण्याचा अधिकार दिला आहे.
कोणत्याही रीतीने तुमचे नुकसान होणार नाही, तुम्हांला काहीही बाधू शकणार
नाही. 20 तरीपण या गोष्टीने आनंदीत होऊ नका की भूत-प्रेतांवर तुमचे
नियंत्रण आहे पण केवळ या गोष्टीने की तुमची नांवे स्वर्गात लिहिलेली आहेत,

म्हणून याचाच सर्वाधिक आनंद माना." [21] त्याच क्षणी येशू पवित्र आत्म्याठायी
आनंदाने भरून गेले आणि म्हणाले, 'हे बापा, स्वर्ग आणि पृथ्वीच्या प्रभू, मी
तझे आभार मानतो की तू या गोष्टी ज्ञानी व विद्वानांपासून गुप्त/लपवून ठेविल्या
आणि त्या गोष्टी बाळकांवर प्रगट केल्या. होय, हे बापा, कारण तुला हेच
आवडले, योग्य वाटले. [22] माझ्या बापाने प्रत्येक गोष्टीची जबाबदारी माझ्या
स्वाधीन केली आहे; बापाखेरीज कोणालाच ठाऊक नाही की पुत्र कोण आहे पण
केवळ बापालाच ते ठाऊक आहे; पुत्रावांचून कोणालाही ठाऊक नाही की 'बाप'
कोण आहे आणि ज्यांना त्याविषयी प्रगट करावयाची पुत्राची इच्छा असेल
केवळ त्यांनाच ठाऊक आहे, त्याखेरीज इतर कोणालाही ठाऊक नाही. [23] येशू
मागे वळून आपल्या शिष्यांना एकांती म्हणाले, "ते डोळे आशीर्वादीत आहेत,
जे, ते सर्व पाहत आहेत, जे तुम्ही पाहात आहात. [24] मी तुम्हांला सांगतो की, जे
तुम्ही पाहत आहात आणि ऐकत आहात ते सर्व काही पाहव्याची इच्छा पुष्कळ
राजे आणि संदेष्टे पाहण्याची इच्छा बाळगीत होते, परंतु ते ऐकू शकले नाहीत
आणि पाहू शकले नाहीत." [25] लगेच एक शास्त्री येशूंची परीक्षा पाहण्याकरिता
म्हणाला, "अनंत जीवन मिळविण्यासाठी मी काय करू?" [26] येशू त्याला
म्हणाले, "नियमशास्त्रतात काय लिहिले आहे? तू ते कसें/कशाप्रकारे वाचशील?"
[27] शास्त्री उत्तर देऊन म्हणाला, "तू आपल्या संपूर्ण मनाने, जिवानें, शक्तीनें
आणि संपूर्ण बुद्धीने आपल्या प्रभु-परमेश्वरावर प्रेम कर आणि जितके स्वतःवर
प्रेम करितो, तितकेच दुसऱ्या लोकांवर व आपल्या शेजाऱ्यांवर प्रेम कर."
[28] येशू त्याला म्हणाले, "तू बरोबर उत्तर दिले आहेस, जा, असेच करून जीवन
जग म्हणजे तू जगशील." [29] परंतु स्वतःला धार्मिक दाखविण्याच्या बेताने
त्याने येशूंना विचारले, "शेजारी (दुसरे लोक) म्हणजे कोण?" [30] येशूंनी त्याला
उत्तर दिले, "एक मनुष्य यरूशलेमेतून यरीहोस जात होता, अचानक लुटारूंनी
त्याला घेरिले. त्यांनी त्याचे कपडे काढले, मारले आणि घायाळ अवस्थेत सोडून
निघून गेले. [31] त्याच मार्गाने एक याजक जात होता, पण त्याने त्याच्याकडे
दुर्लक्ष केले आणि चालता झाला. [32] एक लेवीही तेथून निघाला, पण त्यानेही
तसेच केले. [33] एक शोमरोनी पुरूष देखील त्याच मार्गाने जात होता, त्या
घायाळ माणसाला पाहून तो करूणा-दया-कळवळा यांनी भरून गेला. [34] त्याने
त्याच्या जखमांची मलम-पट्टी केली, आपल्या गाढवावर त्याला बसविले आणि

धर्मशाळेत आणून त्याची सेवा केली, काळजी घेतली. 35 दुसऱ्या दिवशी तेथून
जात असतांना त्याने धर्मशाळेच्या प्रबंधकाला दोन दीनार दिले आणि त्याची
सेवा करावयास व काळजी घ्यावयास सांगितले; तो असेही म्हणाला की बाकी
पैसे तो परत आल्यावर चुकते करेल; 36 तर तुझ्या दृष्टीने/विचाराने, या तिन्हीं
लोकांपैकी कोणता व्यक्ती, जख्मी मनुष्याचा शेजारी (साहाय्यक/मदतगार)
सिद्ध झाला; कोण त्याचा खरा शेजारी ठरला?" 37 तो शास्त्री बोलला, "तोच,
ज्याने त्याची मदत केली." येशू त्याला म्हणाले, "जा, तूही असेच कर". 38 ते पुढे
जात असतांना त्यांना एक गाव लागले, जेथे मार्था नांवाच्या एका स्त्रीने येशूंना
आपल्या घरी थांबविले. 39 तेव्हाच मार्थाची बहीण मरीया, प्रभूंची वचनें/शब्द
ऐकण्यात लीन झाली. 40 मार्था काम करता-करता प्रचंड थकली आणि येशूंना
म्हणाली, "माझी बहीण मला मदत करीत नाहीये, तिला आपणच सांगावे की
तिने माझे साहाय्य करावे." 41 परंतु येशूंनी उत्तर देऊन म्हटले, "मार्था, हे
मार्था, तू पुष्कळशा गोष्टींविषयी काळजी करीत राहतेस, 42 परंतु काही कार्यें
आहेत, किंबहूना त्यांत एकच गोष्ट खूप आवश्यक आणि नितांत गरजे आहे
आणि मरीयेने त्यांतील सर्वात मोठा आणि उत्तम वाटा निवडून घेतला आहे, जो
तिच्यापासून हिसकला आणि काढला जाणार नाही."

11 1 एके ठिकाणी येशू प्रार्थना करीत होते, त्यांची प्रार्थना संपल्यानंतर
शिष्यांपैकी एकाने त्यांना विचारले, "हे स्वामी, हे प्रभुजी, जशी
योहानाने आपल्या शिष्यांना प्रार्थना करणे शिकविले तशी आपणही आम्हांला
शिकवा." 2 येशू त्यांना तुझे, "जेव्हा तुम्ही प्रार्थना करिता तेव्हा असे म्हणा : हे
पित्या, तुझे नांव पवित्र मानिले जावो, तुझे राज्य येवो, 3 आमचे रोजचे भोजन,
आम्हांला रोज दिले जावे. 4 आमचे अपराध क्षमा कर, कारण आम्ही त्या सर्व
लोकांना क्षमा करतो, जे आमचे नुकसान करितात, आम्हांला प्रलोभनांत अर्थात
परीक्षेत फसू देऊ नको." 5 मग येशू त्यांना म्हणाले, "तुमच्यांत कोण असा आहे
ज्याला एक मित्र आहे आणि तो मध्यरात्री जाऊन त्याला म्हणतो, हे मित्रा,
मला तीन पोळया हव्यात, 6 कारण एक यात्रेकरू मित्र माझ्याजवळ आला आहे
आणि त्याची भूक शमविण्यासाठी माझ्याजवळ काहीच नाही. 7 आणि यावर
तो मित्र त्याला आतूनच उत्तर देऊन म्हणेल, मला त्रास देऊ नको, दार बंद आहे

आणि माझी मुलें माझ्याजवळ बिछान्यांत निजली आहेत; आता, मी तुला उठून
काहीहि देऊ शकत नाही. 8 मी तुम्हांला सांगतो, तो त्याच्या मित्र आहे, या
नात्याने जरी तो उठला नाही आणि त्याला दिले नाही तरी, तो कळकळीची
विनंती आणि आग्रह करतो म्हणून जितक्यांची त्याला गरज आहे तितक्या
तो त्याला देईलच. 9 मी तुम्हांला सांगतो की मागा म्हणजे तुम्हांला दिले
जाईल; शोधण्याची इच्छा बाळगा म्हणजे तुम्हांला ते सापडेल, ठोका म्हणजे
तुमच्यासाठी उघडलें जाईल. 10 कारण जो कोणी मागतो, त्याला मिळते आणि
जो शोधतो, त्याला सापडते, अर्थात प्राप्त होते; आणि जो ठोकतो त्याच्यासाठी
उघडलें जाते. 11 तुमच्यांत असा कोण बाप असेल की जेव्हा त्याचा मुलगा
त्याला पोळी मागतो तेव्हा तो त्याला दगड देइल किंवा मासा मागितल्यावर
साप देईल? 12 किंवा अंडे मागितले तर त्याला विंचू देईल? 13 म्हणूनच,
जेव्हा तुम्ही वाईट असूना आपल्या मुलांना चांगल्या वस्तु देण्याची जाणीव
बाळगता, तर तुमचा स्वर्गीक अर्थात आकाशातील पिता, जे मागतात त्यांना
पवित्र आत्मा का देणार नाही?" 14 मग येशू एका मुक्या आत्म्याला काढीत
होते. जेव्हा तो आत्मा निघाला, तेव्हा तो व्यक्ती बोलू लागला आणि हे पाहून
लोकांच्या गर्दीला खूपच आश्चर्य वाटले. 15 लोकसमुदायातून काही लोक म्हणू
लागले की "येशू अशुद्ध आत्मे बालजबूलाच्या (अशुद्ध आत्म्यांचा अधिपति)
साहाय्याने काढतात." 16 काही दुसरे लोक त्यांची परीक्षा पाहण्यांकरिता
त्यांना आकाशातून एक चिन्ह मागू लागले. 17 त्यांचे अंतःकरण आणि विचार
ओळखून येशू म्हणाले, "ज्या राज्यांत एकता नसते, ते ओसाड होते आणि ज्या
घरांत एकता नसते, ते नाश होऊन जाते. 18 जर सैतानच स्वतःचा विरोध करू
लागला तर त्याचे राज्य टिकू शकेल काय? कारण तुम्ही माझ्यावर आरोप
लावता की मी बालजबूलाच्या साहाय्याने अशुद्ध आत्में काढतो; 19 जर मी
बालजबूलाच्या मदतीने अशुद्ध आत्मे काढतो तर तुमचे लोक कोणाच्या मदतीने
काढतात? म्हणून त्यानी आपली मतें द्या वीत आणि न्याय करावा. 20 पण
जर मी परमेश्वराच्या साहाय्याने भूत-प्रेत काढतो, तर परमेश्वराचे राज्य
तुमच्याजवळ येऊन ठेपले आहे. 21 जेव्हा एक बलाढय मनुष्य पूर्णप्रकारें हत्यारें
घेऊन आपल्या घराचे रक्षण करितो तेव्हा त्याची धनसंपत्ति सुरक्षित राहते.
22 परंतु त्याच्याहून अधिक बलशाली मनुष्य जर त्याच्यावर आक्रमण करून

त्याला जिंकतो तेव्हा तो त्याची सर्व हत्यारें ज्यांवर त्याने भरंवसा ठेवला होता,
ती हिसकतो आणि धनसंपत्ती लुटून, वाटून देतो. 23 तो जो माझ्याबरोबर नाही,
तो माझ्याविरूद्ध आहे आणि तो जो माझ्याबरोबर जमवी (संग्रह करीत नाही)
नाही तो विखुरतो. 24 जेव्हा अशुद्ध आत्मा एखादया मनुष्यातून निघतो तेव्हा
तो विश्राम स्थानाचा शोध करीत निर्जल जागांतून फिरतो; मग जेव्हा त्याला
जागा मिळत नाही तेव्हा म्हणतो, "मी आपल्या ज्या घरांतून निघालो होतो,
त्यांतच परत जाईन. 25 जेव्हा तो तेथे पोहंचतो तेव्हा ती जागा त्याला स्वच्छ
आणि सजवलेली अशी आढळते. 26 मग तो त्याच्यापेक्षा आणखी दुष्ट-वाईट
सात आत्मे आपल्याबरोबर घेऊन त्यांत शिरतो आणि ते सर्व त्यांत राहतात
आणि त्या मनुष्याची दशा, पूर्वी असलेल्या दशेपेक्षा अधिक वाईट होऊन जाते."
27 येशू या गोष्टी बोलतच होते तेव्हा पाहा, समुदायातून एका स्त्रीने मोठया
आवाजात येशूंना म्हटले, "आशीवार्दीत आहे तो गर्भ ज्यात आपण राहिलात
आणि ती स्तनें ज्यांनी तुझे पोषण केले." 28 परंतु येशू म्हणाले, "खरे पाहिले तर
आशीर्वादीत व धन्य ते लोक आहेत जे परमेश्वराचा संदेश ऐकतात आणि त्याचे
पालन करितात. 29 जसजसा लोकसमुदाय वाढत चालला होता, येशूंनीही
तुझे बोलणे कायम ठेवून म्हटले, "ही पिढी अतिशय दुष्ट आहे कारण तिला
काही चिन्ह हवे आहे, परंतु योनाच्या चिन्हाशिवाय तिला आणखी कोणतेही
चिन्ह दिले जाणार नाही. 30 ज्याप्रकारे योना निनवेंच्या लोकांकरिता एक
चिन्ह झाला, त्याचप्रकारे मी (मनुष्याचा पुत्र) देखील या पिढीच्या लोकांसाठी
होईन. 31 दक्षिणची राणी, न्यायाच्या दिवशी या पिढीच्या लोकांबरोबर उभी
होऊन त्यांच्यावर दोषारोपण करेल, कारण ती पृथ्वीच्या एका टोकापासून
शलमोनाचे ज्ञान ऐकावयास आली होती, पण पाहा, येथे तो एक आहे जो
शलमोनापेक्षाही महान (श्रेष्ठ) आहे. 32 न्यायाच्या दिवशी निनवेंचे लोक
या पिढीच्या लोकांबरोबर उभे होऊन त्यांच्यावर दोष लावतील, कारण
त्यानी योनाचे प्रवचन ऐकून अंतःकरण बदलले आणि पाहा, येथे एक आहे
जो योनाहूनही श्रेष्ठ आहे. 33 कोणताही मनुष्य दिवा लावून तळघरात आणि
टोपलीखाली ठेवित नाही, परंतु तो दिवा दीपदानावर ठेवतो यासाठी की
आत येणाऱ्याला त्यापासून प्रकाश (उजडे) मिळावा. 34 तुझा डोळा, तुझ्या
शरीराचा दिवा आहे, जर तुझा डोळा निर्मळ आहे, तर तुझे संपूर्ण शरीर

प्रकाशाने झळाळून जाईल परंतु जर तुझा डोळा वाईट आहे, तर तुझे पूर्ण शरीर
अंधारमय होऊन जाईल. 35 यास्तव सावध रहा, कारण तुझा प्रकाश, अंधारात
बदलता कामा नये. 36 म्हणून जर तुझे संपूर्ण शरीर लखलखीत प्रकाशाने
उजळून निघाले असेल आणि त्याच्या कोणत्याही भागांत अंधार नसेल, तर तुझे
शरीर पूर्णपणे असे प्रकाशमय होईल ज्याप्रमाणे दिवा आपल्या प्रखर प्रकाशाने,
उजेड देत असतो." 37 जेव्हा येशूंनी बोलणे संपविले तेव्हा एका परूश्याने
त्यांना आपल्याबरोबर भोजन घेण्याचे आमंत्रण दिले. आत जाऊन ते भोजन
करावयास बसले. 38 परूश्याला आश्चर्य वाटले की येशूंनी रीती-विधींनुसार
भोजनापूर्वी हातपाय धुतले नाहींत. 39 परंतु येशू त्याला म्हणाले, 'हे परूश्यांनो,
तुम्ही ताटवाटी बाहेरून स्वच्छ धुता पण तुमच्या आंत अंधार आणि दुष्टाई
भरलेली आहे. 40 हे मूर्खांनो! ज्याने बाहेरचा भाग बनविला, त्याने आंतला
भागही बनविला नाही काय? 41 पण जो आंतील भाग आहे तो दान करा
म्हणजे तुमच्यासाठी सर्वकाही शुद्ध होऊन जाईल. 42 पण हे परूश्यांनो!
तुमच्यावर हाय! तुम्ही पुदिना व सताप आणि वेगवेगळया प्रकाराच्या भाजींचा
दशांश तर देऊ करिता पण न्याय आणि परमेश्वराचे प्रेम यांकडे मात्र दुर्लक्ष
करिता. याच त्या गोष्टी आहेत ज्या तुम्ही करावयाच्या होत्या आणि दुसऱ्या
गोष्टी सोडावयाच्या नव्हत्या. 43 हे परूश्यांनो, तुमच्यावर हाय! कारण तुम्ही
आराधनालयांत पुढची जागा आणि बाजारांत सलाम घेण्याची अपेक्षा बाळगत
असता. 44 हायहाय! केवढी तुमची दुर्दशा होणार! कारण तुम्ही लपलेल्या आणि
न दिसणाऱ्या कबरांसारखे आहात, कारण लोक काहीही न समजता(विचार
न करता) त्यांच्यावरून चालत फिरत राहतात. 45 तेव्हा यहूदी धर्माचा एक
विद्वान उत्तर देऊन म्हणाला, "हे गुरूजी, असे बोलून आपण आमचा अनादर व
निंदा करीत आहात." 46 परंतु येशू म्हणाले, "तुमच्यासारख्या विद्वानांवर हाय!
कारण तुम्ही माणसांना अशा ओझ्यांनी दाबून टाकता जी वहावयास कठीण
आहेत, पण तुम्ही स्वतः मात्र त्या जड ओझ्यांना एका बोटाचाही स्पर्श करू
इच्छीत नाही. 47 तुमची किती दुर्दशा होणार! कारण तुम्ही त्या संदेष्टयांच्या
कबरा बांधता ज्यांना, तुमच्या पूर्वजांनीच जिवें मारले होते. 48 म्हणूनच तुम्ही
स्वतःच साक्षीदार आहात आणि आपल्या पूर्वजांच्या कार्यांशी सहमत आहात,
कारण त्यानी तर त्यांना जिवें मारले होते आणि तुम्ही त्यांच्या कबरा बांधता.

49 म्हणूनच परमेश्वराच्या बुद्धीने म्हटले आहे, "मी त्यांच्याजवळ संदेष्टें आणि
प्रेषित पाठवीन. त्यांपैकी काहींना ते जिवें मारतील आणि काहींना छळतील"
50 यासाठी की सृष्टीच्या प्रारंभापासून जितक्या संदेष्टयांचे रक्त पाडले गेले,
त्याचा हिशेब या पिढीच्या लोकांपासून घेतला जाईल. 51 अर्थात हाबेलाच्या
रक्तापासून तर जखऱ्याच्या रक्तापर्यंतचा हिशेब, ज्याची हत्या परमेश्वराच्या
वेदी व पवित्रस्थानांमध्ये केली गेली होती. होय, माझे म्हणणे व तात्पर्य
हेच आहे की या पिढीच्या लोकांकडून त्याचा हिशेब घेतलां जाईल. 52 अरे
शास्त्र्यांनो! केवढी तुमची दुर्दशा होणार! कारण तुम्ही ज्ञानाची किल्ली हिसकून
घेतली आहे. तुम्ही तर स्वतःदेखील आत दाखल झाला नाही आणि जे दाखल
होत होते त्यांनाही तुम्ही अडविले/थांबविले." 53 जेव्हा ते तेथून बाहेर पडले
तेव्हा शास्त्री व परूशी कडक विरोध प्रगट करीत, अनेक विषयांवर येशूंना
बारकाईने प्रश्न विचारू लागले, 54 आणि येशूंविरूद्ध योजना तयार करू लागले
की त्यांच्या मुखाद्वारे निघणाऱ्या एखादया गोष्टींनेच त्यांना फसवावे;

12 1 तेवढयात अशी स्थिती झाली की लोकांचा समुदाय हजारोंच्या
संख्येने जमू लागला होता, इतकी गर्दी होती की ते एकमेकांना
तुडवित होते, धडपडत होते, तेव्हा येशू आपल्या शिष्यांना म्हणाले, परूश्यांच्या
कपटरूपी खमिराविषयी सावध असा. 2 असे काहीही झाकलेले नाही, जे
उघडले जाणार नाही आणि असे काहीहि गुप्त/लपलेले नाही जे कळणार
नाही. 3 म्हणूनच जे काही तुम्ही अंधारात बोलला आहात, ते प्रकाशांत ऐकले
जाईल आणि जे तुम्ही आतल्या खोलीत कानांत फुसफुसला ते धाब्यावरून
घोषित केले जाईल. 4 माझ्या मित्रांनो, मी तुम्हांला सांगतो की, त्यांना मुळीच
घाबरू नका जे शरीराचा वध करितात आणि त्यानंतर त्यांना त्याहून अधिक
काहीच करिता येत नाही. 5 पण, मी तुम्हांला सांगतो की तुम्ही त्याची
भीति बाळगावी जो नष्ट केल्यानंतर नरकातही टाकू शकतो केवळ त्यांची
भीति असू दया. 6 चिमण्या किती सर्वसाधारण असतात की नाही? तरीपण
परमेश्वर त्यांच्यापैकी एकीलाही विसरत नाही. 7 तुमच्या डोक्याचे सर्व केस
देखील मोजलेले आहेत, म्हणून भिऊ नका, तुम्ही पुष्कळ चिमण्यांपेक्षाही श्रेष्ठ
आहात. 8 मी तुम्हांला सांगतो की जो कोणी लोकांसमोर मला स्वीकारतो,

त्याला मी परमेश्वराच्या परमेश्वरदूतांसमोर स्वीकारीन. 9 जो लोकांसमोर
मला नाकारतो, त्याला परमेश्वराच्या परमेश्वरदूतांसमोर नाकारले जाईल.
10 पण जो कोणी माझ्याविरूद्ध काही बोलेल, त्याचा तो गुन्हा क्षमा केला
जाईल; पण जो पवित्र आत्म्याचा अनादर करितो, निंदा करितो त्याचा गुन्हा
क्षमा केला जाणार नाही. 11 ज्यावेळी लोक तुम्हांला, सभा, सरकार आणि
अधिकाऱ्यांसमोर नेतील, त्यावेळी चिंता करीत बसू नका की आम्ही उत्तर
कसे देऊ किंवा काय बोलू. 12 कारण पवित्र आत्मा स्वतः त्याच क्षणी तुम्हांला
शिकवील की तुम्ही काय बोलावे." 13 मग लोकांच्या गर्दीतून कोणीतरी येशूंना
म्हटले, "हे गुरूजी, माझ्या भावाला सांगा की वडीलांची मालमत्ता त्याने
माझ्याबरोबर वांटून घ्यावी." 14 येशू त्याला म्हणाले, अरे माणसा, मला
कोणी तुझा न्याय करणारा किंवा वांटणी करणारा म्हणून नेमिले?" 15 येशू
त्यांना म्हणाले, "सावध असा आणि प्रत्येक प्रकारच्या लोभांपासून स्वतःचा
बचाव करा, कारण अधिक संपत्ति असली तरी एखादयाचे जीवन पूर्णपणे
त्याच्या संपत्तिवर टिकून राहिलेले नसते." 16 तेव्हा येशूंनी त्यांना एक दाखला
सांगितला, "एका धनवानाच्या जमिनीत भक्कम पीक आले. 17 तेव्हा तो विचार
करू लागला की, मी काय करू, कारण माझ्याकडे जागा नाही, जेथे हे पीक
मला ठेवता येईल." 18 तो म्हणाला, "होय, मी एक काम करू शकतो, ते हे की
मी आपली कोठारें मोडून मोठी कोठारें बांधीन आणि तेथेच आपले सर्व धान्य
आणि सर्व संपत्ति साठवून ठेवीन. 19 मग मी आपल्या स्वतःशी बोलेन, "हे
माझ्या जिवा, तुझ्याजवळ पुष्कळ वर्षांसाठीची विपुल संपत्ति साठविलेली
आहे, चैन कर, खूप खा, पी, सुखी रहा." 20 परंतु परमेश्वर त्याला म्हणाला, "हे
मूर्खा! आजच रात्री तू मरशील, तेव्हा जे काही तू गोळा केले आहे ते कोणाचे
होईल? 21 असाच तो मनुष्य देखील आहे जो स्वतःसाठी धन संचय करितो,
द्रव्य साठवितो, पण परमेश्वराच्या बाबतींत तो श्रीमंत नाही." 22 मग येशू
आपल्या शिष्यांना म्हणाले, "म्हणून मी तुम्हांला सांगतो की आपल्या जिवाची
चिंता करून म्हणू नका की आम्ही काय खाऊ आणि आपल्या शरीराविषयी की
आम्ही काय पांघरू. 23 कारण अन्नापेक्षा जीव (जीवन) आणि वस्त्रांपेक्षा अधिक
शरीर आहे. 24 कावळयांना पाहा, ते पेरीत नाहीत, कापीत नाहीत, त्यांना
भंडारें आणि कोठारेंही नाही, तरी परमेश्वर त्यांचे पोषण करितो. तुमची किंमत

चिमण्यांपेक्षा कितीतरी अधिक आहे! [25] तुमच्यामध्ये असा कोण आहे, जो चिंता
करून आपले आयुष्य एक सेकंद तरी वाढवू शकतो? [26] म्हणून तुम्ही जर सर्वात
लहान कार्य करू शकत नाही, तर दुसऱ्या गोष्टींविषयी का चिंता करिता?
[27] लिलीच्या (घंटीच्या आकाराची पांढरी/रंगित फुले) फुळांवर दृष्टि घालून
पहा की ती कशी वाढतात, ती परिश्रम करीत नाहीत, कांतीत नाहीत, तरीपण
मी तुम्हांला सांगतो की शलमोनाने सुद्धा आपल्या वैभवशाली शासनकाळी,
त्यांपैकी एकासारखे देखील वस्त्र घातले नव्हते. [28] - म्हणून जर परमेश्वर
मैदानांतील गवताला जे आज आहे आणि उदया भट्टीत टाकले जाईल, असे वस्त्र
घालतो, तर अहो संशय करणाऱ्यांनो, तोतुम्हांला का घालणार नाही? [29] आणि
तुम्ही काय खाऊं किंवा काय पिऊं याच्या नादी लागूं नका आणि संशय बाळगूं
नका. [30] कारण या जगातील सर्व लोक या सर्व वस्तूच्या शोधात धडपडत
असतात आणि अस्वस्थ असतात आणि तुमचा पिता जाणतात की तुम्हांला
या गोष्टींची/वस्तुंची गरज आहे. [31] परंतु तुम्ही त्याचे राज्य प्राप्त करण्याची
धडपड करा ते शोधा, तेव्हा या वस्तूहि तुम्हांस मिळतील. [32] अरे, लहान
कळपा तू भिऊ नकोस! कारण तुमच्या पित्याला हे चांगले वाटते की तुम्हांला
ते राज्य दयावे. [33] आपली संपत्ति विकून ती दान कर आणि आपल्याकरिता
अशा पिशव्या/पर्स तयार करा ज्या जुन्या होणार नाहीत, अर्थात स्वर्गात असे
धन गोळा करा जे कमी होत नाही आणि ज्याच्याजवळ चोर येत नाही, ज्याला
किडे खात नाहीत आणि कसर लागत नाही. [34] कारण जेथे तुमची संपत्ति आहे,
तेथेच तुमचे मनहि लागलेले असेल. [35] तुमच्या कंबरा कसलेल्या/बांधलेल्या
आणि तुमचे दिवे चमकत राहोत. [36] आणि तुम्ही त्या लोकांसारखे असावे, जे
आपल्या धन्याची अर्थात मालकाची प्रतिक्षा करीत असतात की तो लग्नाहून
केव्हा परत येईल, की ज्यावेळी तो येऊन दार ठोकील त्यावेळी ते ताबडतोब
त्यांच्याकरिता उघडले जावे. [37] उत्तम आहेत ते दास, ज्यांना मालक येऊन
जागृत असलेले पाहील आणि मी तुम्हांला खरे सांगतो की तो कंबर बांधून
त्यांना भोजनाकरिता बसवील आणि जवळ येऊन त्यांची सेवा करील. [38] जर
तो रात्रीच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या प्रहरी येऊन त्यांना जागतांना पाहील तर ते
दास धन्य आहेत. [39] पण तुम्ही ही गोष्ट लक्षांत घ्या की जर घराच्या, मालकाला
(स्वामी) जाणीव असती की, चोर कोणत्या समयी येईल, तर तो जागत राहिला

असता आणि त्याने तुझे घर चोराला फोडू दिले नसते. 40 तुम्हीही तयार असा,
कारण ज्याक्षणी तुम्ही कल्पनाहि करू शकणार नाही आणि तुम्हांला वाटणारहि
नाही त्याच क्षणी मनुष्याचा पुत्र (मी) येईल". 41 तेव्हा पेत्र त्यांना म्हणाला,
"हे प्रभुजी, हा दाखला आमच्यासाठीचा आहे किंवा सर्वांसाठीचा?" 42 येशू
म्हणाले, "तो प्रामाणिक आणि बुद्धीमान कोण आहे, ज्याचा मालक, त्याच्या
नोकरांवर (दासांवर) त्याला प्रमुख म्हणून नेमील म्हणजे तो त्यांच्यासाठी
योग्यसमयी खाण्यापिण्याची सोय करील? 43 उत्तम आहे तो प्रबंधक, ज्याचा
धनी येऊन, त्याला असेच करतांना पाहील. 44 मी तुम्हांला सत्य सांगतो की
तो त्याला आपल्या सर्व मालमत्तेवर नव्हे तर सर्वस्वावर अधिकारी नेमील.
45 परंतु जर तो प्रबंधक आपल्या मनात विचार करीत असेल की माझा धनी
(मालक) येण्यास उशीर लावतो आहे आणि नोकर व मोलकरीणीस मारहाण
करू लागेल आणि चैन करू लागेल, 46 तर त्या प्रबंधकाचा धनी अशा दिवशी,
जेव्हा तो त्याची वाट पाहत नाही आणि अशा समयी जो त्याला ठाऊक नाही,
येईल आणि त्याला दंड देऊन त्याचा वाटा अविश्वासूंबरोबर नेमील. 47 तो
नोकर (दास) ज्याला आपल्या धन्याच्या इच्छेविषयी ठाऊक होते आणि जो
तयार राहिला नाही आणि आपल्या इच्छेप्रमाणे करित राहिला, तो पुष्कळ
फटके खाईल. 48 परंतु ज्याला ठाऊक नव्हते पण जर तो फटके मिळण्यायोग्य
कार्य करील, तर अशाला थोडके फटके मिळतील. म्हणून ज्याला पुष्कळ दिले
गेले आहे, त्याच्याकडून पुष्कळ आशा आणि अपेक्षा केली जाईल आणि ज्याला
पुष्कळ सोपविले होते, त्याच्याकडून पुष्कळ घेतले जाईल. 49 मी या पृथ्वीवर
आग (पवित्रात्मा) ओतावयास (प्रारंभ करण्यास) आलो आहे आणि मला केवळ
हेच हवे आहे की ती आग आत्ताच पेटावी! 50 मला तर मृत्यूत (दुःख) बुडविले
जाणार आहे आणि जोपर्यंत असे होत नाही, तोपर्यंत मी मोठया पेचांत असणार
आहे. 51 तुम्ही असा विचार करिता काय, की मी या दुनियेत आल्यामुळे,
सर्वकाही शांत होईल? व्यवस्थित होईल? नाही, पण माझ्यामुळे लोकांत
आपसांत फूट पडेल. 52 कारण आतापासून एका घरांतील पाच लोकांत गट
पडतील. दोन जण, तिघांच्या विरूद्ध होतील आणि तीन जण, दोघांविरूद्ध.
53 मुलांविरूद्ध बाप, बापाविरूद्ध मुलगा विरोध करील; मुलीविरूद्ध आई आणि
आईविरूद्ध मुलगी होईल, सुनेविरूद्ध सासू आणि सासूविरूद्ध सून होईल."

54 येशू लोकसमुदायास उल्लेखून म्हणाले, "ज्यावेळी तुम्ही पश्चिमेकडे ढग वर
येतांना पाहता, तेव्हा लगेच म्हणता की पाऊस येईल आणि असे होते. 55 जेव्हा
तुम्ही दक्षिणेचा वारा सुटतांना पाहाता तेव्हा म्हणता, "खूप उष्णता होणार
आहे" आणि असे होतेहि. 56 अरे ढोग्यांनो, तुम्ही जमीन आणि आकाश पाहून
आपली मते लावून अर्थ काढता, परंतु या काळाचे अवलोकन करून तुम्ही अर्थ
का लावित नाही? 57 तुम्ही स्वतःच ठरवित का नाही, की योग्य ते काय आहे?
58 तुम्ही आपल्या विरोधकाबरोबर न्यायाधीशासमोर उभे असण्यापूर्वीच, आधी
त्याच्याशी समझौता करण्याचा प्रयत्न करा, कारण तसे झाले नाही तर तुम्हांला
न्यायाधीशाद्वारे दंड दिला जाईल आणि न्यायाधीश तुम्हांला शिपायाच्या हाती
देतील व शिपाई तुम्हांला तुरूंगात घालील. 59 मी तुम्हांला सांगतो की जोपर्यंत
तुम्ही पैसा- पैसा चुकता करणार नाही तोपर्यंत तुम्ही तेथून सुटू शकणार नाही.

# 13

1 `त्याचवेळी जे लोक तेथे हजर होते, त्यांच्यापैकी काहींनी त्या
गालीलकरांविषयी वर्तमान सांगितले, ज्यांचे रक्त पिलाताने त्यानी
आणलेल्या बलिदानांबरोबर मिसळले होते. 2 येशू उत्तर देऊन त्यांना म्हणाले,
"तुमच्या मते हे गालीली ज्यांनी दुःख सहन केले, दुसऱ्या गालीलकरांपेक्षा
अधिक वाईट होते, म्हणून तसे झाले होते काय? 3 मी तर असेच म्हणेन की
नव्हते, पण जर तुम्हीहि तुझे अंतःकरण परिवर्तन करण्याच्या उत्तम संधिचा
लाभ घेणार नाही तर नाश होऊन जाल. 4 आणि काय तुम्ही असा विचार करीत
आहात की ज्या अठरा जणांचा प्राण शिलोहांतील बुरूज पडला म्हणून गेला(ते
ठार झाले) ते यरूशलेमेत राहणाऱ्या दुसऱ्या लोकांहून अधिक दुष्ट/गुन्हेगार
होते? 5 मी म्हणतो असे मुळीच नाही, पण जर तुम्ही मनाचा पालट करण्याची
संधी गमावली आणि पश्चातापाकडे दुर्लक्ष केले तर अचानक मृत्यूच्या आहारी
जाल, नाश व्हाल." 6 मग येशूंनी त्यांना आणखी एक दाखला सांगितला, एक
मनुष्य आपल्या बगिच्यांतील अंजिराच्या झाडातून अंजीर काढावयास आला,
पण त्यांवर एकही फळ नव्हते. 7 म्हणून त्याने माळयाला आदेश दिला की
पाहा, मी सतत तीन वर्षांपासून या अंजिराच्या झाडावरचे फळ पाहावयास
येत आहे, परंतु यांवर, आजवर एकही अंजीर आलेले नाही. हे झाड कापून
आणि फेकून टाक, बेकार त्याने इतकी जागा तरी का अडवून ठेवावी?" 8 परंतु

माळी त्याला विनवणी करून म्हणाला, "स्वामी, कृपा करून या झाडाला एका
वर्षाची मोहलत दया, फक्त ऐवढे एक वर्ष ते असू दया आणि मी त्याच्या चारीं
बाजूंना खणून त्यांत खत घालीन, 9 जर पुढच्या वर्षी यावर अंजीर लागले तर
ठीक, नाही तर आपण ते कापून टाकाल." 10 एका शब्बाथ दिवशी येशू एका
आराधनालयात शिकवीत होते. 11 तेथे अठरा वर्षापासून जिला अशक्तपणाचा
आत्मा लागलेला होता अशी एक वाकलेली कुबडी स्त्री होती; ती सरळ उभी
राहू शकत नव्हती. 12 तिला पाहताच येशूंनी तिला जवळ बोलावून सांगितले,
"बाई तू आपल्या अशक्तपणापासून मुक्त झाली आहेस." 13 ज्या क्षणी येशूंनी
तिच्यावर आपले हात ठेविले, त्याच क्षणी ती सरळ ताठ उभी झाली आणि
परमेश्वराचे आभार मानू लागली. 14 शब्बाथ दिवशी येशूंद्वारे ती बाई बरी
केली गेल्यामुळे त्या आराधनालयाचा प्रबंधक नाराज झाला; संतापून तेथे उभे
असणाऱ्या लोकांना म्हणाला, "शब्बाथ दिवशी बरें होण्याकरिता, प्रार्थना
करवून घेण्याकरिता येऊ नका, बाकीचे सहा दिवस आहेत, त्यांत येत चला."
15 परंतु येशू बोलले, "अहो कपटी ढोंगी लोकांनो! तुमच्यापैकी प्रत्येक जण
शब्बाथ दिवशी काम करितो, तुम्ही आपला बैल किंवा गाढव घेऊन त्याला
पाणी पाजावयास नेता की नाही? 16 ही बाई जी अब्राहामाच्या वंशाची
(यहूदी) आहे, सैतानाच्या अठरा वर्षांच्या गुलामीपासून मुक्त झाली आहे,
ही उत्तम गोष्ट नाही काय की ती शब्बाथ दिवशी बरी होऊ शकली आहे?"
17 हे ऐकून येशूंचा विरोध करणारे लाजविले गेले त्यांची फजिती झाली, पण
दुसरे लोक येशूंच्या सर्वोत्तम गोष्टी ऐकून खूप आनंदीत झाले. 18 तेव्हा येशूंनी
विचारले, "परमेश्वराचे राज्य कशा प्रकारचे आहे? मी कोणते उदाहरण देऊन
ते समजावू? ते मोहरीच्या एका लहान दाण्यासारखे आहे, जो एका माळयाने
आपल्या बगिच्यात पेरला आणि तो वाढून एक मोठे झाड झाला, मग पक्षी
घेऊन त्याच्या फांदयात घरटी बांधू लागली." 20 मग येशू म्हणाले, "मी
परमेश्वर राज्याची तुलना कशाशी करू? 21 ते खमिरासारखे आहे जे एका स्त्रीने
तीन मापें पिठांत मिसळले आणि सर्व पीठ खमीरी झाले." 22 येशू नगरोंनगरी
आणि गावोंगावी उपदेश देत, यरूशलेमेकडे चालत जात होते. 23 कोणीतरी
त्यांना विचारले, "मुक्ति प्राप्त करणाऱ्यांची संख्या थोडकी आहे काय? 24 येशूंनी
उत्तर देऊन म्हटले, "अरूंद मार्गाने दाखल होण्याचा प्रयत्न करा कारण मी

तुम्हांला सांगतो की, पुष्कळ लोक त्यात दाखल होण्याचे पाहतील पण होऊ
शकणार नाहीत. 25 जर घराचा स्वामी उठून दार बंद करित असेल आणि
तुम्ही उभे राहून दार ठोकून म्हणू लागला, "हे प्रभुजी, आमच्याकरिता दार
उघडा आणि त्याने उत्तर दिले, "मी तुम्हांला ओळखत नाही की तुम्ही कोठले
आहात, 26 तेव्हा तुम्ही त्याला म्हणाल, आम्ही आपल्याबरोबर जेवलो, पाणी
प्यालो, आपण आम्हांला रस्त्यांवर शिकविले होते; 27 तेव्हा तो म्हणेल, 'मी
तुम्हांला सांगतो की मला ठाऊक नाही की तुम्ही कोठून आला आहात, तुम्ही
सर्व जे दुष्कर्म करणारे आहात, माझ्यासमोरून दूर व्हा.' 28 तुम्ही अब्राहाम,
इसहाक, याकोब आणि दुसऱ्या सर्व संदेष्टयांना परमेश्वराच्या राज्यात पाहाल,
पण तुम्हांला बाहेर फेकून टाकले जाईल मग तेथे रडणे व दांतखाणें चालेल.
29 लोक पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिणेकडून येतील आणि परमेश्वराच्या
राज्यांत त्यांना स्थान मिळेल. 30 आता जे लोक शेवटले आहेत, ते पहिले
होतील आणि जे आता पहिले आहेत ते शेवटले होऊन जातील." 31 त्याच वेळी
काही परूशी येऊन येशूंना म्हणाले, "येथून निघून जा कारण हेरोद आपणाला
मारून टाकण्याच्या बेतात आहे." 32 येशू त्या लोकांना म्हणाले, "त्या कोल्याला
जाऊन असे सांगा की आज व उदया मी भुतें काढीन, आजाऱ्यांना बरें करीन
आणि तिसऱ्या दिवशी आपले कार्य पूर्ण करीन. 33 तरीही मला आज उदया
आणि परवा चालतच जावयाचे आहे कारण एखादा संदेष्टा यरूशलेमेबाहेर
मारला जावा हे शक्य नाही. 34 यरूशलेमे! हे यरूशलेमे! तू तुझ्याजवळ
पाठविलेल्या संदेष्टयांवर दगडमार करतेस, मी कितीदां अशी इच्छा केली, की
जशी कोंबडी आपलीं पिलें आपल्या पंखाखाली जमवून बसते, तसेच मीही
तुझ्या मुलाबाळांना एकवटावे, परंतु तुला ते नको होते. 35 पाहा! तुमचे घर
तुमच्यासाठी ओसाड सोडले जात आहे आणि मी तुम्हांला सांगतो की जोपर्यंत
तुम्ही म्हणणार नाही की धन्य आहे तो जो प्रभु परमेश्वराच्या नांवाने येतो,
तोपर्यंत तुम्ही मला पुन्हा पाहणार नाही."

14 1 एका शब्बाथ दिवशी (विश्रामदिनी) जेव्हा येशू परूश्यांच्या घरी
भोजन करावयास गेले होते तेव्हा सर्वांचे डोळे त्यांच्यावर लागलेले
होते. 2 येशूंच्यासमोरच जलोदर पीडित एक व्यक्ती होता. 3 येशूंनी शास्त्री व

परूश्यांस विचारले, "विश्राम दिवशी एखादयाला स्वस्थ व निरोगी करणे
योग्य आहे काय?" 4 परंतु ते सर्व शांत राहिले आणि येशूंनी त्याला बरें करून
पाठवून दिले. 5 येशूंनी त्यांना विचारले, "तुमच्यांत असा कोण आहे, ज्याचा
मुलगा, गाढव किंवा बैल विश्राम दिनी विहिरीत पडलेला असेल आणि तो
त्याला काढणार नाही? 6 ते त्याचे उत्तर देऊ शकले नाही. 7 भोजनाकरिता
आमंत्रित लोक स्वतःसाठी उत्तम जागा शोधत आहेत असे पाहून येशू म्हणाले,
8 "जेव्हा तुला लग्नाच्या मेजवानीकरिता बोलाविले जाते, तेव्हा तू पुढच्या
आसनावर (विशिष्ट स्थानी) बसू नको. जर तुझ्यापेक्षा अधिक सन्माननीय
आदरणीय माणसालाही तेथे बोलाविले असेल, तेव्हा तू काय करशील?
9 घराचा स्वामी येऊन तुम्हांला म्हणेल, "या माणसासाठी जागा रिकामी
कर"; तेव्हा तुला अपमान सहन करून खालच्या जागेवर बसावे लागेल; 10 या
विपरीत जेव्हा तुम्हांला आमंत्रण दिले जाते, तेव्हा साधारण व सामान्य अशा
जागेवर बसा म्हणजे तुमचा स्वामी, तुमच्याजवळ येताच तुम्हांला एका वरच्या
जागेवर बसावयास सांगेल. त्यामुळे सर्व पाहुण्यांसमोर तुला आदर व मान
मिळेल. 11 म्हणून जो स्वतःला उंच (मोठे) करेल, त्याला खाली केले (नमविले)
जाईल; आणि जो स्वतःला नम्र करेल, त्याला अधिक सन्मान मिळेल. 12 तेव्हा
येशूंनी, ज्याने त्यांना बोलाविले होते त्याला येशू म्हणाले, जेव्हा तू कोणालाही
आपल्याकडे दुपारी किंवा संध्याकाळी भोजनांकरिता आमंत्रण दशील, तेव्हा
तुझे मित्र, भाऊ किंवा नातेवाईक किंवा श्रीमंत शेजाऱ्यांना बोलावू नको,
कारण असे होता कामां नये की त्याने तुलाही आमंत्रण दयावे म्हणजे तुझी
फेड होईल. 13 पण जेव्हा तुम्ही मेजवानी आयोजित करिता तेव्हा गरीब,
अपंग, लंगडे-आंधळे यांना बोलवा. 14 तसे केले तर परतफेड म्हणून ते तुम्हांला
आमंत्रण देणार नाहीत कारण त्यांच्याजवळ काही नाही, या कारणास्तव
तुम्ही धन्य व आशीर्वादीत ठराल आणि निर्दोष (नीतिमान) ठरविलेल्यांच्या
पुनरूत्थानाच्या समयी तुम्हांला मोबदला मिळेल, तुमची परतफेड होईल.
15 या गोष्टी ऐकल्यावर तेथे बसलेल्यांपैकी एक पाहुणा म्हणाला, "परमेश्वराच्या
राज्यात दाखल होणे, प्रवेश मिळविणे ही किती मोठी व धन्य गोष्ट आहे.
आशीर्वादीत आहे तो जो परमेश्वराच्या राज्यात भाकर खाईल!" 16 त्यावेळी
येशूंनी अशाप्रकारे उत्तर दिले, "एका माणसाने एक मोठी मेजवानी दिली आणि

पुष्कळ लोकांना आमंत्रण केले. [17] जेव्हा सर्व तयारी झाली तेव्हा त्याने आपल्या
दासाला पाहुण्यांच्या/आमंत्रितांच्या घरी बोलवावयास पाठविले. [18] पण ते
सर्वजण बहाणे/निमित्त सांगू लागले. एक म्हणाला, मी एक शेत विकत घेतले
आहे, त्याची माहिती करून ते पाहावयास मी जातो आहे, म्हणून मला क्षमा
केली जावी. [19] दुसरा म्हणाला, मी पांच बैलजोडया विकत घेतल्या आहेत,
त्याविषयीचा तपास घ्यावयास, त्यांची पारख करावयास मला जावयाचे आहे.
[20] तिसरा मनुष्य याकरिता येऊ शकला नाही कारण त्याचे नुकतेच लग्न झालेले
होते. [21] दासाने घरी आल्यावर आपल्या स्वामीला सर्वकाही कळविले. तेव्हा
त्याला खूप राग आला, तो आपल्या दासाला म्हणाला, नगरात जाऊन रस्ते
व गल्ल्यांतून गरीब, अपंग, आंधळे व लंगडे लोक घेऊन ये. [22] दास म्हणाला,
स्वामी आपल्या आज्ञेप्रमाणे मी केले तरी अजून भरपूर जागा आहे. [23] म्हणून
स्वामी संतप्त होऊन दासाला म्हणाला, आजूबाजूंच्या, जवळपासच्या वस्तीत
जा, रस्त्यांवर जा; भिकारी, लंगडे आणि आंधळे बोलावून आण म्हणजे माझे
घर भरून जाईल. [24] जे काही आमंत्रित लोकांसाठी तयार केले होते त्यांतून ते
आमंत्रित काहीही चाखू शकणार नाहीत." [25] एक मोठी गर्दी तेथे जमा झाली
होती; येशू वळून त्यांना म्हणाले, [26] "जो मनुष्य माझा शिष्य होऊ इच्छीतो,
त्याने आपला बाप, आई, पत्नीं, मुलें, भाऊ व बहिणी, इतकेच केवळ नव्हे तर
आपल्या जीवनाहून अधिक माझ्यावर लळा लावावा, असे नसेल तर तो माझा
शिष्य होऊ शकत नाही. [27] जो मनुष्य आपला क्रूस उचलून, माझे ऐकून जीवन
जगणे इच्छीत नाही, तो माझ्या उपयोगाचा नाही. [28] म्हणूनच जोवर तुम्ही
किंमतीचा-खर्चाचा अंदाज करून घेत नाही, तोवर प्रारंभ करू नका. असा कोण
आहे ज्याला इमारत बांधावयाची असल्यास तो आधी खर्चाचा अंदाज घेणार
नाही आणि बांधकाम सुरू करेल; [29] नाहीतर असे होईल की पाया घातल्यानंतर
त्याचा पैसा संपेल आणि सर्वजण त्याची थट्टा करतील; [30] उपहासाने लोक
म्हणतील, "पाहा, हा मनुष्य. त्याने घर बांधावयास प्रारंभ तर केला पण
पूर्ण होण्यापूर्वीच त्याच्याजवळचा पैसा संपला". [31] किंवा तो कोण असा
राजा असेल जो बसून आधी असा विचार करीत नसेल की, आपली 10,000
सैनिकांची सेना घेऊन, 20, 000 सैनिकांच्या सेनेशी सामना करावयास त्याने
जावे किंवा नाही! [32] समजा, जर त्याला सामना करावयाचा नसेल तर, जेव्हा

शत्रूंची सेना बरीच लांब असेल तेव्हा तो दूत पाठवून मैत्रिचे व सलोख्याचे
प्रस्ताव मांडेल. 33 अशाप्रकारे तुम्ही देखील आहात; तुमच्यापैकी प्रत्येक जण,
जे काही तुमचे स्वतःचे आहे (जसे धन-संपत्ति) जोपर्यंत त्याचा लोभ व आकर्षण
सोडित नाही, तोपर्यंत माझा शिष्य होऊ शकत नाही. 34 मीठ चांगले आहे, पण
त्याचा खारटपणाच गेला, तर ते पुन्हा खाण्याजोगे कसे बनविले जाऊ शकेल?
35 रूचिहीन मीठ जमिनीत टाकण्याच्या लायकीचे किंवा खताच्या रूपांत
वापरण्याचा लायकीचेही राहणार नाही, ते उपयोगी नसल्यामुळे फक्त फेकून
टाकले जाईल. प्रत्येक व्यक्ती जो ऐकतो आहे, त्याने लक्षपूर्वक ऐकावे आणि
समजून घ्यावे.

15 1 सर्व कर वसूलणारे आणि दुसरे मोठे पापी-गुन्हेगार येशू ख्रिस्तांचे
ऐकावयास येत असत. 2 म्हणूनच परूशी आणि धार्मिक कायदेतज्ञांनी
तक्रार केली की येशू गुन्हेगारांबरोबर उठतात-बसतात आणि त्यांच्याबरोबर
जेवतात. 3 म्हणून येशूंनी त्यांना एक उदाहरण (दाखला) सांगितले. 4 जर एका
माणसाकडे शंभर मेंढरे असतील आणि यांतील एक हरवले असेल, तर तो काय
करेल? तो नव्याण्णव जंगलात सोडून त्या एकाला तोपर्यंत शोधत राहणार
नाही काय; जोपर्यंत ते त्याला सापडत नाही? 5 जेव्हा ते त्याला सापडते तेव्हा
तो ते खांदयावर घेऊन आनंदाने घरी परततो. 6 घरी पोचल्यावर तो आपल्या
मित्रांना आणि नातेवाईकांना एकत्र बोलावितो, त्यांना म्हणतो, "माझ्याबरोबर
आनंद करा कारण मला माझे हरविलेले मेंढरू सापडले आहे." 7 अशाप्रकारे
जेव्हा एक पापी, पश्चातापी अंतःकरणाने, मन परिवर्तनाबरोबर परमेश्वराकडे
परत येतो, तेव्हा स्वर्गात एक असा मोठा (भव्य) आनंद साजरा केला जातो,
जसा त्या उरलेल्या नव्याण्णव लोकांसाठी साजरा केला जात नाही, ज्यांना मन
परिवर्तनाची गरज नाही. 8 ती कोण स्त्री असेल, जिच्याजवळ दहा चांदीची
नाणीं असता त्यांतील एक हरवले तर दिवा लावून, घर झाडून तोपर्यंत
चांगल्याप्रकारे शोधत नाही, जोपर्यंत ते नाणें तिला सापडत नाही? 9 हरवलेले
नाणें सापडल्यानंतर ती आपल्या मैत्रिणींना व शेजाऱ्यांना बोलावून म्हणते की
चला माझ्याबरोबर आनंद करा, कारण माझे हरवलेले नाणें मला सापडले आहे.
10 त्याचप्रमाणे, मी तुम्हांला सांगतो की परमेश्वराच्या परमेश्वरदूतांसमोर त्या

समयी आनंद साजरा केला जातो, ज्यावेळी एक दुष्ट पापी व्यक्ती मन बदलतो -
पश्चाताप करितो. 11 येशू म्हणाले, "एका मनुष्याला दोन मुलें होती. 12 लहान
मुलगा येऊन वडीलांना म्हणाला, "बाबा मालमत्तेचा, माझा जो वांटा आहे,
तो मला दया." वडीलांनी तसेच केले. 13 काही दिवसानंतर हा मुलगा आपले
सर्वकाही घेऊन एका दूरच्या देशी निघून गेला. तेथे जाऊन त्याने आपली सर्व
मालमत्ता उधळून टाकली. 14 सर्वकाही अशाप्रकारे उधळून टाकल्यानंतर तेथे
एक मोठा दुष्काळ पडला आणि तेव्हा त्याला खूप आर्थिक टंचाई व अडचण
भासू लागली. 15 म्हणून तो तेथील एका रहिवाश्याकडे जाऊन तेथे नोकरी करू
लागला; त्या माणसाने त्याला आपली डुकरें चारावयास शेतांत पाठविले. 16 तो
इतका उपाशी आणि भुकेला झाला की डुकरांचे भोजन, खावयासही तयार
झाला कारण कोणीही त्याला काहीही दयावयास तयार नव्हते. 17 शुद्धीवर
आणि भानावर आल्यानंतर तो स्वतःशीच म्हणाला, "माझ्या वडिलाच्या घरी
किती नोकर खातात आणि त्यानंतरही किती भोजन शिल्लक राहते, परंतु
मी येथे भुकेनें मरतो आहे. 18 मी आपल्या वडीलांकडे जाऊन त्यांला म्हणेन,
"बाबा, मी तुझ्या आणि परमेश्वर बापाविरूद्ध पाप केले आहे. 19 मी तुझा
मुलगा म्हणविण्याच्याही लायकीचा (योग्यतेचा) नाही, मला आपल्या येथे
एका नोकरासारखे ठेवूनधे ." 20 आणि तो उठला, आपल्या वडिलाच्या घराच्या
दिशेकडे चालू लागला. जेव्हा तो आता फार लांबच होता तेव्हा वडीलाने
त्याला पाहिले आणि त्याच्या वडीलांचे ह्रदय कळवळले; धावत जाऊन त्याने
त्याला गळयांत गळा घालून त्याचे खूप मुके घेतले. 21 मुलगा त्याला म्हणाला,
'बाबा, मी स्वर्गीक पित्याच्या विरोधात आणि तुझा दृष्टीनें पाप केले आहे आणि
आता माझी ही पात्रताच नाही की मी स्वतःला तुझा पुत्र म्हणूवून घ्यावे.'
22 परंतु वडीलाने आपल्या नोकरांना म्हटले, "ताबडतोब जा, उत्तम वस्त्रें याला
घाला, त्याच्या हातांत अंगठी आणि पायांत जोडे घाला; 23 आणि आपल्या
मेंढवाडयांतून उत्तम वासरू आणून कापा म्हणजे आपण खाऊन आनंदोत्सव
साजरा करू; कारण माझा मुलगा मेला होता आणि पुन्हा जिवंत झाला
आहे, हरवला होता आणि आता सापडला आहे; मग अशाप्रकारे ते घरांत
आनंद साजरा करू लागले. 25 पण त्याचा मोठा/वडील मुलगा शेतांत होता
आणि जेव्हा तो घराजवळ पोचला तेव्हा त्याने गाण्यांच्या, वादयांचा आणि

नाचण्याचा आवाज ऐकला. 26 तेव्हा त्याने एका दासाला बोलावून विचारले,
"हे सर्व काय चाललेले आहे?" 27 त्याने त्याला सांगितले, "आपला भाऊ आलेला
आहे आणि आपल्या वडलाने वासरूं कापले आहे, कारण त्याने त्याला सुखरूप
मिळविलेले आहे" 28 हे ऐकून मोठा भाऊ प्रचंड संतापला नव्हे वेडाच झाला
आणि तो आत जाण्यास मनाई करू लागला मग त्याचे वडील बाहेर आले आणि
त्याला समजवू लागले. 29 त्याने वडीलांना उत्तर दिले, "मी इतक्या वर्षांपासून
आपली सेवा करितो आहे आणि मी आपल्या आज्ञा कधीही मोडल्या नाहीत,
त्याचे उल्लंघन केले नाही, परंतु आपण मला शेळीचे एक करडूही दिले नाही की
मी आपल्या मित्रांबरोबर आनंद साजरा करावा. 30 पण हा आपला बिघडलेला
व्यभिचारी मुलगा ज्याने आपली सर्व संपत्ति वेश्यांवर खर्च करून उधळली,
आला असतांना, त्याच्याकरिता आपण पाळीव वासरू कापले." 31 वडीलांनी
त्याला उत्तर दिले, "बेटा-बाळा, तू तर नेहमीच (कायमचा) माझ्याबरोबर
आहेस आणि जे काही माझे आहे, ते सर्वकाही तुझेंच तर आहे ना? 32 पण आता
आपण आनंद केला पाहिजे, कारण तुझा हा भाऊ मेला होता, तो पुन्हा जिवंत
झाला आहे, हरवला होता, तो आता सापडला आहे"

# 16

1 येशूंनी आपल्या शिष्यांना पुढे ही गोष्ट सांगितली : एकदा असे झाले
की एक श्रीमंत मनुष्य होता, त्याने एक कारभारी (प्रबंधक) ठेविला
होता. एकदा असे ऐकण्यांत आले की तो आपल्या मालकाची संपत्ति उडवितो
आहे. 2 म्हणून त्याने कारभाऱ्याला बोलावून विचारले, "मी हे सर्व काय ऐकतो
आहे? तू तुझे वहीखाते नीट करून मला त्याचा हिशेब सादर कर". 3 तेव्हा
कारभारी विचार करू लागला की "आता मी काय-करू? माझा मालक माझे
काम काढून घेणार आहे; खडडे खणण्याचे काम तर माझ्याकडून होणार नाही,
भीक मी मागू शकत नाही. 4 ठीक आहे, आता मी एक असे काम करेन म्हणजे
जेव्हा माझा मालक मला कामावरून कमी करेल तेव्हा लोकांनी आपल्या घरांत
माझे स्वागत करावे". 5 म्हणून त्याने आपल्या मालकाच्या प्रत्येक कर्जदारास
बोलावून आधी असे विचारले, "तुझ्यावर किती कर्ज आहे?" 6 त्याने म्हटले
"आठशे गॅलन तेल" - कारभारी म्हणाला, "अर्धे म्हणजे 400 लिहून घे."
7 दुसऱ्याला त्याने विचारले, "तुला किती दयावयाचे आहे?" तो म्हणाला,

"1000 पोती गहू". कारभारी म्हणाला, "800 पोती लिहून घे." [8] त्या श्रीमंत
व्यापाऱ्याला मोठे कौतुक वाटले आणि त्याने कारभाऱ्याच्या धूर्तपणाची खूप
स्तुति केली आणि ही खरी गोष्ट आहे की ज्योतिच्या संतानांपेक्षा , सैतानाचे
संतान, जगिक बाबतीत भक्कम हुशार आणि चालू आहेत. [9] हे शिका, आपल्या
सांसारिक साधनांचा उपयोग दुसऱ्याच्या फायदयासाठी-हितासाठी आणि
त्यांना आपला मित्र करण्यासाठी करा म्हणजे जेव्हा जेव्हा तुमची जगिक संपत्ति
संपत जाईल तेव्हा तेव्हा ते लोक तुमचे स्वर्गात स्वागत करतील. [10] जर तुम्ही
लहान सहान गोष्टींत प्रामाणिक असलात तर, मोठया व पुष्कळ बाबींविषयीही
प्रामाणिक राहाल. पण, जर तुम्ही लहान/कमी गोष्टींत अप्रामाणिक आहात तर
तुम्हांला मोठया जबाबदाऱ्या कोण देईल? [11] जर तुम्ही धन-संपत्तिविषयी
भरंवसा ठेवण्याजोगे नाही, जे बहुत करून अनितीकारक मार्गांनी कमविले
जाते, तर खऱ्या धनाविषयी तुमच्यावर कोण भरंवसा करील? [12] आणि जर
तुम्ही दुसऱ्यांच्या वस्तूविषयी भरंवसा करण्याजोगे नाही, तर जे आपले तुझे
आहे, ते कोणी तुम्हांस कां देईल? [13] कोणताही नोकर दोन मालकांची सेवा
करू शकत नाही कारण तो एकावर कमी प्रेम करील आणि दुसऱ्याचा द्वेष
किंवा एकाशी निष्ठा राखील पण दुसऱ्याला तुच्छ लेखील. तुम्ही परमेश्वर आणि
संपत्ति या दोहोंची सेवा करू शकत नाही." [14] परूश्यांनी जेव्हा या गोष्टी
ऐकिल्या तेव्हा त्यांनी येशूंचा उपहास केला कारण त्यांना धन-संपत्ति खूप
अधिक प्रिय होती, त्यांकडे ते जास्त आकर्षित झालेले लोक होते. [15] तेव्हा येशू
त्यांना म्हणाले, "तुम्ही लोकांसमोर खूप धार्मिक होण्याचा/असण्याचा प्रयत्न
करिता, परंतु परमेश्वर तुमची अंतःकरणे (आंतरिक मन) नीट-नीट ओळखतो.
जग ज्याला सन्मान देते, ते परमेश्वराच्या दृष्टीत घृणास्पद आहे. [16] योहान
बाप्तिस्मा देणाऱ्याच्या(योहान) समयापर्यंत मोशेचे नियमशास्त्र व संदेष्टे तुमचे
मार्गदर्शक होते. परंतु परमेश्वर राज्याची सुवार्ता दिली जात आहे आणि प्रत्येक
व्यक्ती त्यात दाखल होण्याची धडपड करीत आहे. [17] पण याचा अर्थ असा
नाही की आमचा नियमशास्त्राशी काही संबंध नाही. आकाश आणि पृथ्वी
नाहीतशी होऊ शकतात परंतु परमेश्वराने म्हटलेले सर्व काही पूर्ण होणारच.
[18] उदाहरण पहा : एक मनुष्य सूटपत्र देतो, बायको त्यागितो आणि दुसरीशी
लग्न (व्यभिचार) करितो आणि जो मनुष्य सूटपत्र दिलेल्या अर्थात टाकलेल्या

स्त्रीशी लग्न करितो, तो देखील व्यभिचार करितो. [19] येशू म्हणाले, "एक श्रीमंत
मनुष्य होता; तो उच्चतम जांभळी आणि महागडी वस्त्रे घालीत असे आणि दर
दिवशी थाटाने ऐश (सुख-चैन) करीत असे. [20] आणि लाजर नांवाचा एक
भिकारी होता; त्याच्या शरीरावर फोड होते आणि तो श्रीमंत मनुष्याच्या
दाराजवळ पडलेला असे. [21] त्या श्रीमंत माणसाच्या मेजावरून जे काही भोजन
खाली पडत असे त्याने (उष्टे) तो तुझे पोट भरून घेत असे. [22] काही समयानंतर,
तो गरीब भिकारी लाजर मेला आणि त्यानंतर परमेश्वरदूतांनी त्याला
अब्राहामाच्या उराशी पोहचविले. श्रीमंत मनुष्यही एके दिवशी मरण पावला;
त्याला पुरिले गेले. [23] तो नरकीय पीडेने तळमळू-तडफडू (व्यथित झाला)
लागला आणि त्याने डोळे वर करून पाहिले तर लाजर त्याला स्वर्गात बसलेला
आढळला. [24] ओरडून त्याने अब्राहामाला हाक मारली आणि त्याला म्हणाला,
"हे बापा अब्राहामा, माझ्यावर कृपा करा आणि लाजराला पाठवा की त्याने
पाण्याने भिजलेले त्याचे बोट माझ्या जीभेवर ठेवून ती थंड करावी, कारण मी
अग्नीसारख्या ज्वालांत भाजतो आहे - क्लेशाने यातना सहन करीत आहे."
[25] परंतु अब्राहाम म्हणाला, "बेटा, तुझ्या जीवनकाळी तू उत्तम वस्तूंचा आनंद
घेतलास आणि लाजर अभावात-कमतरतेत जीवन जगत राहिला, पण आता
तो मजेत आहे आणि तू क्लेशात आहेस. [26] शिवाय तुझ्या आणि आमच्यामध्ये
एक मोठा दरा आहे, या कारणाने, तिकडून इकडे कोणीही ये-जा करू शकत
नाही". [27,28] तेव्हा श्रीमंत मनुष्य त्याला म्हणाला, "मी आपल्याशी याचना
करितो की आपण लाजराला माझ्या घरी पाठवावे; माझ्या पांच भावांना या
स्थळाविषयी सावध करावे, त्यांनी या पीडेच्या जागी येण्याची निवड-(निर्णय)
करता कामां नये". [29] अब्राहाम त्याला म्हणाला, "त्यांच्याजवळ मोशे आणि
संदेष्टयांची तालीम आहे. त्यांनी त्यांचे ऐकावे." [30] तेव्हा तो म्हणाला, "नाही,
बापा अब्राहामा, जर मेलेल्यांपैकी कोणी त्यांच्याजवळ जाऊन सांगेल तेव्हाच
ते त्याचे ऐकतील. [31] तेव्हा अब्राहामाने श्रीमंत व्यक्तिला म्हटले, "जर ते मोशे
व संदेष्टयांचे ऐकत नाहीत, तर, जर मेले कोणी जिवंत होऊन त्यांना सांगेल,
तरी ते त्याचे का ऐकतील?"

# 17

1 तेव्हा येशू शिष्यांना म्हणाले, "असे होऊ शकत नाही की लोकांपुढे
अडखळणें येऊ नयेत (अशक्य आहे) परंतु ज्याच्याद्वारे ती अडखळणें
येतात त्याची काय दुर्दशा होईल! 2 त्याच्यासाठी हेच बरे ठरेल की त्याच्या
गळयात जात्याची तळी बांधून समुद्राच्या खोलीपर्यंत त्याला बुडवून टाकिले
जावे यासाठी की त्याने या लहानांतील एकालाही अडखळण करू नये आणि
त्याचे नुकसान होऊ देऊ नये. 3 सावध असा! जर तुमचा भाऊ तुमच्याविरूद्ध
अपराध करीत असेल तर, त्याच्यावर राग प्रगट करा; जर तो आपले मन
बदलत असेल आणि पश्चाताप करीत असेल तर त्याला क्षमा करा. 4 जर तो
तुमच्याविरूद्ध एकाच दिवशी सात वेळा अपराध करीत असेल आणि सात
वेळां येऊन तुम्हांला म्हणत असेल की, "मला क्षमा कर" तर त्याला क्षमा
करा." 5 तेव्हा प्रेषित येऊन येशूंना म्हणाले, "गुरूजी आमचा विश्वास मोठा
करा (वाढ करा)" 6 येशू म्हणाले, "जर तुमच्याजवळ मोहरीच्या दाण्याएवढा
भरंवसा आहे तर, तुम्ही या झाडाला म्हणाल, "मुळांसह उपट आणि समुद्रात
जाऊन पड, तर असेच होईल. 7 तुमच्यातील कोण आहे ज्याच्याकडे नोकर
आहे, जो त्याचा नांगरणारा किंवा मेंढरें राखणारा आहे, शेतातून आल्यावर
ताबडतोब त्याला म्हणेल, "जा भोजन करावयास बैस" 8 नाही, तुम्ही तर
नोकराला म्हणाल, "तयारी कर आणि माझ्यासाठी भोजन वाढ, त्यानंतरच
तू भोजन कर". 9 तुम्ही त्या नोकराला त्याच्या आज्ञाधारकपणाकरिता धन्य
म्हणाल काय? त्याचे उपकार मानाल काय? मला तसे वाटत नाही. 10 या
कारणास्तव तुम्हांला सांगितलेली कामें केल्यानंतर म्हणा, आम्ही निरूपयोगी
ठरलो आहोत, आम्ही(कार्यभार पार पाडून) तेच सर्व केले जे आम्ही करावयाचे
होते". 11 यरूशलेमेस जातांना येशूंना शोमरोन व गालील यांतून जावे लागले.
12 ज्यावेळी येशू एका गावात शिरणार होते त्यांना दहा कोढी भेटले, ते बरेच
लांब उभे होते. 13 मोठयाने ओरडून ते म्हणाले, "प्रभु येशू, आमच्यावर दया
करा." 14 त्यांना पाहून येशू म्हणाले, "जा, स्वतःला याजकांसमोर प्रस्तुत
करा, त्यांना दाखवा; जेव्हा ते वाटेतच होते, तेव्हाच सर्वचे सर्व बरें झाले.
15 बरे झाल्यानंतर त्यांपैकी एकाने वळून मोठयाने उंच आवाजात परमेश्वराचे
आभार मानिले. 16 पाल्थे पडून त्याने येशूंचे आभार मानिले; तो शोमरोनचा
होता. 17 येशूंनी हे सर्व पाहून त्या शोमरोन्यास विचारले, "सर्व दहाचे दहा बरें

झाले नाहीत काय? बाकी नऊ कोठे आहेत? 18 याला सोडून बाकीचे लोक
धन्यवाद करावयास परत आले नाही! 19 येशू म्हणाले, "ऊठ, आणि परत जा.
तुझ्या विश्वासामुळे तू बरा झाला आहेस." 20 एकदा जेव्हा एका परूश्याने
येशूंना परमेश्वरीय शासन (परमेश्वराचे राज्य) येण्याविषयी विचारले, तेव्हा
येशू म्हणाले, "प्रतिक्षा केल्याने किंवा वाट पाहिल्याने परमेश्वराचे राज्य येत
नाही, 21 लोक असे म्हणणार नाहीत; ते येथे आहे किंवा तेथे आहे. वास्तविकता
हीच आहे की हे शासन (राज्य) तुमच्यामध्येच आहे. 22 येशूंनी शिष्यांना म्हटले,
"असा समय येणार आहे, जेव्हा तुम्ही मला पाहण्याची इच्छा बाळगाल, परंतु
पाहू शकणार नाही. 23 लोक तुम्हांला म्हणतील, पाहा, ते येथे किंवा तेथे
आहेत. तुम्ही त्यांच्या मागे-मागे जाऊ नका. 24 ज्याप्रकारे आकाशात वीज एका
बाजूने निघून दुसऱ्या बाजूपर्यंत जाते, तसेच मनुष्याच्या पुत्राचे आगमन होईल.
25 पण, या आधी मला दुःख भोगावयाचे आहे आणि मला नाकारले जाईल.
26 जसे नोहाच्या समयी होत असे, तसेच मी येण्यापूर्वी होईल. 27 जोपर्यंत नोहा
जहाजांत दाखल झाला नाही त्या समयापर्यंत देखील लोक खाण्यात-पिण्यात
आणि लग्न करून घेण्यात व देण्यात रमलेले होते (गुंतलेले होते), आणि
त्यानंतर प्रलयाने त्या सर्वांना नाश केले. 28 जसे लोटाच्या दिवसांत झाले तसेच
होईल. ते सर्व खाणे-पिणे आणि विकत घेणे आणि विकणे, इमारते बांधण्यात
लागलेले होते, 29 पण ज्या दिवशी लोट सदोमातून बाहेर पडला, अग्नि व
गंधक आकाशातून (खाली) आली आणि सर्वांचा नाश झाला. 30 ज्या दिवशी
मनुष्याचा पुत्र प्रगट होईल, त्या दिवशी असेच होईल. 31 त्या दिवशी जो
घराच्या धाब्यावर असेल आणि ज्याचे सामान घरांत असेल, आणि त्याचप्रमाणे
जो बाहेर मैदानांत/शेतांत असेल त्याने सामान नेण्याकरिता जावयाचे नाही.
32 लोटाच्या बायकोची आठवण ठेवा. 33 जो आपले जीवन सांभाळण्याची
इच्छा बाळगेल, तो ते गमावेल आणि जो गमावेल, तोच ते वांचवू शकेल. 34 मी
तुम्हांला सांगतो की, त्या रात्री एकाच बिछान्यावर दोन जण असतील, एक
उचलून घेतला जाईल, दुसरा सोडून दिला जाईल. 35 दोन लोक मिळून दळीत
असतील, एकास घेतले जाईल, दुसरा तसाच सोडून दिला जाईल. 36 दोन लोक
शेतांत असतील, एक घेतला जाईल आणि दुसरा सोडून दिला जाईल." 37 त्या

लोकांनी म्हटले, "प्रभुजी, असे कोठे होईल" येशू म्हणाले, "जेथे प्रेत असतात
तेथेच गिधाडें जमतात."

18 1 लोकांना हे शिकविण्यासाठी की त्यांनी कधी खचू नये, उदास होऊ
नये, परंतु परमेश्वर बापाशी प्रार्थना करीत राहावे, 2 येशूंनी असे
सांगितले की, "एका शहरात एक न्यायाधीश होता जो जगाच्या स्वामीला/
परमेश्वराला भीत नसे आणि माणसांचा आदरही करीत नसे. 3 एकदा
त्याच शहरांत राहणारी एक विधवा त्याच्याजवळ येऊन म्हणाली, "माझ्या
शत्रूंविरूद्ध मला न्याय मिळवून दया". 4 काही काळ त्या न्यायाधीशाने तिच्या
विनंतीची पर्वा केली नाही, पण नंतर तो स्वतःशीच म्हणाला, "जरी मी
परमेश्वराला भीत नाही आणि माणसांचा आदर करीत नाही, 5 तरीपण, ही
विधवा मला सतत त्रास देते म्हणून मी तिला न्याय मिळवून देणारच." 6 येशू
म्हणाले, "पाहा, तुम्ही पाहिले का, तो अन्यायी न्यायाधीश काय म्हणाला?
7 म्हणून जे लोक चिकाटीने सहन करीत राहतात आणि रात्रंदिवस परमेश्वराला
हाका मारतात, त्यांना परमेश्वर न्याय मिळवून देणार नाही काय? 8 मी
तुम्हांला सांगतो, की परमेश्वर बाप अतिशय लवकरच त्यांच्याकरिता न्यायाचे
कार्य करील, तो विलंब लावणारच नाही. तरीही जेव्हा मनुष्याचा पुत्र
दुसऱ्यांदा येईल तेव्हा किती लोकांना विश्वासात दृढ असलेले पाहू शकेल?
9 येशूंनी अनेक दाखले त्या लोकांनाही सांगितले जे स्वतःला खूप धार्मिक
समजत होते आणि दुसऱ्यांना तुच्छ (नीच) लेखित होते. 10 दोघे जण मंदिरात
प्रार्थना करावयास गेले. त्यांत एक परूशी होता व दुसरा कर वसूलणारा.
11 परूशी उभा होऊन परमेश्वराला म्हणू लागला, 'हे स्वामी, हे प्रभु, मी
तुझे आभार मानितो, मी दुसऱ्या लोकांसारखा नाही : लोकांना लुबाडणारा,
अन्याय करणारा, व्यभिचारी किंवा या कर वसूली करणाऱ्यासारखाही नाही.
12 प्रत्येक आठवडयात मी दोनदा उपास करितो; सर्व वस्तूंचा दशांश देतो."
13 कर वसूली करणाऱ्याने आकाशाकडे दृष्टि लावण्याची हिंमत (धाडस) देखील
केली नाही आणि आपली छाती बडवीत लज्जेने तो म्हणाला, "हे परमेश्वरा,
मी दुष्ट आहे; माझ्यावर दया कर". 14 तुम्हांला ठाऊक आहे काय, की हा
दुसरा व्यक्ती निरपराधी (नीतिमान) ठरविला गेला. कारण प्रत्येक मनुष्य जो

स्वतःला मोठा करतो, उंच करतो तो खाली (नमविला) केला जाईल आणि
जो स्वतःला लहान (नम्र) करतो तो उंच केला जाईल, वर चढविला जाईल."
15 ते लोक लहान बाळकांना येशूंजवळ घेऊन आले की त्यांनी बाळकांना स्पर्श
करावा, पण जेव्हा शिष्यांनी पाहिले, तेव्हा त्यांनी लोकांना दटाविले. 16 येशूंनी
लहान बाळकांना आपल्याजवळ बोलाविले आणि म्हटले, "लहान बाळकांना
माझ्याजवळ येऊ दया, त्यांना मनाई करू नका, कारण अबोध आणि निरागस
लोकच परमेश्वरीय राज्याचे भागीदार होतात. 17 मी तुम्हांला सत्य सांगतो, की
जे लहान बाळकांप्रमाणे परमेश्वरीय राज्य स्वीकारीत नाहीत ते त्यात कधीही
प्रवेश/दाखला मिळविणार नाहीत. 18 एका अधिकाऱ्याने येशूंना विचारले,
"उत्तम गुरूजी, अनंत जीवन मिळविण्याकरिता मी काय करावयास हवे?"
19 येशू म्हणाले, "मला उत्तम का म्हणतोस? परमेश्वराव्यतिरीक्त कोणीही उत्तम
नाही. 20 तुला आज्ञा तर ठाऊक आहेतच : दुष्कर्म (व्यभिचार) करू नको, हत्या
करू नको, चोरी करू नको, खोटी साक्ष देण्यापासून सावध रहा आणि आपल्या
आईबापाचा सन्मान कर. 21 तो म्हणाला, "हे सर्वकाही मी तरूणावस्थेपासून
करीत आलो आहे." 22 हे ऐकून येशू म्हणाले, आताही तुझ्यात एक उणीव
आहे. जे काही तुझ्याजवळ आहे, ते सर्व गरीबांना वाटून दे आणि स्वर्गात तुला
खजिना मिळेल. हो आणि माझ्यामागे ये, माझा शिष्य हो." 23 हे सर्व ऐकून तो
दुःखी झाला कारण तो बहुत श्रीमंत होता. 24 तो तरूण दुःखी झालेला पाहून
येशू म्हणाले, "श्रीमंत लोकांकरिता परमेश्वराच्या राज्यात प्रवेश करणें किती
कठीण आहे; 25 यापेक्षा एका उंटाकरिता सुईच्या नांकातून निघणे किती सोपे
आहे, परंतु श्रीमंत माणसाचा परमेश्वराच्या राज्यात प्रवेश होणे अशक्य व
कठीण आहे." 26 तेव्हा तेथे उभे राहून ऐकणारे लोक म्हणाले, "तर मग पापांची
क्षमा कोण प्राप्त करू शकेल?" 27 तेव्हा येशू म्हणाले, "ज्या गोष्टी माणसांकडून
होऊ शकत नाहीत (शक्य नाहीत) त्या सर्वसामर्थी परमेश्वराद्वारे होऊ शकतात;
नव्हे परमेश्वर ते करू शकतो." 28 तेव्हा पेत्राने म्हटले, "पहा, आम्ही सर्वकाही
सोडून तुझे शिष्य झालो आहोत." 29 येशू त्याला म्हणाले, "वास्तविकता हीच
आहे की असा कोणीही नाही ज्याने, घर, आईबाप, भाऊबहीण, पत्नी किंवा
मुलें, परमेश्वराच्या राज्याकरिता सोडून दिलेले आहे 30 आणि ज्याला याच
जगात पुष्कळ पटीने आणि येणाऱ्या युगांत ज्याला अनंत जीवन मिळणार

नाही." 31 तेव्हा येशूंनी बारा जणांना जवळ बोलावून त्यांना म्हटले, "आपण
सर्व यरूशलेमेस रवाना होऊ आणि ज्या गोष्टी, माझ्याविषयी संदेष्टयांनी
सांगितल्या होत्या, त्या पूर्ण होतील. 32 कारण त्याला गैर यहूदयांच्या हाती
सोपविलें जाईल आणि लोक त्याचा अनादर करतील, थट्टा करतील आणि
त्यावर थुंकले जाईल. 33 ते लोक त्याला फटके मारतील आणि त्याचा जीव
घेतील, परंतु तो तिसऱ्या दिवशी पुन्हा उठेल." 34 या सर्व गोष्टी शिष्यांना
समजल्या नाहीत, अर्थात त्यांच्यापासून गुप्त राहिल्यात आणि जे काही त्यांना
सांगितले जात होते, ते त्यांच्या डोक्यांत शिरले समजले नाही. 35 जेव्हा येशू
यरीहोजवळ पोचले तेव्हा त्यानी एका भिकाऱ्याला भीक मागतांना पाहिले.
36 तेथून लोकसमुदायाच्या जाण्याचा आवाज येताच तेथे काय होत आहे आणि
त्या हालचालीचे कारण काय, असे त्याने लोकांना विचारले, 37 लोकांनी उत्तर
दिले, "नासरेथकर येशू येथून जात आहेत." 38 तेव्हा मोठयाने ओरडून तो
म्हणाला, "दावीदाच्या पुत्रा, माझ्यावर दया करा." 39 पुढे चालणाऱ्या लोकांनी
त्याला दटाविले आणि गप्प रहावयास सांगितले, पण तो आणखी उंच आणि
मोठया आवाजात ओरडून म्हणाला, "दावीदाच्या पुत्रा, माझ्यावर दया करा."
40 येशू तेथेच थांबले आणि त्यानी हुकूम दिला की त्याला त्यांच्याजवळ घेऊन
यावे. 41 तो जवळ येताच येशूंनी त्याला विचारले, तुला काय हवे आहे? तो
म्हणाला, "हेच की मी डोळस व्हावे आणि मला दृष्टि यावी". 42 येशू म्हणाले,
"तू पाहू लाग, तुला दृष्टि यावी, तुझ्या विश्वासाने तुला बरें केले आहे." 43 त्याच
समयापासून तो पाहू लागला. परमेश्वराची स्तुति करीत तो येशूंमागे चालू
लागला आणि सर्व लोकांनी हे पाहून परमेश्वराची स्तुति केली.

# 19

1 येशू यरीहो नांवाच्या नगरातून पुढे जात होते. 2 त्यासमयी एक
जक्कय नांवाचा कर वसुलणाऱ्यांचा प्रमुख होता, तो श्रीमंत होता.
3 त्याने येशूंना पाहण्याचा प्रयत्न केला परंतु लोकांच्या गर्दीमुळे आणि ठेंगणा
(बुटका) असल्यामुळे, त्याला कठीण जात होते. 4 त्याच वाटेवरून धावत जाऊन
तो एका उंबराच्या झाडावर चढून बसला. 5 येशू तेथे येऊन पोचले आणि
त्यानी तुझे डोळे वर करून पाहिले आणि म्हटले, "जक्कय लवकर खाली ये,
कारण आज मी तुझ्या घरी येऊन भोजन करणार आहे." 6 तो झपाटयाने खाली

उतरला आणि मोठया आनंदाने येशूंना आपल्या घरी घेऊन गेला आणि त्यांचे
स्वागत केले. 7 हे सर्व पाहून लोक कुरकुर करून म्हणाले, "अरे, येशू तर दुष्ट
माणसाच्या घरी जात आहेत." 8 उभा होऊन जक्कय येशूंना म्हणाला, "पाहा
येशू, मी आपल्या संपत्तिचा अर्धा भाग/वांटा गरीबांना देईन, जर मी धोक्याने
कोणालाही लुबाडले असेल तर ते चौपट परत देईन." 9 येशू म्हणाले, "आज या
घरात पापांची क्षमा झाली आहे कारण जक्कय देखील अब्राहामाचा पुत्र आहे.
10 मनुष्याचा पुत्र हरवलेले शोधण्यासाठी आणि त्याचा उद्धार करण्यासाठी
आला आहे." 11 ते लोक परमेश्वराचे राज्य खूपच लवकर येण्याविषयीच्या
आशेत होते; यरूशलेमेच्या जवळ येताच जेव्हा त्यांचे कान या सर्व गोष्टी
ऐकण्याकरिता उघडे होते, येशूंनी त्यांना हा दाखला सांगितला. 12 "एक श्रीमंत
मनुष्य दूर देशी गेला, त्याचा हेतू असा होता की त्याने राज्य जिंकून परत यावे.
13 ही योजना अमलांत आणण्यापूर्वी त्याने आपल्या दहा सेवकांना बोलाविले.
त्यांना त्याने दहा मोहरा दिल्या आणि म्हणाला, "जोपर्यंत मी परत येत नाही,
तुम्ही या मोहरांवर व्यापार करा, त्या कारभारांत लावा." 14 परंतु त्याच्याच
लोकांना त्याचा हेवा वाटत होता, ते त्याचा द्वेष करीत होते म्हणून त्यांनी तुझे
संदेश वाहक पाठवून असा संदेश पोचता केला की यानें आमच्यावर राज्य करावें
हे आम्हांस नको, तशी आमची इच्छा नाही. 15 तो राजपद (राज्य) मिळवून
जेव्हा परत आला तेव्हा त्याने आपल्या सेवकांना ज्यांना त्याने मोहरा दिल्या
होत्या, आपल्याजवळ बोलाविले, कारण त्याला माहिती करून घ्यायची होती
की त्यानी व्यापार करून काय मिळविले आहे. 16 मग पहिला येऊन त्याला
म्हणाला, "मालक, आपल्या पैश्यांवर मी तेवढेच आणखी कमविले." 17 तो
त्याला म्हणाला, "शाबास, तू थोडया पैश्यांत प्रामाणिक राहिलास, आतापासून
तू दहा नगरांवर अधिकार/ताबा मिळविला आहेस." 18 दुसऱ्याने सुद्धा येऊन
म्हटले, "मालक, हे पहा, जे आपण मला दिले होते त्या आपल्या मोहरेवर मी
पांच मोहरा आणखी कमविल्या आहेत". 19 त्याला देखील मालकाने पांच
नगरांची जबाबदारी सोपविली. 20 तिसरा देखील मालकाला म्हणाला, "ही
पहा, आपली मोहर, जी आपण मला दिली होती, मी ती खूप काळजीपूर्वक
कपडयांत गुंडाळून ठेवली होती. 21 कारण आपण कठोर (कडक) आहात, मला
आपली भीति वाटते; आपण जेथे ठेवीत नाही तेथे शोधता आणि जेथे पेरीत

नाही तेथे कापणी करता". 22 तेव्हा तो श्रीमंत मनुष्य म्हणाला, "हे दुष्ट माणसा,
तुझ्याच तोंडच्या शब्दाने मी तुझा न्याय करितो. मी जेथे ठेवीत नाही तेथूनच
अपेक्षा करीन आणि जेथे पेरीत नाही तेथेच कापणी करीन हे तुला ठाऊक होते
मग मी दिलेली रक्कम तू बैंकेत का ठेविली नाहीस म्हणजे व्याजासह मला माझा
पैसा मिळाला असता." 24 तेथे उभे राहणाऱ्या लोकांना मालक म्हणाला,,
"या नोकराकडून त्याची मोहर घेऊन त्याला देऊन टाका, ज्याने सर्वात जास्त
कमविले आहे." 25 लोक म्हणाले, "मालक, त्याच्याजवळ आधीच दहा मोहरा
आहेत." 26 मालक पुन्हा म्हणाला, "ज्याच्याजवळ आधीपासून आहे त्याला
आणखी मिळेल, ज्याच्याजवळ कमी आहे, त्याच्यापासून तेही घेतले जाईल.
27 माझ्या त्या शत्रूंना माझ्याजवळ घेऊन या ज्यांना हे नको की मी त्यांच्यावर
शासन करावे, माझ्यासमोरच त्यांना ठार करा." 28 हे सर्व बोलून येशू पुढे
यरूशलेमेकडे चालत गेले. 29 जेव्हा ते बेथफगे व बेथानी गावांत, जैतूनांच्या
डोंगराजवळ पोहचले, येशूंनी दोन शिष्यांना असे सांगून पाठविले, 30 समोरच्या
गावात प्रवेश करताच, तुम्हांला गाढवाचे एक शिंगरू (पिलू) बांधलेले आढळेल,
त्यांवर कधीही कोणीही बसले नाही, ते सोडून येथे घेऊन या; 31 जर कोणी
विचारले की, असे कां करिता, तर म्हणा की, येशूंना त्याची गरज आहे."
32 पाठविलेल्या शिष्यांनी जाऊन तसेच पाहिले जसे त्यांना सांगितले गेले होते.
33 जेव्हा ते शिंगरू सोडीत होते, मालकाने त्यांना विचारले, "हे काय करीत
आहात? 34 तेव्हा ते म्हणाले, "येशूंना याची गरज आहे." 35 त्यानी ते शिंगरू
येशूंकडे आणले आणि त्यावर आपली वस्त्रें घालून येशूंना त्यांवर बसविले.
36 चालतांना त्यानी आपली वस्त्रें वाटेंवर पसरली. 37 जेव्हा येशू जैतूनांच्या
डोंगरावरून खाली उतरत होते, तेव्हा शिष्यांची गर्दी उंच आणि मोठया
आवाजांत आनंदाने परमेश्वराने केलेल्या महान कार्यांकरिता परमेश्वराची स्तुति
करीत होती. 38 ते मोठयाने ओरडत होते, "जो राजा प्रभूच्या नांवाने येत आहे
तो महान आहे, आकाशांत शांति आणि उंच ठिकाणी त्यांची महिमा होवो".
39 त्या गर्दीतून काही परूशी म्हणाले, "गुरूजी, आपल्या शिष्यांना मनाई करा
त्यांना रागवा ते मोठा आवाज करीत आहेत". 40 उत्तर देऊन येशू म्हणाले,
"मी तुम्हांला सांगतो की जर हे लोक माझी स्तुति करणार नाहीत आणि गप्प
राहिले तर धोंडे ओरडतील." 41 शहराजवळ येताच येशू रडू लागले आणि

म्हणाले, 42 "किती बरें झाले असते जर आज तू शांति देणाऱ्या गोष्टींविषयी
जाणून घेतले असते, पण त्या गोष्टी तुझ्या नजरेपासून गुप्त (लपविल्या) ठेविल्या
आहेत. 43 एक दिवस असा येईल जेव्हा तुझे शत्रु तुझ्या चाऱ्हीं बाजूला दगडांची
तटभिंत उभी करतील, 44 ते तुमच्याभोवती वेढा घालतील, तुमचा नायनाट
करतील. तू आणि तुझी मुलेंबाळें ते धुळीत मिळवितील ते एकही चिरा येथे राहू
देणार नाहीत; कारण तुम्ही कृपासंधिची किंमत ओळखली नाही". 45 यानंतर ते
प्रार्थना भवनाच्या (मंदिराच्या) आत गेले आणि तेथे विक्री करणाऱ्यांना बाहेर
हाकलू लागले आणि म्हणाले, 46 "लिहिले आहे की, माझे घर प्रार्थनेचे घर
म्हणविले जाईल, पण, तुम्ही याला डाकूंची गुहा करून टाकिले आहे. 47 येशू
प्रत्येक दिवशी प्रार्थना भवनांत शिकवीत राहिले; पण मुख्य याजक आणि
शिक्षक व पुढारी या सर्वांनी मिळून येशूंचा घात करण्याची योजना तयार केली.
48 ते काही करू शकले नाही कारण सर्व लोक मोठे लक्ष देऊन येशूंची शिकवण
ऐकत होते.

## 20

1 एके दिवशी जेव्हा येशू आपल्या शिष्यांसमवेत लोकांना सुवार्ता
सांगत होते, तेव्हा तेथे मुख्य याजक आणि शास्त्री, वडील मंडळीच्या
लोकांबरोबर येऊन उभे झाले. 2 त्यांचे म्हणणे असे होते की कोणाच्या
अधिकाराने येशू या सर्व गोष्टी करित होते किंवा कोणी येशूंना हा अधिकार
दिला होता हे येशूंनी त्यांना सांगावे. 3 उत्तर देऊन येशू म्हणाले, "मी पण
तुम्हांला एक प्रश्न विचारतो आणि तुम्ही त्याचे उत्तर दयावे. 4 "योहानाचा
बाप्तिस्मा परमेश्वरातर्फे होता की माणसांतर्फे?" 5 ते आपसांत म्हणूं लागले,
"जर आम्ही म्हटले की परमेश्वरातर्फे होता, तर येशू म्हणतील की मग तुम्ही
त्यावर भरंवसा का ठेविला नाही; 6 जर आपण म्हटले, तो मनुष्यांपासूनचा
होता तर सर्व लोक आपल्याला दगडमार करतील, कारण योहानाला लोक
एक संदेष्टा समजत होते." 7 म्हणून त्यांनी उत्तर दिले, "आम्हांला काहीच
ठाऊक नाही." 8 येशू देखील त्यांना म्हणाले, "मीही तुम्हांला सांगत नाही
की मी कोणाच्या अधिकाराने हे सर्व करितो." 9 तेव्हा येशू लोकांना हा
दाखला सांगू लागले; "एका मनुष्याने द्राक्षाची बाग लाविली आणि बागेची
देखरेख करणाऱ्यांवर जबाबदारी सोपवून तो पुष्कळ दिवसांकरिता दूर देशी

निघून गेला. 10 मग द्राक्षांच्या कापणीच्या हंगामात त्याने आपला एक नोकर
त्या मळेकऱ्यांकडे पाठविला, कारण त्याला आपल्या बागेतून काही द्राक्षे
हवी होती, परंतु झाले काय की, त्या मळेकऱ्यांनी त्याला मारहाण केली
आणि रिकाम्या हाताने परत पाठवून दिले. 11 मग पुन्हा त्याने दुसरा नोकर
पाठविला; त्याच्याशीहि त्यांनी तसाच व्यवहार केला. 12 मग त्याने तिसरा
नोकर पाठविला, पण त्यालाही घायाळ करून बाहेर फेकले गेले. 13 तेव्हा त्या
बागेचा मालक म्हणाला, "मी काय करू? आता मी आपल्या स्वतःच्या मुलाला
पाठविन. कदाचित त्याला पाहून ते त्याचा आदर-सन्मान करतील." 14 जेव्हा
त्या मळेकऱ्यांनी त्याच्या मुलाला पाहिले, तेव्हा ते आपसांत म्हणाले, "हा तर
मालमत्तेचा वारीस आहे, चला या, आपण यालाहि जिवें मारू म्हणजे त्याचे
वतन, त्याचे सर्वस्व आपढेच होऊन जाईल." 15 मग ते त्याला बागेबाहेर घेऊन
गेले आणि त्याला ठार केले. आता मग, बागेचा मालक येऊन त्यांच्याशी कशी
वागणूक करील? 16 तो आला आणि त्याने बागेत काम करणाऱ्यांना मारिले
आणि बाग दुसऱ्यांना देऊन टाकली." हे सर्व ऐकून ते म्हणाले, "असे होऊ नये."
17 त्यांनी त्यांना पाहून म्हटले, "तर लिहिलेला तो लेख कोणाकरिताचा आहे,
की जो दगडाला बांधणाऱ्यांनी- बेकार बिनकामी समजलां होता, तोच दगड
कोनशिला ठरला आहे. 18 जो कोणी त्या दगडावर पडेल, त्याचा नाश होईल;
परंतु ज्यावर हा दगड पडेल त्याचा चुराडा करून टाकील." 19 त्यावेळी मुख्य
याजक आणि शास्त्री याच बेतांत होते की कशाही प्रकारे येशूंना पकडावे, पण
त्यांना लोकांची भीति वाटत होती. त्यांना नीट कळले होते की या दाखल्याद्वारे
येशू आपल्याकडेच संकेत करीत होते. 20 येशूंच्या पाळतीवर राहून त्यानी
जासूस/हेर पाठविले की त्यांनी धार्मिक असल्याचे सांगून येशूंना त्यांच्याच
बोलण्यात धरावे, म्हणजे त्यांना सुभेदाराच्या हाती आणि अधिकारात सोपवून
देता यावे. 21 येशूंशी बोलतांना, ते लोक येशूंना विचारू लागले "गुरूजी, यात
शंकाच नाही की आपण परमेश्वराचा मार्ग दाखविता आणि खरा उपदेश देता
आणि कोणाची खुशामद करीत नाही, तोंड पाहून बोलित नाही. 22 आता
आम्हांला आपणच सांगावे की आम्ही कैसराला कर दिला पाहिजे की नाही?"
23 त्यांची कपटी अंतःकरणे व चलाखी ओळखून येशूंनी त्यांना म्हटले, "तुम्ही
मला का पारखता? 24 चांदीचे एक नाणें मला दाखवा, याच्यावर कोणाचे

चित्र आहे?" ते म्हणाले, "राजाचे". 25 येशू म्हणाले, "जो राजाचा हिस्सा
आहे तो राजाला दया आणि जे काही परमेश्वराचे आहे ते परमेश्वरांला दया."
26 लोकांच्या उपस्थितीत, येशूंनी म्हटलेल्या गोष्टींवर त्यांचे विरोधी काहीही
टीका करू शकले नाही, त्यांच्या उत्तराचे त्यांना आश्चर्य वाटले आणि ते निरूत्तर
झाले." 27 मग पुनरूत्थानांवर विश्वास नसणारे सदूकी येशूंजवळ येऊन म्हणाले,
28 "गुरूजी, मोशेने लिहिले आहे की जर एखादा मनुष्य ज्याला मुलेंबाळें
नाही आणि तो मेला तर त्याच्या भावाने त्या स्त्रीशी विवाह करून आपल्या
भावाचा वंश चालवावा; 29 सात भाऊ होते असे समजा आणि पहिल्याचा
विवाह तर झाला, पण तो निःसंतान असा मरण पावला. 30 दुसऱ्या भावाने त्या
स्त्रीशी विवाह केला आणि तो देखील मुलें बाळें न होता मेला. 31 मग तिसऱ्या
भावाने त्या स्त्रीला आपली बायको म्हणून स्वीकारले; अशाप्रकारे ते सातही
भाऊ, मुलेंबाळें न होता मरण पावले. 32 शेवटी ती स्त्रीही मेली. 33 म्हणून
जेव्हा पुनरूत्थान होईल, तेव्हा ती कोणाची बायको होईल, कारण ती सातही
भावांची बायको झाली होती"? 34 उत्तर देऊन येशू म्हणाले, "या जगात लोक
लग्न करतात आणि करून देतात; 35 परंतु जे लोक येणाऱ्या दुनियेचे वारीस
आहेत आणि मेलेल्यांतून पुनरूत्थान होणाऱ्यांत त्यांची गणना होत असेल त्या
सर्व लोकांसाठी तेथे लग्न म्हणून नाहीच. 36 ते लोक पुन्हा मरणारही नाहीत
कारण ते परमेश्वरदूतांसारखे होतील आणि परमेश्वराचे संतान असतील. एक
नवीन जीवन जगण्यासाठी त्यांचे पुनरूत्थान होईल कारण ते पुनरूत्थान प्राप्त
केलेले असे परमेश्वराचे संतान असतील. 37 आता मोशेने झुडपाच्या घटनेत,
अब्राहाम, इसहाक आणि याकोब यांच्या मरणानंतरच्या पुष्कळ काळानंतर,
परमेश्वराला अब्राहाम, इसहाक आणि याकोबाचा परमेश्वर म्हटले आणि
त्याद्वारे दर्शविले की मेलेले उठविले जातात. 38 परमेश्वर मेलेल्यांचा नव्हें
तर जिवंतांचा (लोकांचा) परमेश्वर आहे कारण परमेश्वराजवळ सर्व जिवंत
आहेत." 39 हे ऐकून शास्त्र्यांपैकी काही म्हणाले, "हे गुरूजी, आपण उत्तम
बोलता." 40 यानंतर पुढे आणखी काही विचारण्याची हिंमत कोणीही केली
नाही. 41 येशू त्या लोकांना म्हणाले, ख्रिस्त दावीदाचा पुत्र का म्हणविला
जातो? 42,43 दावीदाने स्वतः स्तोत्रांच्या पुस्तकांत लिहिले आहे, "प्रभूने माझ्या
प्रभूला सांगितले, जोपर्यंत मी तुझे शत्रु तुझ्या पायांसाठीचे 'पादासन' करीत

नाही तोपर्यंत, सर्व अधिकार आपल्या ताब्यांत ठेव अर्थात तू माझ्या उजवीकडे
बसून राहा"
44 दावीद त्यांना प्रभु म्हणतो, तर मग ते (येशू) त्याचे संतान/
पुत्र कसे?
45 लोक त्याचे ऐकत असतांनाच, येशू आपल्या शिष्यांना म्हणाले,
46 "शास्त्र्यांविषयी सावध असा. त्यांना लांब झगे घालून फिरणे फार आवडते.
ते बाजारांत लोकांकडून सलाम घेत फिरतात. त्यांना सभा संमेलनात पुढच्या
जागा आणि मेजवानीच्या ठिकाणी मुख्य जागा खूप आवडतात.
47 ते विधवांवर
अन्याय करितात, त्यांना लुबाडतात आणि ढोंग करून लांबलचक प्रार्थना
करितात; या लोकांना तर खूप शिक्षा होईल.

# 21

1 येशूंनी प्रार्थना भवनातील दानपेटीत श्रीमंताना पैसे टाकतांना
पाहिले.
2 एक गरीब विधवा देखील तांब्याची दोन लहान नाणी
टाकते आहे, हे येशूंनी पाहिले.
3 तेव्हा येशू म्हणाले, "मी तुम्हांला एक सत्य
सांगतो : या गरीब विधवेने दुसऱ्या सर्व लोकांपेक्षा सर्वात अधिक दान टाकले
आहे.
4 या सर्वांनी आपल्या पैश्यांच्या विपुलतेतून, परमेश्वराला दिले आहे,
परंतु आपल्या गरीबीतून आणि आपल्या ठेवीतून जणूकाही या विधवेने आपढे
सर्वस्वच टाकले आहे."
5 काही लोक प्रार्थना भवनाविषयी बोलत होते की सुंदर
पाषाणांनी आणि अर्पणाच्या भेटींनी ते किती सजविलेले आहे.
6 तेव्हा येशू
म्हणाले, 'या दिसणाऱ्या गोष्टींविषयी विचाराल तर असे दिवस येणार आहेत
जेव्हा एका पाषाणावर, दुसरा पाषाण (दगडाचे चिरे) दिसणार/आढळणार
नाही, ते सर्व पाडले जातील."
7 ते विचारू लागले, "गुरूजी, असे केव्हा होईल?
या घटना घडण्याच्या समयाचे काय चिन्ह असेल?"
8 येशू म्हणाले, "सावध
असा, यासाठी की तुम्ही भिऊ नये; पुष्कळ लोक असा दावा करीत येतील
की तेच येशू ख्रिस्त आहेत आणि तो समय जवळ येतच आहे म्हणून त्यांचे
ऐकू नका.
9 म्हणून तुम्ही युद्ध आणि दंग्यांविषयीचे समाचार ऐकाल, तेव्हा
भिऊ नका; कारण तसे होणे अवश्य आहे, तरीपण अंत अदयाप दूरच असेल".
10 मग येशू त्यांना म्हणाले, "एक देश दुसऱ्या देशाविरूद्ध आणि एक राज्य
दुसऱ्या राज्याविरूद्ध उठून उभे राहील.
11 वेगवेगळया ठिकाणी भूकंप, मऱ्या
येतील, आकाशात भीतिदायक भयंकर वस्तु दिसतील आणि मोठमोठीं चिन्हें
देखील.
12 परंतु या सर्व गोष्टी घडण्यापूर्वी, ते तुम्हांला पकडतील, छळतील

आणि तुरूंगाच्या स्वाधीन करितील. [13] माझा द्वेष (वैर) करण्याचे मुख्य कारण
असल्यामुळे ते तुम्हांला शासकांच्या आणि अधिकाऱ्यांच्यापुढे आणतील. यामुळे
तुम्हांला माझ्याविषयी सांगण्याची (साक्ष देण्याची) संधी मिळेल. [14] म्हणून
आधीपासूनच ठाम निश्चय करा की, उत्तर काय दयावे, याचा तुम्ही विचारही
करणार नाही. [15] याकरिता की मी तुम्हांला ज्ञान व समज आणि शब्दही
देईन की तुम्हांला काय बोलावयाचे आहे (अर्थात तुम्ही तेथे काय बोलावे);
त्यामुळे कोणीही तुमचा विरोध करू शकणार नाही. [16] तुमचे आईवडील,
भाऊ, नातेवाईक तुम्हांला धोका देतील, तुमच्यापैकी काही लोकांना ते जिवें
मारतील. [17] माझ्याप्रति तुमचे समर्पण व प्रामाणिकपणा पाहून लोक तुमचा
द्वेष करितील. [18] परंतु तरीही कोणी तुमचे काहींच वाईट करू शकणार नाही.
[19] तुम्ही धीर आणि सहनशक्तीच्या बळावर (च्या कारणामुळे) आपला प्राण
(जीव) वाचविण्यात यशस्वी व्हाल. [20] जेव्हा तुम्ही यरूशलेमेला सैन्यांच्या
फौजांनी वेढिलेले पाहाल, तेव्हा समजून घ्या की त्याचे नष्ट होणे जवळ आहे.
[21] तेव्हा, जे लोक यहूदीयांत असतील, त्यानी डोंगरात पळून जावे आणि
जे यरूशलेमेत (आंत) असतील त्यानी बाहेर निघून जावे. जे शेतांत आहेत,
त्यांनी त्याच्या आंत येण्याचा प्रयत्न करू नये. [22] हे "सूड घेण्याचे" दिवस
असतील, यासाठी की जे काही लिहिलेले आहे ते सर्व पूर्ण व्हावे. [23] दुःख या
गोष्टीचे आहे की गर्भवती आणि बाळांना पाजणाऱ्या आयांना त्या दिवसांत
खूप कठीण परिस्थिती सहन करावी लागेल, त्यांची दुर्दशा होईल, कारण
त्या लोकांवर मोठा क्लेश व मोठे संकट येईल. [24] त्यांना तरवारीच्या धारेचा
सामना करावा लागेल. (तोंड दयावे लागेल) आणि गुलामासारखे बंदिवान
करून त्यांना सर्व राष्ट्रांत नेले जाईल. यरूशलेम तोवर गैरयहूदी लोकांच्या
पायाखाली तोवर तुडविले जाईल, जोवर गैरयहूदीयांचा समय पूर्ण होत नाही.
[25] सूर्य, चंद्र आणि तारे यांत चिन्ह पाहिले जातील. याबरोबरच, पृथ्वीवरचे
सर्व देश घाबरे होतील आणि बुचकाळयांत पडतील; तसेच समुद्रांत गर्जना
होईल आणि लाटा अनियंत्रित होतील; त्यामुळे लोक भीतिने थरथर कांपतील.
[26] पृथ्वीवर घडणाऱ्या घटनांमुळे माणसांच्या अंतःकरणांत भीति व धास्ती
निर्माण होऊन ते भयभीत होतील कारण आकाशांत असणारी बळें (शक्ति)
हलविली जातील (तोल जाईल). [27] आणि त्यानंतर ते मनुष्याचा पुत्र मोठया

वैभवाने, गौरवाने, सामर्थ्याने आणि महिमेने मेघावर आरूढ (स्वारी करून)
होऊन येतांना पाहतील. 28 जेव्हा या गोष्टींचा आरंभ होऊ लागेल तेव्हा
आपली डोकी वर करा; कारण तुमच्या मुक्तीचा समय बराच जवळ आला
आहे. 29,30 येशूंनी त्यांना एक दाखला सांगितला, "अंजिराचे झाड व दुसरी
झाडें पाहा. त्यांना पानें फुटू लागतात, तेव्हा तुम्ही ओळखून घेता की उन्हाळा
येणार आहे. 31 याचप्रकारे, जेव्हा तुम्ही या सर्व घटना घडतांना पाहाल तेव्हा
ओळखून घ्या की परमेश्वराचे राज्य (शासन) जवळ आले आहे. 32 मी तुम्हांला
निश्चित सांगतो की जोपर्यंत या सर्व गोष्टी पूर्ण होत नाही तोपर्यंत ही पिढी
नाहीतशी होणार नाही. 33 आकाश व पृथ्वी आपले स्थान सोडून नाहीशी होऊ
शकतात परंतु माझी वचनें पूर्ण होतीलच म्हणजे होतीलच; 34 म्हणून जागृत
असा यासाठी की तुमची अंतःकरणें दारूबाजी आणि सांसारिक चिंतेने आळशी
होऊन जाऊ नयेत आणि तो दिवस कदाचित अचानक तुमच्यावर येऊन ठेपेल.
35 कारण की तो दिवस, तो समय, संपूर्ण पृथ्वीवर राहणाऱ्या सर्व लोकांवर
एका जाळयाप्रमाणें येईल. 36 म्हणूनच नेहमी सावध असा आणि प्रार्थना करीत
राहा, यासाठी की तुम्ही येणाऱ्या सर्व गोष्टींपासून आपला बचाव करावा आणि
माझ्यासमोर उभे राहून हिशेब दयावयास समर्थ असावे. 37 दिवसा येशू प्रार्थना
भवनांत शिकवीत असत आणि रात्री ते जैतूनांच्या डोंगरावर आपला वेळ
घालवित असत. 38 सकाळच्या (भल्या पहाटे) समयी सर्व लोक प्रार्थना भवनांत
येशूंचे ऐकण्यास येत असत.

22 1 वल्हांडणाचा सण ज्याला बेखमीर भाकरींचा सण सुद्धा म्हणतात,
जवळ आलेला होता. 2 मुख्य याजक आणि शास्त्री, लोकांना भीत
होते, पण याविषयी योजना करीत होते आणि संधिच्या शोधात होते की
येशूंना कशाप्रकारे जिवें मारावे. 3 बारा शिष्यांतून एक यहूदा इस्कर्योत होता
ज्यात सैतानाने प्रवेश केला. 4 मुख्य याजकांशी आणि प्रार्थना भवनाची
सुरक्षा करणाऱ्यांशी त्याने बोलणे केले की तो कशाप्रकारे येशूंना त्यांच्या
हाती धरून देईल आणि स्वाधीन करेल. 5 त्याची योजना त्यांना आवडली
आणि त्यांनी त्याला पैसा देण्याची प्रतिज्ञा केली; 6 यहूदाने त्यांना वचन दिले
आणि तो संधिच्या शोधात (येशूंच्या जवळपास जेव्हा लोकांची गर्दी नसेल)

लागला. 7 वल्हांडणाचा बलिदान समय म्हणजे बेखमीर भाकरीचा दिवस
येऊन ठेपला. 8 येशूंनी पेत्र व योहानाला वल्हांडणाच्या भोजनाची व्यवस्था
करावयास पाठविले. 9 ते दोघे म्हणाले, "आपणाला कोणते स्थळ हवे, जेथे
आम्ही त्याची तयारी करावी?" 10 येशू त्या दोघांना म्हणाले, "नगरात प्रवेश
करीत असतांना तुम्हांला पाण्याचे मडके घेऊन जाणारा एक व्यक्ती आढळेल
तो ज्या घरात प्रवेश करेल तेथेच तुम्हीही जा. 11 घराच्या मालकाला म्हणा
की, "गुरूजींनी विचारले आहे की पाहुण्यांची खोली कोठे आहे, ज्यात मी
आपल्या शिष्यांबरोबर वल्हांडणाचे भोजन करावे?" 12 तो तुम्हांला सजवून
सुशोभित केलेली एक माडी दाखवील, तेथेच तुम्ही पूर्ण तयारी करावी."
13 त्यांना जसे सांगितले होते, ते त्यांना अगदी तसेच आढळले आणि त्या जागी
त्यानी वल्हांडणाची व्यवस्था केली. 14 आणि मग जेव्हा तो दिवस आणि समय
आला, येशू आपल्या शिष्यांबरोबर वल्हांडणाचे भोजन खावयास बसले. 15 येशू
म्हणाले, "मी दुःख भोगण्यापूर्वी ह्रदयाच्या खोलीपासून माझी हीच कामना
आहे की मी तुम्हां सर्वांबरोबर वल्हांडणाचे जेवण करावे. 16 मी तुम्हांला
सांगतो की, जोपर्यंत परमेश्वराच्या राज्यांत हे पूर्ण होत नाही, तोपर्यंत यापुढे
मी भोजन पुन्हा खाणार नाही". 17 मग प्याला हातांत घेऊन, आभार मानून,
येशूंनी म्हटले, "चला हे आपसांत वाटून घ्या, 18 मी तुम्हांला सांगून ठेवतो की
जोपर्यंत परमेश्वराचे राज्य येत नाही तोपर्यंत मी द्राक्षाचा रस पिणार नाही."
19 येशूंनी भाकर हातांत घेतली, आभार मानून ती मोडली आणि असे म्हणून
त्यांना दिली की, "हे माझे शरीर आहे हे तुमच्याकरिता दिले गेले आहे. मला
स्मरण करण्यासाठी हेच कराल." 20 भाकर खाल्ल्यानंतर येशूंनी प्याला घेऊन
तसेच म्हटले जसे भाकर देतांना म्हटले होते, "हा प्याला, माझे रक्त आहे जे
तुम्हांकरिता वाहविले जाणार आहे, नवीन कराराचे हे रक्त आहे; 21 पण पाहा,
जो मला धोका देऊन धरून देणार आहे, त्याचा हात माझ्याबरोबर मेजावर
आहे. 22 जसे व्हावयाचे आहे, तसे माझ्याकरिता घडेलच, पण दुःख त्या
व्यक्तीसाठीचे आहे जो माझा विश्वासघात करेल, कारण त्याची केवढी दुर्दशा
होणार आहे!" 23 मग हे ऐकून ते सर्व आपसांत या गोष्टीवर प्रश्न-उत्तर करू
लागले की, त्यांच्यापैकी कोण असे करणार आहे? 24 त्यांच्यात हा विवाद आणि
चर्चा देखील झाली की त्यांच्यात मोठा कोण आहे. 25 येशू त्यांना म्हणाले,

"गैरयहूदी लोकांत त्यांचे राजे शासन चालवितात अािण त्यांच्यावर आपल्या
अधिकारांचा उपयोग करितात, ते त्यांचे "सुचिंतक" म्हणवितात; 26 पण
तुमच्यामध्ये असे होता कामा नये. तुमच्यामध्ये मोठयाने लहान व्हावे आणि
जे पुढारी आहेत त्यानी सेवा करावयाची आहे. 27 शेवटी मोठा कोण आहे, जो
भोजन करीत आहे किंवा जो वाढतो आहे, सेवा करितो आहे? खाणाऱ्यांना मोठे
समजले जात नाही काय? परंतु मी तुम्हांमध्ये सेवकासारखा आहे. 28 माझ्या
परीक्षा (पारख) होत असतांना तुम्हीच मला आधार दिलेला आहे, तुम्हीच
माझ्याबरोबर उभे राहिला आहात. 29 ज्याप्रकारे परमेश्वराने मला राज्याचा
हक्क दिला आहे, मी देखील तुम्हांला एक (स्वर्गीक) राज्य देत आहे, 30 जेणेकरून
माझ्या राज्यात, माझ्या मेजावरून तुम्हीही खावे-प्यावे आणि राजसिंहासनावर
बसून इस्त्राएलांच्या बारा वशांचा न्याय करावा." 31 येशू म्हणाले, "शिमोना,
शिमोना, सैतानाने तुम्हांला मागून घेतले आहे की त्याने तुम्हांला गव्हांसारखे
चाळावे. 32 परंतु मी तुझ्याकरिता अशी मागणी, प्रार्थना व विनवणी केलेली
आहे की तुझा विश्वास डळमळू नये आणि जेव्हा तू पुन्हा मजबूत होशील, परत
वळशील तेव्हा आपल्या भावांना मजबूत व बळवंत कर". 33 त्याने येशूंना
उत्तर दिले, "प्रभुजी, मी आपल्याकरिता फक्त तुरूंगात जाण्याकरिताच नव्हे
तर मरावयासही सज्ज आहे." 34 येशू त्याला म्हणाले, "मी तुला सांगतो की
आज तोपर्यंत कोंबडा आरवणार नाही जोपर्यंत तू मला ओळखतोस, हे तीनदां
नाकारणार नाहीस." 35 येशू म्हणाले, "मला सांगा ज्यावेळी मी तुम्हांला
पिशवी, झोळी आणि चपला यांशिवाय पाठविले होते, त्यावेळी तुम्हांला
कोणत्याही वस्तूची उणीव भासली होती काय? काही कमी पडले काय?" ते
सर्व त्यांना म्हणाले, "नाही, नाहीच मुळी." 36 तेव्हा येशू त्यांना म्हणाले, "परंतु
आता ज्याच्याजवळ एक पिशवी आहे, ती त्याने घ्यावी आणि बरोबर एक
झोळीही घ्यावी. ज्याच्याजवळ तरवार नाही, त्याने आपले वस्त्र विकावे आणि
एक तरवार विकत घ्यावी. 37 मी तुम्हांला सांगतो की जे काही लिहिले आहे
ते माझ्या ठायी पूर्ण होईल आणि ते येणेप्रमाणे आहे : "संपूर्ण अपराध्यांमध्ये
त्याचीही गणना केली गेली होती; माझ्याविषयी लिहिलेल्या या गोष्टी पूर्ण
होतीलच." 38 ते म्हणू लागले, "गुरूजी, पाहा, येथे दोन तरवारी आहेत", येशू
त्यांना म्हणाले, "पुरे आहेत". 39 आपल्या सवयीप्रमाणे येशू, जैतून डोंगराकडे

गेले आणि त्याचे शिष्यही त्यांच्याबरोबर तेथे गेले. 40 तेथे पोचल्यानंतर येशू
त्यांना म्हणाले, "प्रार्थना करा की तुम्ही प्रलोभनांत (परीक्षेत) पडूं नये." 41 येशू
त्यांच्यापासून थोडे लांब/दूर गेले आणि गुडघे टेकून परमेश्वराशी बोलू लागले,
"बापा, हे पित्या, जर तुला हवे असेल, तुझी तशी इच्छा असेल तर, हा प्याला
अर्थात येणारे दुःख मजवर येऊ देऊ नको; 42 तरीही हे बापा, माझी नव्हे तर
आपली इच्छा तू पूर्ण व्हावी." 43 त्याचवेळी आकाशातून एक परमेश्वरदूत
येऊन त्यांना शक्ति/हिंमत देऊ लागला. 44 पीडेने विव्हळून येशू आणखी अधिक
कळकळीने परमेश्वर बापाशी प्रार्थनेद्वारे बोलू लागले; आणि येशू ख्रिस्तांचा
घाम, रक्ताचे मोठाले थेंब जमिनीवर पडावे तसा पडू लागला. 45 तेथून परत
येशू शिष्यांजवळ आले, परंतु खिन्न आणि उदास झाल्यामुळे ते त्यांना झोपलेल्या
अवस्थेत आढळले. 46 आणि येशू त्यांना म्हणाले, "तुम्ही का झोपत आहा?
उठा आणि प्रार्थना करा की तुम्ही परीक्षेंत पडूं नये." 47 ज्यावेळी येशू असे
म्हणतच होते त्याचवेळी तेथे अचानक एक मोठा लोकसमुदाय हजर झाला.
यहूदा जो बारा शिष्यांपैकी एक होता, त्या समुदायापुढे चालत येत होता.
येशूंचे चुंबन घेण्यासाठी तो पुढे येशूंजवळ आला. 48 परंतु येशू त्याला म्हणाले,
"यहूदा! चुंबन घेऊन तू मला धरून देतोस काय? तुला तेच हवे आहे काय?"
49 येशूंच्या चाऱ्ही बाजूला उभे असलेल्या लोकांनी जेव्हा हे पाहिले, तेव्हा ते
म्हणाले, "गुरूजी, आम्ही तरवारीने प्रहार करावयाचा काय?" 50 त्यांच्यापैकी
कोणी एकाने तरवार चालवून मुख्य याजकाच्या नोकराचा कान उडविला.
51 यानंतर येशूंनी त्याच्या कानांस स्पर्श करून त्याला बरें केले. 52 मग येशू,
मुख्य याजक, प्रार्थना भवनाचे सुरक्षाधिकारी आणि वडीलमंडळीला उद्देशून
म्हणाले, "तुम्ही मला चोरासारखे आणि इतर लुटारूसारखे पकडावे, म्हणून
तरवारी आणि दुसरी हत्यारें घेऊन आला आहात काय?" 53 मी प्रत्येक दिवशी
तुमच्याबरोबर राहात असे, तेव्हा तुमच्यापैकी कोणीही माझ्याविरूद्ध हात
उचलला नाही; परंतु या वेळी, या घटकेचे मालक व स्वामी तुम्हीच आहात
आणि सैतानाची शक्तिही तुमच्याच पक्षाची आहे, 54 मग ते लोक येशूंना
आपल्याबरोबर घेऊन मुख्य याजकाच्या घरापर्यंत गेले, पण पेत्र हळू हळू मागे
चालत राहिला. 55 ज्या ठिकाणी लोक अंगणात विस्तव पेटवून बसले होते,
त्याच ठिकाणी पेत्र देखील त्यांच्याजवळ जाऊन बसला. 56 त्याच समयी एक

मोलकरीण/दासी तेथे आली आणि पेत्राला तेथे बसलेला पाहून म्हणाली, "हा
मनुष्यही येशूंबरोबर होता" 57 पेत्र लगेच बोलला, "अरे बाई, मी तर त्या
व्यक्तिला ओळखत देखील नाही." 58 काही वेळानंतर कोणीतरी दुसऱ्या व्यक्तिने
पेत्राला तेथे बसलेला पाहून म्हटले, "तू सुद्धा त्याच्या बरोबर होतास"; पण पेत्र
म्हणाला, "नाहीच मुळी, मी तर त्याला ओळखतही नाही." 59 एका तासानंतर
आणखी दुसरा एकजण म्हणाला, "खरोखर हा व्यक्ती त्याच्याबरोबर होताच,
कारण हा देखील गालीलवासी आहे." 60 तेव्हा पेत्र म्हणाला, "अरे माणसा,
तू काय बोलत आहेस, मला तुझे बोलणे समजतच नाहीये" त्याच समयी
कोंबडा आरवला; 61 त्याच क्षणी येशूंनी वळून पेत्राकडे पाहिले. पेत्रालाही
येशूंनी सांगितलेली गोष्ट आठवली की आज कोंबडा आरवण्यापूर्वी तू तीन
वेळा माला नाकारशील. 62 तेव्हा पेत्र बाहेर गेला आणि विव्हळून-कळकळून
मोठया वेदनेने रडू लागला. 63 येशूंना धरणारे लोक त्यांची थट्टा-मस्करी करू
लागले होते शिवाय ते त्यांना मारीतही होते. 64 येशूंच्या डोळयांवर पट्टी
बांधून, त्यांनी येशूंना चपराक (थापड) मारून विचारले, "सांग बरे! तुला कोणी
मारले? 65 येशूंविरूद्ध ते अपशब्द बोलत होते, त्यांचा अपमान व निंदा करीत
होते. 66 सकाळ झाल्यावर, वडीलमंडळी, मुख्य याजक आणि शास्त्री एकत्र
जमून आले आणि ते येशूंना सभेत (न्याय) घेऊन गेले; त्यांना विचारू लागले,
"तूच ख्रिस्त आहेस काय?" 67 येशूंनी उत्तर दिले, "जर मी होय म्हटले तर तुम्ही
विश्वास धरणार नाही, 68 जर मी तुम्हांला प्रश्न विचारले तर, तुम्ही मला उत्तर
देणार नाही आणि जाऊही देणार नाही. 69 यापुढें मी परमेश्वराच्या समस्त
अधिकारांसमवेत असेन." 70 तेव्हा सर्वांनी प्रश्न केला, "तू परमेश्वरापासूनच
आहेस काय?" येशूंनी उत्तर दिले, "होय, तुम्ही जे म्हणता, मी तोच आहे."
71 तेव्हा ते लोक म्हणाले, "आता आपल्याला आणखी कोणाच्या साक्षीची गरज
नाहीच, कारण आपण स्वतः येशूंच्या तोंडून सर्वकाही ऐकले आहे".

# 23

1 पूर्ण सभा (मंडळी) तेथून उठली आणि येशूंना पिलाताकडे घेऊन
गेली. 2 येशूंविरूद्ध त्यानी म्हटले की, "आम्ही स्वतः पाहिले आहे
की हा स्वतःला ख्रिस्त आणि राजा म्हणतो आणि लोकांना कर देण्याची
मनाई करतो, हा मनुष्य या सर्व गोष्टींद्वारे आमच्या राष्ट्राला फितवीत आहे,

सर्वांची दिशाभूल करतो आहे." 3 पिलात येशूंना म्हणाला, "तू यहूदयांचा
राजा आहेस काय?" येशूंनी उत्तर देऊन म्हटले, "आपण खरेच बोलत आहात."
4 तेव्हा पिलात मुख्य याजकांना म्हणाला, "मला या मनुष्यात कोणताही
दोष आढळत नाहीये." 5 आणि ते अधिक संतापाने आणि आक्रोशाने म्हणू
लागले की, "गालीलापासून येथपर्यंत यहूदीयांमध्ये शिक्षण देऊन हा लोकांना
भडकवित राहिलेला आहे." 6 जेव्हा पिलाताने 'गालीली' शब्द ऐकला तेव्हा ते
गालीलवासी आहेत की नाही अशी चौकशी केली. 7 ज्या क्षणी पिलाताला
कळले की येशू हेरोदाच्या विभागाचे आहेत, त्याने लगेच येशूंना हेरोदाकडे
पाठवून दिले. त्यासमयी हेरोद यरूशलेमातच होता. 8 हेरोदाने येशूंविषयी
बरेंच काही ऐकलेले होते. त्यामुळे बऱ्याच दिवसांपासून तो येशूंना आणि
त्यांच्याद्वारे होणारी आश्चर्यकृत्यें-अद्‌भुतें पाहण्याची कामना करीत होता,
म्हणून येशूंना पाहून हेरोदाला खूप आनंद झाला. 9 त्याने येशूंना बरेंच काही
प्रश्न विचारले, चौकशी केली, परंतु येशूंनी त्याला काहीही उत्तर दिले नाही.
10 तेथे उभे राहिलेले मुख्य याजक आणि शास्त्री संतप्त (रागाने) होऊन येशूंवर
आरोपांचा भडिमार करतच राहिले. 11 आपल्या सैनिकांसमवेत हेरोदाने येशूंचा
अपमान केला, त्यांची थट्टा केली आणि राजसी वस्त्रें त्यांच्या अंगावर घालून
त्यांना परत पिलाताकडे पाठवून दिले. 12 त्याच दिवशी पिलात व हेरोदाची
आपसात मैत्री झाली कारण त्यापूर्वी ते एकमेकांचे शत्रु होते. 13 पिलाताने
प्रमुख याजक आणि लोकांचे इतर पुढारी आपल्याजवळ बोलाविले आणि तो
त्यांना म्हणाला, "तुम्ही याला दुसऱ्यांची दिशाभूल करणारा आणि फितविणारा
असा आरोप ठेवून त्याला माझ्यासमोर आणले आहे. 14 पण चौकशी केल्यानंतर
मला हा व्यक्ती निरपराधी वाटतो आहे. 15 त्याने असे काहीही केले नाही की
त्याकरिता त्याला मृत्यूदंडाची शिक्षा ऐकविली जावी; हेरोदालाही त्याच्यात
काही दोष आढळला नाही. 16 म्हणून मी त्याला शिक्षा देऊन सोडून देईन.
17 असे आवश्यकही होते कारण सणाच्या समयी तो त्यांच्याकरिता कोणत्याही
एका आरोपीला मुक्त करीत असे. 18 ते लगेच आरडाओरड करू लागले, "हा
मनुष्य आम्हांला नको; याला सोडू नका, आमच्याकरिता बरब्बाला सोडा."
19 बरब्बाला शहरांत बंडखोरीच्या आणि खूनाच्या आरोपामुळे तुरूंगात ठेवलेले
होते. 20 म्हणून पिलाताने येशूंना सोडून देण्याची इच्छा बाळगून पुन्हा त्या

लोकांना समजाविण्याचा प्रयत्न केला. [21] परंतु ते पुन्हा ओरडू लागले आणि
म्हणाले, "याला क्रूसावर खिळा, क्रूसावर खिळा." [22] तिसऱ्यांदा तो म्हणाला
"का?" त्याने असे काय केले आहे? मला तर त्याच्यात मृत्यूदंड देण्यासारखा
कोणताच दोष आढळत नाही, म्हणून मी त्याला शिक्षा देऊन सोडून देईन."
[23] तेथे उभे असलेले लोक आणखी जोरजोराने ओरडून आग्रह करून येशूंना
क्रूसावरचे मरण दयावे अशी मागणी करू लागले. मुख्य याजक आणि तेथे
उभे असलेल्या लोकांची मागणी पिलाताने मान्य केली. [24] आणि शेवटी,
त्यांच्या मागणीनुसार येशूंना मृत्यूदंडाची शिक्षा व्हावी असा हुकूम पिलाताने
दिला; [25] आणि त्या लोकांची मागणी व मर्जी स्वीकारून त्याने, तो व्यक्ती
मुक्त केला, ज्याच्यावर विद्रोह आणि हत्येचा आरोप होता. परंतु येशूंना
त्याने त्या लोकांच्या स्वाधीन केले. [26] पुढे जातांना, त्यानी शिमोन कुरेनेकर
नांवाचा एक मनुष्य येतांना पाहिला. त्यांनी येशूंचा क्रूस त्यावर लादला;
शिमोन क्रूस घेऊन येशूंमागे जाऊ लागला. [27] रडणाऱ्या आणि शोक करणाऱ्या
स्त्रियांचा एक मोठा समुदाय येशूंच्या मागे मागे चालू लागला होता. [28] येशू
मागे वळून म्हणाले, "यरूशलेमेच्या कन्यांनो, माझ्यासाठी रडू नका, परंतु
आपल्यासाठी आणि आपल्या मुलांबाळांसाठी रडा. [29] पाहा, असा समय येणार
आहे जेव्हा सर्व लोक म्हणतील वांझ आणि ती गर्भाशयें ज्यांत बाळ राहिलेले
नाही आणि ती स्तनें, ज्यांनी दूध पाजिलेले नाही तीसुखी अर्थात धन्य आहेत.
[30] त्या समयी ते म्हणतील, पर्वतांनो आमच्यावर पडा, हे डोंगर-टेकडयांनो,
आम्हांस झाकून घ्या, [31] कारण त्यांनी ओल्या अर्थात हिरव्या झाडाला असे
केले तर वाळलेल्यांशी ते काय काय करणार नाहीत?" [32] दोन अपराध्यांना
क्रूसावर खिळण्यासाठी येशूंबरोबर नेले. [33] ज्यावेळी ते सर्वजण कवटी/कालवरी
नांवाच्या जागी पोहचले त्यावेळी तेथेच येशूंना आणि त्यांच्या दोन्हीं बाजूला
या दोन अपराध्यांना क्रूसावर खिळले गेले. [34] तेव्हा येशू म्हणाले, "हे बापा,
या लोकांना क्षमा करा, कारण यांना समजले नाही की ते काय करीत आहेत."
त्या लोकांनी चिठया टाकून येशूंची वस्त्रें आपसांत वांटून घेतली. [35] तेथे उभे
असलेले लोक सर्वकाही पाहत राहिले. अधिकाऱ्यांनीही थट्टा करीत म्हटले,
"याने दुसऱ्यांना वाचविले, जर तो परमेश्वराचा निवडलेला ख्रिस्त आहे तर
आता त्याने स्वतःला वाचवावे." [36] सैनिकांनी येशूंना 'आंब' देतांना, त्यांची

थटट करून म्हटले, [37] "जर तू यहूदयांचा राजा आहेस तर स्वतःला वाचीव
(आपला बचाव कर)". [38] क्रूसावरच त्यांनी ग्रीक, लॅटिन आणि इब्री भाषेत
एक लेख लिहिला की, "हा यहूदयांचा राजा आहे" आणि तो येशूंच्या वरती
लाविला. [39] क्रूसावर खिळलेल्या दोन अपराध्यांपैकी एकाने येशूंना म्हटले,
"जर तू ख्रीस्त आहेस तर, आम्हांला आणि स्वतःला वाचीव." [40] परंतु दुसऱ्याने
रागावून त्याला म्हटले, "तुला परमेश्वराचे भय वाटत नाही काय, की तुलाही
तीच शिक्षा झाली आहे?" [41] आपण तर आपल्या कर्मांची शिक्षा भोगित
आहोत, पण या मनुष्याने काहीही वाईट केलेले नाही." [42] तो येशूंना म्हणाला,
"प्रभुजी, जेव्हा आपण शासन करण्याकरिता आपल्या राजाधिकाराने याल,
तेव्हा माझी आठवण असू दया." [43] येशूंनी उत्तर देऊन म्हटले, "मी खरे सांगतो
की तू माझ्याबरोबर आजच स्वर्गलोकात असशील." [44] दुपारपासून तिसऱ्या
प्रहरापर्यंत आकाशात अंधार पसरला. [45] सूर्य नाहीसा (काळा) झाला आणि
प्रार्थना भवनाचा पडदा मधून फाटून त्याचे दोन तुकडे झाले. [46] येशूंनी उंच
स्वराने ओरडून म्हटले, "हे बापा, मी आपला आत्मा तुझ्या स्वाधीन करितो."
असे म्हणून येशूंनीआपला प्राण त्यागिला. [47] जेव्हा सुभेदाराने हे सर्व पाहिले,
तेव्हा असे म्हणून त्याने परमेश्वराचे गौरव केले की, "खरोखर, हा एक नीतिमान
(सात्विक-खरा) मनुष्य होता". [48] तेथे जमलेले लोक हे सर्व पाहून आपली
छाती बडवित(हायहाय) परत गेले. [49] येशूंना ओळखणारे सर्वजण, त्यांचे मित्र
इत्यादि आणि गालीलातून त्यांच्याबरोबर आलेल्या स्त्रिया दूर उभ्या राहून, या
सर्व गोष्टी पाहात होत्या. [50] योसेफ नांवाचा एक न्यायसभेचा सदस्य होता, तो
सज्जन आणि धार्मिक पुरूष होता; [51] तो अधिकारी व याजक यांच्या विचारांशी
व या कृत्याशी सहमत नव्हता, संतुष्ट नव्हता. तो यहूदयांचे शहर अरिमथाई
येथील निवासी होता आणि परमेश्वराच्या राज्याची वाट पाहात होता.
[52] त्याने पिलाताकडे जाऊन येशूंचे शव मागितले; [53] आणि ते क्रूसावरून खाली
काढून चादरीत गुंडाळिले; आणि एका कबरेंत ठेविले जी खडकांत खोदलेली
होती. त्या कबरेंत कोणालाही तोवर ठेवले गेले नव्हते. [54] तो वल्हांडणाच्या
तयारीचा दिवस होता आणि शब्बाथाच्या दिवसाचा आरंभ होणारच होता.
[55] त्याच्याबरोबर गालीलातून आलेल्या स्त्रियांही होत्या, त्याच्या मागे येऊन
त्यांनी ती कबर पाहिली आणि येशूंचे शरीर (शव) कसे ठेविले आहे, हे देखील

पाहिले. [56] त्या परत गेल्या आणि त्यानी सुगंधी वस्तु आणि सुवासिक तेल
अर्थात अत्तर तयार केले. परंतु शब्बाथाच्या दिवशी परमेश्वराच्या आज्ञेनुसार
त्यानी विश्राम केला.

# 24

[1] आठवडयाचा पहिला दिवस होता; भल्या पहाटे तयार केलेली
सुगंधी द्रव्यें घेऊन त्या कबरेजवळ पोचल्या. [2] तेथे त्यांनी कबरेवरून
धोंड बाजूला लोटलेली पाहिली. [3] त्या आंत गेल्या, परंतु त्यांना तेथे येशूंचे
शरीर दिसले नाही. [4] जेव्हा त्या सर्व तेथे गोंधळलेल्या आणि पेचांत पडलेल्या
अवस्थेत होत्या, तेव्हा अचानक दोन परमेश्वरदूत, लखलखीत चमकणारे वस्त्र
घालून तेथे त्यांच्याजवळ उभे राहिले. [5] जेव्हा त्या घाबरलेल्या अवस्थेत त्यांनी
जमिनीकडे आपली तोंडें केली, तेव्हा दोन्ही परमेश्वरदूत म्हणाले, "तुम्ही
जिवंताला, मेलेल्यांत का शोधित आहात?" [6] ते येथे नाहीत, परंतु उठले आहेत.
गालीलात असतांना ते काय सांगत होते याची आठवण करा. [7] ते हेच होते की,
"मनुष्याचा पुत्र वाईट-दुष्ट लोकांच्या हाती दिला जाईल, क्रूसावर खिळला
जाईल, परंतु तिसऱ्या दिवशी पुन्हा जिवंत उठेल. [8] हे ऐकून त्या सर्वांना
येशूंनी म्हटलेल्या गोष्टींची आठवण झाली. [9] कबरेपासून परत आल्यानंतर या
स्त्रियांनी या गोष्टी अकरा शिष्यांना आणि बाकीच्या लोकांनाही सांगितल्या.
[10] मग्दालीया मरीया, योहान्ना व याकोबाची आई मरीया आणि इतर स्त्रिया
ज्या त्यांच्याबरोबर होत्या, त्या सर्वांनीच या गोष्टी प्रेषितांना सांगितल्या.
[11] परंतु त्यांना या सर्व गोष्टी खोटया किंवा वायफळ किंवा अंधश्रद्धेने भरलेल्या
वाटल्या आणि त्यानी या गोष्टींवर विश्वास ठेविला नाही. [12] तेव्हा पेत्र धावत
धावत कबरेकडे गेला आणि ओणवे होऊन (वाकून) आत डोकावल्यावर त्याला
तेथे केवळ तागाची वस्त्रें दिसली; आणि आश्चर्याने भरलेला असा तो तेथून
पळाला. [13] त्याच दिवशी यरूशलेमेपासून 12 कि.मी दूर अम्माऊस नांवाच्या
गावाकडे दोन व्यक्ती जात होते. [14] ते दोघेही त्या सर्व गोष्टींविषयींची चर्चा
करीत होते, ज्या घडल्या होत्या. [15] ते बोलत असतांनाच येशू त्यांच्याजवळ
आले आणि त्यांच्याबरोबर चालू लागले. [16] पण ते दोघे येशूंना ओळखू शकले
नाहीत. [17] येशू त्यांना म्हणाले, "तुम्ही शोकावस्थेत राहून जेव्हा चालत जात
होता तेव्हा काय/कशाविषयी बोलित होता?" [18] त्यांच्यापैकी एक क्लयपा

नांवाचा पुरूष म्हणाला, "यरूशलेमेत आपण एक अनोळखी पुरूष आहात
काय आणि तुम्हांला त्या गोष्टी ठाऊक नाहीत काय ज्या या दिवसांत घडत
राहिल्या आहेत?" 19 येशूंनी विचारले, "कोणत्या गोष्टी?" ते म्हणाले, "येशू
नासरेथकर विषयींच्या, जे आपल्या कथनांत व कृत्यांत, परमेश्वराच्या आणि
सर्व लोकांच्या दृष्टीत सामर्थी संदेष्टा होते. 20 आणि मुख्य याजकांनी आणि
अधिकाऱ्यांनी त्यांना क्रूसावर खिळिले आणि जिवें मारण्यासाठी त्यांच्या हाती
सोपून दिले. 21 पण आमची आशा हीच होती की ते इस्त्राएल देशाला मुक्त
करतील. या सर्व गोष्टी घडून तीन दिवस झाले आहेत. 22 होय, आमच्या काही
स्त्रियांनी आम्हांला स्तंभित करून सोडले जेव्हा त्या पहाटे सकाळी कबरेवर
पोह्चल्या होत्या. 23 त्यांना तेथे शव आढळले नाही आणि येथे येऊन त्यांनी
सांगितले की त्यानी परमेश्वरदूतांना पाहिले, ज्यांनी येशू जिवंत असण्याचा
दावा केला. 24 आमच्यापैकी काही लोकांनी कबरेकडे जाऊन जसे त्या स्त्रियांनी
सांगितले होते तसेच पाहिले परंतु त्यांनी येशूंना पाहिले नाही." 25 मग येशू
त्यांना म्हणाले, "निर्बुद्धि लोकांनो! संदेष्टयांच्या गोष्टींवर विश्वास धरण्यास मंद
असणाऱ्यांनो! 26 हे आवश्यक नव्हते काय की येशूंनी दुःखे सहन करून आपल्या
महिमेत (स्वर्गातील सर्वोच्च स्थानी) दाखल व्हावे?" 27 मग मोशे आणि इतर
संदेष्टयांपासून आरंभ करून, पूर्ण बायबलमध्ये जे काही त्यांच्या स्वतःविषयीचे
होते, त्या सर्व गोष्टी त्यांनी त्यांना समजावून सांगितल्या. 28 जसजसे ते
आपल्या गावाजवळ पोह्चत होते, येशू त्यांच्यापुढे निघाले. 29 परंतु त्या
दोघांनी येशूंना आग्रह करीत म्हटले, "दिवस मावळून, संध्याकाळ व रात्र होत
चालली आहे, आमच्याबरोबर राहा." आणि येशू त्यांच्याबरोबर राहावयास
तयार झाले. 30 जेव्हा येशू त्या लोकांबरोबर भोजनाकरिता बसले तेव्हा त्यांनी
आशीर्वाद देऊन भाकर मोडून त्यांना दिली. 31 तेव्हा त्यांचे ज्ञानचक्षु उघडले,
खरी गोष्ट त्यांना समजली, परंतु त्याचसमयी येशू तेथून नाहीसे झाले होते.
32 तेव्हा ते दोघे एकमेकांस म्हणाले, "ज्यावेळी वाटेत आपण चालत जात होतो
त्यावेळी बायबलच्या सत्य घटना समजून घेतांना आपल्या मनात कसा आभास
होत होता ना? जणूकाही आत एकप्रकारची उकळी येत नव्हती काय? 33 ते
त्याच समयी उठलें आणि यरूशलेमेकडे चालू लागले. तेथे पोचल्यावर त्यांना
अकरा प्रेषित आणि इतर दूसरे लोक आढळले. 34 ते म्हणाले, "येशू खरोखरच

उठले आहेत आणि शिमोनाने त्यांना पाहिलेही आहे." [35] त्यानी वाटेवरील
घटनांविषयी त्यांना सांगितले आणि देखील की, जेव्हा येशूंनी भाकर मोडली
तेव्हा त्यांच्या अंतःकरणात कशी शंका येत होती की हे येशू तर नाहीत ना?
[36] ते असे बोलतच होते की येशू त्यांच्यामध्ये उभे राहिले; आणि म्हणाले,
"तुम्हांला शांति मिळो!" [37] आश्चर्यचकित तर ते झालेच, पण त्याचबरोबर ते
फार घाबरले होते आणि त्यांना असे वाटले की आपण आत्मा किंवा भूत पाहात
आहोत की काय! [38] येशू त्यांना म्हणाले, "तुम्ही का अस्वस्थ आणि घाबरला
आहात, तुमच्या मनांत प्रश्न का उद्भवत आहेत? [39] माझे हात, पाय तर पाहा,
मीच येशू आहे; मला स्पर्श करून पाहा, जसे तुम्ही मला पाहात आहात, तसे
आत्मा किंवा भुताला मांस व हाड नसते". [40] असे बोलून येशूंनी त्यांना आपले
हातपाय सुद्धा दाखविले. [41] ते आश्चर्य आणि आनंदाच्या संमिश्र भावनांनी
भरलेले होते, तेव्हा येशू त्यांना म्हणाले, "तुमच्याजवळ खाण्याकरिता काही
आहे काय?" [42] त्या लोकांनी येशूंना भाजलेले मासे आणि मधाच्या पोळयाचा
एक हिस्सा खाण्यासाठी दिला. [43] येशूंनी त्यांच्यादेखतच ते आपल्या हातांत
घेतले आणि खाल्ले. [44] येशू त्यांना म्हणाले, "ही तीच वचनें (गोष्टी) आहेत
जीं मी तुम्हांला आधीच सांगितली होती अर्थात मी तुमच्याबरोबर असतांना
याविषयी तुमच्याशी बोललो होतो : ती वचनें अशी: ज्या गोष्टी मोशे,
संदेष्टयांची पुस्तकें आणि स्तोत्रांत माझ्याविषयी लिहिल्या आहेत, त्यापूर्ण
होतीलच." [45] मग येशूंनी त्यांचे मन (त्यांचा समज) उघडिले यासाठी की त्यांनी
बायबल (पवित्रशास्त्र) समजून घ्यावे. [46] येशू म्हणाले, "असे लिहिले आहे आणि
हे आवश्यक देखील आहे की ख्रिस्ताने दुःख सहन करावे आणि मेल्यानंतर
तिसऱ्या दिवशी पुन्हा जिवंत उठावे. [47] हे सुद्धा की, मन परिवर्तन अर्थात
पश्चात्ताप आणि पापांची क्षमा यरूशलेमेपासून आरंभ करून ती जगातील सर्व
राष्ट्रांना येशूंच्या नांवाने पृथ्वीच्या शेवटच्या टोकापर्यंत घोषित (गाजवावी)
केली जावी. [48] आणि तुम्ही सर्वजण या गोष्टींचे साक्षी आहात. [49] आणि पाहा,
परमेश्वराच्या प्रतिज्ञा मी तुमच्याकरिता पूर्ण करणार आहे परंतु जोवर तुम्ही
स्वर्गातून येणाऱ्या सामर्थ्याने भरून जात नाही (प्राप्त करीत नाही) तोपर्यंत
याच शहरात थांबा." [50] बेथानीपर्यंत येशू त्यांना आपल्याबरोबर घेऊन गेले
आणि मग आपले हात वर करून त्यानी त्यांना आशीर्वाद दिला. [51] आशीर्वाद

देत देत येशू त्यांच्यामधूनच वेगळे झाले आणि वर आकाशात उचलले गेले.
52 त्यानंतर शिष्य येशूंचे गौरव व स्तुति करीत विपुल आनंदाने यरूशलेमेस
परत गेले. 53 आणि प्रार्थना भवनात (मंदिरात) तेव्हापासूनच परमेश्वराचा
धन्यवाद व स्तुति करण्यात सतत मग्न राहिले.